२८

ऐतिहासिक पुस्तकमाला, नंबर १८

नेपाळवर्णन.

(नेपाळच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासासह)

लेखक

जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर

(भरतपुरचा वेढा, कवनकुतूहल, महाराष्ट्रकविचरित्र या पुस्तकांचा कर्ता)

प्रकाशक

नारायण पांडुरंग देवल

(ऐतिहासिक पुस्तकमालेचा संपादक)

आवृत्ति पहिली

पुणें येथें भारतभूषण छापखान्यांत छापिलें

शके १८२८ इ. सन १९०६.

(सर्व हक्क राखून ठेविले आहेत.)

किंमत ९ आणे.

पुणें पेठ बुधवार येथें रा. रा. गंगाधर गोविंद गोंधळेकर यांचे
भारतभूषण छापखान्यांत छापिलें.

समर्पण.

श्री. रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल्. एल्. बी.

हायकोर्ट वकील, उमरावती.

यांस,

त्यांची देशहिताची कळकळ, विद्वत्ता, स्वजनां-

विषयींचें अत्युत्कट प्रेम व विशेषतः औदार्य

या गुणांस लुब्ध होऊन, हा लहानसा

ग्रंथ अत्यंत सन्मानपूर्वक

समर्पण करितों.

ज. र. आजगांवकर.

प्रस्तावना.

इंग्रजी अंमलाखालीं हिंदुस्थानांत जीं कांहीं देशी संस्थानें अद्याप जीव धरून राहिलीं आहेत, त्या सर्वांत **नेपाळ संस्थान** बहुतेक बाबतींत अगदीं स्वतंत्र असून,त्यांतील प्रदेशाची ईश्वरनिर्मित विचित्र रचना,सगळ्या जगांतील अत्युच्च पर्वत जो हिमालय त्याचीं बर्फाच्छादित अत्युच्च शिखरें, त्याच प्रमाणें तेथील प्राचीन राजे लोकांचें शौर्य, धैर्य व औदार्य, बौद्ध व हिंदु धर्मीय लोकांच्या विलक्षण चालीरीति व अर्वाचीन राजे व गुरखे लोक यांचें अतुल शौर्य, यांहींकरून या संस्थानास व त्याच्या इतिहासास एक प्रकारचें महत्त्व प्राप्त झालेलें आहे. शिवाय हल्लीं सुधारलेल्या जगांतील इतर देशांप्रमाणें आपल्या संस्थानाचीही सुधारणा करण्याच्या हेतूनें नेपाळ सरकारानें पूर्वेकडील चकाकणारा तारा जो दिग्विजयी जपान देश, त्यांत बरेच नेपाळी विद्यार्थी निरनिराळ्या कलांचें ज्ञान संपादण्यासाठीं पाठविले आहेत; व एकंदरींत तें संस्थान सध्यां उन्नतीच्या मार्गास लागलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अशा वेळीं या संस्थानची भौगोलिक व ऐतिहासिक माहिती करून घेण्याची बऱ्याच महाराष्ट्र वाचकांस उत्कंठा उत्पन्न झाली असावी, हें लक्षांत आणून, प्रस्तुत ग्रंथ मीं लिहिला आहे. इंग्रजी भाषेंत या विषयावर अनेक शोधक इंग्रज गृहस्थांचे बरेच ग्रंथ आहेत त्यांच्या आधारानें, मुरादाबादचे पंडित बलदेवप्रसादमिश्र यांनीं हिंदी भाषेंत ‘ नैपालका इतिहास ’ या नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे, त्याचें प्रस्तुत ग्रंथ हें मराठी रूपांतर होय. तथापि हें रूपांतर करित असतां,मूळ हिंदी ग्रंथांत ज्या ज्या ठिकाणीं एखाद्या गोष्टीसंबंधानें संशय आला व संदिग्धता आढळली, त्या त्या स्थलीं, खरी हकीकत काय आहे हें समजून घेण्याच्या कामीं, फ्रान्सिस ह्यामिल्टनकृत ‘ नेपाळचेंराज्य ’ , कर्कप्याट्रिककृत ‘नेपाळ’ व राइटकृत ‘नेपाळचा इतिहास’ या तीन इंग्रजी ग्रंथांचा बराच उपयोग केला आहे, हें येथें सांगणें अवश्यक वाटतें. ‘नैपालका इतिहास‘ या

प्रस्तावना.

…शक शेट खेमराज श्रीकृष्णदास यांनीं कृपा करून, त्या-पुस्तक[illegible]ठी रूपांतर करण्याची मला परवानगी दिली, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. या ग्रंथांत नेपाळचा नकाशा द्यावा अशी फार इच्छा होती व त्याप्रमाणें तो नकाशा मिळविण्याची फार खटपट केली, परंतु हें पुस्तक छापून तयार होईपर्यंत, तो हातीं आला नाहीं. सुदैवानें प्रस्तुत ग्रंथाची द्वितीयावृत्ति काढण्याचा मागें पुढें प्रसंग आला तर त्यावेळीं हा नकाशा अवश्य देऊं. शेवटीं हा लहानसा ग्रंथ माझ्या महाराष्ट्र बांधवांच्या प्रेमास पात्र व्हावा, अशी त्या जगच्चालकाची नम्रपणें प्रार्थना करून, व माझे मित्र रा. रा. पांडुरंग बल्लाळ देवल, ऐतिहासिक पुस्तकमालेचे संपादक यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध केलें याबद्दल त्यांचे आभार मानून ही अल्प प्रस्तावना पुरी करितों.

पुणें.
ता. १८ जुलई १९०६ } जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर.

प्रकाशकाचे दोन शब्द.

"कादंबरीसंग्रह ऐतिहासिक पुस्तकमाला," या मासिकपुस्तकाच्या रूपानें, आज पंधरा वर्षें, आम्हीं जी महाराष्ट्रभाषेची वेडीवाकडी सेवा केली; व ती आमच्या सहृदय वाचकांनीं गोड करून घेतली; याबद्दल प्रथमतः त्यांचे आभार मानून व यापुढेंही ही पुस्तकमाला अधिक उत्साहानें गुंफण्याच्या कामीं आम्हास त्यांजकडून योग्य उत्तेजन मिळेल अशी आशा प्रदर्शित करून, या मालेच्या बाबतींत प्रस्तुत ज्या सुधारणा करण्याचें आम्हीं योजिलें आहे, त्यांसंबधानें येथें चार शब्द लिहितों. आजपर्यंत ऐतिहासिक पुस्तकमालेनें मराठी भाषेचें बरेंच मोठें कार्य केलें आहे. तथापि चालू विषयांपेक्षां अधिक महत्त्वाचे व भारदस्त असे विषय त्यांत घालण्याची योजना झाल्यास ही माला अधिक उपयुक्त होईल, अशा अर्थाची सूचना रा. सा. विष्णु मोरेश्वर महाजनी व रा. ब. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते यांच्यासारख्या गृहस्थांकडून मिळाल्यामुळें व आमच्या आश्रयदात्यांस चालू वर्गणींतच अधिक चांगला पुस्तकसंग्रह करितां यावा या हेतूनें यापुढें ही माला मासिकपुस्तकरूपानें चालू ठेवण्याचें आम्हीं ठरविलें आहे.

आमच्या देशाच्या इतिहासावर प्रकाश पाडणारे पुष्कळ जुने कागदपत्र अद्याप बाहेर पडलेले नाहींत; अशा कागदपत्राच्या आधारानें, रा. रा. गद्रे, रा. रा. पांगारकर, रा. रा. आपटे, रा. रा. भागवत, रा. रा. आजगांवकर इत्यादि नामांकित लेखकांकडून लिहिण्यांत येणारे इतिहासग्रंथ, ऐतिहासिक कादंबऱ्या, स्थलवर्णनें, नाटकें, चरित्रें, काव्यें, चर्चात्मक ग्रंथ इत्यादिकांचा

प्रकाशकाचे दोन शब्द.

[illegible] समावेश होईल. या मालेचीं दरसाल डेमी अष्टपत्री ५०० पृष्ठें, तीन किंवा चार स्वतंत्र ग्रंथांच्या रूपानें, ट० ह० सह फक्त दोन रुपये आगाऊ वर्गणींत दिलीं जातात. यामुळें आश्रयदात्यांस, प्रत्येक तिमाहीस एक संपूर्ण ग्रंथ वाचण्यास मिळून, चार पांच वर्षांत त्यांच्या घरांत एक लहानसा ऐतिहासिक ग्रंथसंग्रह झालेला त्यांच्या दृष्टीस पडेल. या मालेंतील पुस्तकाचा विषय ' इतिहास ' हा असल्यामुळें त्यांत शृंगाराचा अतिरेक किंवा बीभत्सपणाचा भाग येण्याचा संभव मुळींच दिसत नाहीं; व यामुळें या मालेंतील पुस्तकें मुलें व स्त्रिया यांच्या हातीं देण्यास बिलकुल हरकत नाहीं. या मालेंतील बहुतेक ग्रंथांस डे. व्ह. ट्रान्स्लेशन सोसायटी-कडून बक्षिसें मिळालीं आहेत, इतकें सांगितल्यावर पुस्तकांच्या चांगुलपणा-संबंधानें आणखी कांहीं लिहिण्याची आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. इतिहासासारख्या उच्च प्रतीच्या ग्रंथवाचनाकडे आमच्या लोकांची अद्याप व्हावी तशी प्रवृत्ति होत नाहीं, हें महाराष्ट्र इतिहास, काव्येतिहास संग्रह, भारतवर्ष इत्यादि मासिकपुस्तकांच्या हकीकतीवरून उघड होत आहे. वा-ष्कळ, काल्पनिक अथवा भाषांतरात्मक कादंबऱ्या व वाचाट नाटकें किंवा प्रसहनें यांचेच भोक्ते फार आहेत, हें मुंबई व ठाणें येथील ग्रंथसंग्रहाल-यांच्या वार्षिक अहवालावरून कोणाच्याही लक्षांत येईल. अशा स्थितींत, आमच्या मालेसारखी केवळ ऐतिहासिक पुस्तकमाला चालू ठेवणें केवढ्या जबाबदारीचें व खर्चाचें काम आहे, हें आह्मीं येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं, तर या स्थितीकडे लक्ष देऊन आमच्या वाचकवर्गानें आपल्या स्नेही-मंडळींत मालेंतील पुस्तकांचा प्रसार करावा, व अशा प्रकारें वर्गणीदारांची संख्या वाढवून आह्मास याकामीं शक्य ते प्रोत्साहन अवश्य द्यावें, अशी त्यांस आमची सविनय प्रार्थना आहे. हें अंगीकृत कार्य शेवटास जावें ह्मणून व या मालेचा आस्वाद अगदीं कमी प्राप्तीच्या लोकांसही घेता यावा या हे-तूनें फायद्याकडे बिलकूल लक्ष न देतां आम्हीं या मालेची वर्गणी फारच कमी म्हणजे दरमहा सुमारें तीन आणे ठेविली आहे. या स्थितीचा फायदा घेऊन आह्मास उत्तेजन देणें हें रसिक, इतिहासप्रिय व स्वदेशाभिमानी लोकांचें क-

र्तव्य आहे. आमच्या जुन्या चालू आश्रय दात्यांनीं आपल्या मित्रमं... प्रत्येकी दोन दोन याप्रमाणें वर्गणीदार मिळून दिल्यास, चालू वर्गणींतच ही माला सचित्र करण्यास आम्ही समर्थ होऊं, अशी आमची उमेद आहे.

हिशोबाचें साल जानेवारी ते दिसेंबर धरलेलें आहे. नवीन वर्गणीदारांनीं चालू सालीं तयार झालेलीं पुस्तकें व्ही. पी. नें मागवून माला सुरू करावी. पुढील पुस्तकें बुकपोस्टानें पाठविलीं असतां गाहाळ होण्याचा संभव असल्यानें व रजिस्टर केल्यास दोन आणे खर्च येईल, सबब तीं एक आण्याच्या व्ही. पी. नें पाठविलीं जातील. हा एक आणा होणारा खर्च पुढील सालच्या वर्गणींत वजा केला जाईल. पत्ता बदलणाऱ्या वर्गणीदारांनीं आपला नवा पत्ता वेळींच कळवावा म्हणजे पुस्तकें वेळेवर पोंचण्यास अडचण पडणार नाहीं.

प्रस्तुत ‘ नेपाळ वर्णन ’ हें पुस्तक आमचे मित्र रा० रा० जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर यांनीं लिहिलें असून त्यांत त्यांनीं अनेक हिंदी व इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें व खुद्द नेपाळांत जाऊन आलेल्या कांहीं गृहस्थांकडून मिळालेल्या माहितीवरून नेपाळासंबंधानें शक्य तेवढी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. हें पुस्तक आमच्या वांचकांस आवडेल अशी आमची खात्री आहे. यापुढें कर्नल टॉड यांच्या ‘राजस्थान’ या ग्रंथाच्या आधारानें एका होतकरू लेखकानें लिहिलेली चक्रवर्ती हम्मीर नांवाची ऐतिहासिक कादंबरी देण्यांत येईल. तिची जाहीरात दुसरे पृष्ठावर आहे ती पहावी.

पुणें, ता० १ आगष्ट सन १९०६ } ना. पां. देवल. ऐतिहासिक पुस्तकमाला.

चक्रवर्ती हम्मीर.

ही सुमारें २५० पृष्ठांची उत्कृष्ट ऐतिहासिक कादंबरी वर्गणीदारांस देण्याचें ठरविलें आहे. या कादंबरीचें कथानक आणि तिची रचना हीं इतकीं कांहीं मनोरम आहेत कीं, पुस्तक एकवेळ हातीं घेतल्यावर तें साग्र वाचून झाल्याशिवाय खालीं ठेववणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. ही कादंबरी वाचीत असतां, रजपुतांचा करारी स्वभाव, शौर्य व साहस, त्या वेळच्या बादशाहींतील कित्येक नीच लोकांचीं भयंकर कृष्णकृत्यें, व मनुष्यस्वभावाचे अनेक इतर प्रकार, यांचीं चित्रें डोळ्यांसमोर उभीं राहून, आपण दोनशें वर्षांपूर्वीच्या हिंदुस्थानांतील एक मनुष्य आहों कीं काय ? अशी वाचकांस भ्रांति पडते.

ही कादंबरी आक्टोबर सन १९०६ अखेर आश्रयदात्यांकडे रवाना केली जाईल.

पुणें, ता. १ आगष्ट
सन १९०६.

नारायण पांडुरंग देवल.
प्रकाशक ऐतिहासिक पुस्तकमाला.

नेपाळवर्णन.

नगाधिराज हिमालयाच्या उतरणीवर, व हिंदुस्थानच्या उत्तरेस, नेपाळ हें एक स्वतंत्र संस्थान आहे. त्याचे उत्तरेस तिबेट देश, पूर्वेस सिकीम संस्थान, दक्षिणेस ब्रिटिश हिंदुस्थान व पश्चिमेस कमाऊन व रोहिलखंड हे प्रदेश आहेत. इ०स०१८१५ पूर्वी, कमाऊन प्रांताच्या पश्चिमेस शतद्रु नदीपर्यंत या राज्याचा विस्तार होता; परंतु इ०स०१८१६त नेपाळी व इंग्रज यांच्या मध्यें जो तह झाला, त्या तहाअन्वयें हा सर्व प्रदेश इंग्रजांच्या ताब्यांत गेला. साम्प्रत, पश्चिमेच्या बाजूनें काली उर्फ सरयू नदी, दक्षिणेच्या बाजूनें अयोध्या प्रांतांतील डुंडवा नामक पहाड व चम्पानेर प्रांतांतील सोमेश्वर पर्वताच्या पायथ्याचा प्रदेश, व पूर्वेच्या बाजूनें मेंची नदी व शृङ्गाटचा डोंगर हीं ठिकाणें, नेपाळ व इंग्रजी हिंदुस्थान यांच्यामध्यें सीमारूपानें विराजमान झालेलीं आहेत. 'शक्तिसंगमतंत्र' नामक संस्कृत तंत्रग्रंथांत, नेपाळच्या सीमासंबंधानें पुढील श्लोक आढळतोः—

॥ जटेश्वरं समारभ्य योगेशान्तं महेश्वरि ॥
॥ नैपाल देशो देवेशि साधकानां सुसिद्धिदः ॥

या श्लोकाचा अर्थ असा कीं, जटेश्वर नामक क्षेत्रापासून योगेश्वर नामक क्षेत्रापर्यंत जो नेपाळ या नांवाचा देश आहे तो साधकांस सिद्धि देणारा आहे.

नेपाळ नांवाची उत्पत्ति.

हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या ज्या प्रदेशांत गुरखा जातीचे लोक राहतात, त्या प्रदेशास तिबेटी व हिमालयाच्या पहाडावर राहणारे अनार्य लोक ' पालदेश ' असें म्हणतात. नेपाळाच्या पूर्व भागांतील व सिक्किम संस्थानांतील, लेप्चा जातीचे अडाणी लोक या प्रदेशास ' ने ' असें म्ह-

[illegible]या, नेवार व दुसऱ्या कांहीं मिश्र जातींची जी चिनी-हिंदुस्थानी मिश्रित विचित्र भाषा आहे त्या भाषेंत ‘ने’ या शब्दाचा, ‘ज्यांत मनुष्यास घराप्रमाणें राहतां येईल अशी पर्वताची गुंफा,’ असा अर्थ होतो. तिबेटी, ब्रह्मी व लामा लोकांच्या भाषेंत ‘ने’ शब्दाचा, ‘पवित्र गुंफा अथवा देवास समर्पण केलेलें पवित्र स्थान’ असा अर्थ होतो. यावरून, ज्या पवित्र देशात गुरखा जातीचे लोक राहतात, त्यास नेपाळ देश म्हणतात हें उघडच आहे. कोणी असेंही सांगतात कीं, या देशाच्या ज्या भागांत, पूर्वी नेवार जातीचे अनार्य लोक राहत असत त्या भागास ‘ने’ असें नांव होतें व त्यामुळेंच त्या जातीस नेवार हें नांव प्राप्त झालें. वास्तविक पाहिलें असतां, प्रस्तुतच्या नेपाळ संस्थानाचें राजधानीचें शहर जें काटमांडू, तें ज्या प्रदेशांत वसलेलें आहे त्या प्रदेशासच पूर्वी नेपाळ हें नांव होतें, परंतु हल्लीं तें सगळ्या संस्थानास लावण्यांत येतें. नेपाळ संस्थानाची पूर्वपश्चिम लांबी २५६ कोस व दक्षिणोत्तर रुंदी ३५ पासून ७५ कोस आहे. क्षेत्रफळ सुमारें ५४,००० चौरस मैल आहे.

स्वाभाविक विभाग.

हिमालय पर्वताच्या तीन उंच शिखरांमुळें नेपाळ संस्थानाचे तीन स्वाभाविक विभाग झालेले आहेत. हे तीन विभाग म्हणजे मोठमोठाल्या दऱ्याच आहेत. कमाऊन प्रांतांतील ब्रीटिश हद्दीवर असलेल्या नंदादेवीनामक शिखरापासून जे अनेक जलप्रवाह निघतात, ते सर्व एकवटून काली नदी झालेली आहे व ती नेपाळच्या पश्चिम स्वाभाविक विभागाची सीमा होय. नंदादेवी शिखराच्या पूर्वेस १०० मैलांवर, धवलगिरी अथवा दूधगंगानामक शिखर असून त्याच्या दक्षिणेस ब्रिटिश सरकारचा गोरखपूर जिल्हा आहे व तो नेपाळच्या मध्य स्वाभाविक विभागाची सीमा होय. तिसरा विभाग म्हणजे पश्चिम विभाग हा नंदादेवी व धवलगिरी या शिखरांच्या मध्यें आहे. धवलगिरी शिखरापासून पूर्वेस ९० कोसांवर गोसाईस्थान नामक शिखर असून तें नेपाळच्या थेट उत्तरेस आहे.

घांट

हिमालय पर्वत ओलांडून, नेपाळांतून तिबेटांत जाण्याचे जे अनेक पहाडी रस्ते आहेत त्यांस घांट असें ह्मणतात. हे घांट समुद्राच्या सपाटीपासून इतके उंच आहेत कीं, त्यांतील सर्वांत कमी उंच घांटाची उंची युरोपखंडांतील सर्वांत उंच असणाऱ्या पर्वताच्या उंचीपेक्षांही अधिक आहे! हे घांट बर्फानें सदोदित आच्छादिलेले असतात. यांपैकीं कांहीं मुख्य घांटांची माहिती येथें देतोंः—

१ **थकला अथवा खरघांट**, हा नंदादेवी व धवलगिरी या शिखरांच्या मध्यें आहे. हिमालयांत जेथें शतद्रुनदी उगम पावली आहे, तेथेंच घागरानदीपासून कर्णालीनामक उपनदी निघाली आहे. ही नदी तिबेटांत ज्या ठिकाणीं पहिल्यानें प्रवेश करिते, त्या ठिकाणीं, 'थक' या नांवाचा एक गांव असून तेथें तिबेटी मिठाचा मोठा व्यापार चालतो. २ **मस्तं घांट** हा धवलगिरीच्या पूर्वेस २० कोसांवर आहे. धवलगिरीच्या उत्तरेस तिबेटांत, 'मस्तं' या नांवाचें एक ठिकाण आहे, त्यावरून या घांटास 'मस्तं घांट' असें ह्मणतात. 'मस्तं' हें ठिकाण जरी तिबेटांत आहे तरी तेथील राजा नेपाळचा मांडलिक असून तो नेपाळच्या राजास खंडणी देतो. मस्तंगिरी मार्गाच्या उत्तरेस, मुख्य रस्त्यावर, 'मुक्तिनाथ' नामक एक पवित्र तीर्थस्थान असून तेथें तिबेटी मिठाचा मोठा व्यापार चालतो. ३ **केरा घांट**, हा गोसाईंस्थान शिखराच्या पश्चिमेस आहे. ४ **कुटी घांट**, हा गोसाईंस्थानाच्या पूर्वेस आहे. केरां व कुटी हे दोन्ही घांट, काटमांडू शहराच्या अगदीं नजीक असल्यामुळें, हिंवाळ्यांत, या घांटांतून शेंकडो तिबेटी यात्रेकरू व व्यापारी प्रतिवर्षी नेपाळांत येतात. काटमांडूहून, तिबेटची राजधानी ल्हासा येथें जाण्याचा मुख्य घांट केरा हाच आहे. हा घांट तिबेटांत जात असतां वाटेंत 'टेरी' नामक एका ठिकाणीं कुटी घांटास मिळतो. कुटी घांटही तिबेटांत जाण्यास फार जवळचा घांट आहे, परंतु या घांटानें घोडीं जाऊं शकत नाहींत. नेपाळच्या राजदूतांस जेव्हां चीन देशांत

... तेव्हां ते कुटी घांटानेंच जातात, परंतु परत येतांना जर ... त्यांनीं बरोबर आणिलेली असलीं तर त्यांस केरा घांटांतून नेपाळांत यावें लागतें. इ. स. १७९२ त जें युद्ध झालें, त्यावेळीं चिनी सैन्य केरा घांटानेंच नेपाळांत आलें होतें. कुटी घांटाच्या पश्चिमेकडील प्रांतांत राहणारे लोक तेथील बर्फाच्छादित पर्वतास ताम्रकोशी व त्याच्या आसमंतात् प्रदेशास ताम्रभूमी असें ह्मणतात. याच ताम्रकोशी पर्वतापासून ताम्रकोशी नामक नदी निघालेली आहे. दुसरी एक भोंटिया नामक नदी या कुटी घांटांतून वहात गेली आहे. ५ हतिया घांट, हा कुटी घांटाच्या पूर्वेस २०।२५ कोस आहे. ज्या सात उपनद्या मिळून कोशीनदी झालेली आहे त्यांपैकीं ‘ अरुण ’ नामक मुख्य उपनदी या हतिया घांटांतून नेपाळांत प्रवेश करिते. ६ वल्लं अथवा वलंचन घांट, हा कांचनगंगा शिखराच्या पश्चिमेस नेपाळच्या पूर्वसीमेच्या आंत आहे. हिंवाळ्यांत तिबेटी लोक याच घांटानें नेपाळांत येतात.

मुख्य नद्या.

नेपाळच्या ज्या तीन स्वाभाविक विभागांचें वर्णन आरंभीं दिलें आहे, त्या तीन विभागांतून वाहणाऱ्या घागरा, गंडकी व कोशी या तीन मुख्य नद्या नेपाळांत आहेत. त्यांपैकीं गंडकी नदी ज्या दरींतून वाहते, त्याच दरींत काटमांडू शहर आहे. या शहराच्या जवळच बाघमती नामक एक लहान नदी असून, मुंगेर या नांवाच्या गांवीं ती गंगेस मिळाली आहे.

राज्यविभाग.

१ वर लिहिलेल्या तीन नद्यांपैकीं घागरा नदी ज्या दरींतून वाहात गेली आहे त्या दरीचे बावीस विभाग केलेले असून त्यांस ‘ बावीस राज्यें ’ असें म्हणतात. या बावीस राज्यांत बावीस जमीनदार असून त्यांपैकीं जो मुख्य जमीनदार आहे त्यास राजा असें ह्मणतात व बाकीच्या २१ जमीनदारांवर त्याचा अधिकार चालतो. ह्या मुख्य जमीनदाराची राजधानी जुमला या नांवाचें शहर आहे. हा राजा गुरखे लोकांकडून जिंकला जाण्याच्या-

पूर्वी निरनिराळ्या ४६ संस्थानांवर त्याचा अधिकार चालत अस. नांपैकीं २२ संस्थानें काली नदीच्या कांठीं व २४ संस्थानें गंडकी नदीच्या कांठीं होतीं. हीं सर्व संस्थानें जुमला येथील महाराजास, मासे व पशू यांच्या रूपानें खंडणी देत असत ! सांप्रत जुमला राज्याचें वैभव जरी फार संकुचित झालेलें आहे तरी इतर संस्थानें, तेथील राजास अद्याप आपला सार्वभौम समजून त्यास खंडणी देत असतात. वर लिहिलेल्या ४६ राज्यांपैकीं २६ राज्यें बहादूरशहा यानें नेपाळांत सामील करून घेतलीं व तीं आतां नेपाळचीं कायमचीं मांडलिक होऊन बसलीं आहेत. तथापि, जुमला येथील राजवंशासंबंधानें त्यांची पूज्यबुद्धि अद्याप कायम असून, तेथील महाराजाकडून मिळणारा 'राजा' हा किताब धारण करण्यांत या संस्थानिकांस मोठें भूषण वाटतें. नेपाळांत हे संस्थानिक सामान्य जहागिरदार गणले जातात. ह्या संस्थानिकांत जे अगदीं कनिष्ठ प्रतीचे संस्थानिक आहेत त्यांचें वार्षिक उत्पन्न पांचपासून सहा हजार रुपये आहे व जो सर्वांत मोठा आहे त्याचें उत्पन्न सहा लक्ष रुपये आहे. या सर्व संस्थानिकांपाशीं सशस्त्र सैन्य असून तें कोणापाशीं चारशें तर कोणापाशीं चाळीस, असें आहे!

जुमलाराज्याच्या खालोखाल महत्त्वाचें राज्य ह्मटलें ह्मणजे 'दोती राज्य' होय. या राज्याची राजधानी दोती (द्युति) अथवा दिपैत (दीप्ति) या नांवाचें शहर आहे. या राज्याची लोकसंख्या इतर सर्व राज्यांपेक्षां मोठी आहे. दोती हें शहर, कर्णाली नदीपासून निघालेली श्वेतगंगानामक एक उपनदी आहे, तिच्या कांठीं असून, तेथून बरेली शहर ४२॥ कोस आहे. दोती येथील राजापाशीं, पायदळाचीं दोन पलटणें व कांहीं तोफाही आहेत.

सुलियाना, हें शहर अयोध्याप्रांताच्या उत्तर सीमेवर नेपाळांत असून तेथें नेपाळी लष्कराची छावणी आहे. तेथून लखनौ शहर ६० कोस आहे. सुलियानाचे उत्तरेस २५ कोसांवर, पेन्ताना या नांवाचें शहर असून तेथें नेपाळ सरकारचा बंदुकीच्या दारूचा मोठा कारखाना आहे. येथें सोरा फार सांपडतो. हें शहर ज्या प्रदेशांत वसलें आहे त्यास 'सुलिमन मढी' असें ह्मणतात. ह्या प्रदेशाच्या मध्यभागीं रासीनामक नदी आहे.

...ळ संस्थानच्या मध्यभागांतून गंडकी नदी वाहत असल्यामुळें, त्या विभागास 'गण्डक अविवाहिका प्रदेश' असें ह्मणतात.हा प्रदेश, 'सप्त-गंडकी' या नांवानें फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. या प्रदेशास हें नांव मिळण्याचें कारण, गंडकी नदी सात नद्या मिळून झालेली आहे, हें होय. या सातही नद्या धवलगिरी व गोसाईस्थान या शिखरापासून उगम पावल्या आहेत. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—नारायणी, शालिग्रामी, श्वेत-गंडकी, मत्स्यांध्रि, धरमडी, गंडी व त्रिशूलगंगा. या सातही नद्या एकत्र होऊन पुढें त्यांच्या तीन शाखा झालेल्या आहेत, व पुढें या तिन्ही शाखा एकत्र होऊन त्यांची गंडकी नदी झालेली आहे. ही नदी ज्या ठिकाणीं सोमेश्वर नामक डोंगराच्या विवरांत शिरते, त्या ठिकाणास 'त्रिवेणी' असें म्हणतात. वर ज्या सात नद्यांचीं नांवें दिलीं, त्यांपैकीं, त्रिशूलगंगा नदी ज्या ठिकाणीं उगम पावली आहे, त्या ठिकाणीं लहान मोठे २२ तलाव आहेत. त्यांपैकीं गोसाईस्थान शिखरावरील कुंड अथवा नीलखीयत (नीलकंठ) हा तलाव बराच मोठा असून, त्यामुळेंच त्या शिखरास गोसाईस्थान हें नांव मिळालें आहे. या तलावाच्या मध्यभागीं, एक मोठा नीलवर्णाचा अंडाकृति खडक उभा आहे. हा खडक तलावाच्या तळापासून वर आलेला नसून तो तलावाच्या पृष्ठभागापासून फक्त एक फूट खोल पाण्यांत बुडालेला आहे. हें त्याचें वर्णन कोणास अत्युक्ति वाटेल, तर तसें वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. कांकीं ही गोष्ट पुष्कळ युरोपियन लोकांनींही पाहून, आपल्या ग्रंथांत नमूद करून ठेविली आहे. नीलवर्ण पाषाणास, साक्षात् नीलकंठ महादेवाची प्रतिमा असें समजून, लोक त्याची पूजा करितात. आषाढ, श्रावण व भाद्रपद या महिन्यांत तेथें मोठी यात्रा जमते. तथापि, या तीर्थास जावयाचा मार्ग फार बिकट व भयंकर आहे. या तलावाच्या उत्तर तीरावर एक मोठा उंच पहाड असून त्याच्या तीन शिखरांपासून तीन जलप्रवाह निघाले आहेत व ते एका तीस फूट उंचीच्या टेंकाडावरून दुसऱ्या एका तलावांत पडतात. या तीन प्रवाहांस 'त्रिशूलधारा' असें ह्मणतात. या त्रिशूलधारेसंबंधानें अशी एक पौराणिक कथा सांगतात कीं,

समुद्रमंथनकालीं शंकरांनीं हालाहल प्राशन केलें, त्यावेळीं त्याच्या... त्यांच्या सर्वांगाचा भडका उडून गेल्यामुळें ते फार तृषाक्रांत होऊन ... ब-र्फाच्छादित प्रदेशीं आले असतां त्यांस तेथें पाणी मिळालें नाहीं. यामुळें क्रोधाविष्ट होऊन त्यांनीं त्या पर्वताशिखरावर आपल्या त्रिशूलाचा आघात केला व त्यामुळें हे तीन जलप्रवाह निघून ‘ त्रिशूलधारा ’ या नांवानें ते अद्याप अस्तित्वांत आहेत. वरील सरोवरास ‘ नीलकण्ठ तीर्थ ’ हें नांव पडण्याचें कारणही हेंच होय. या सरोवरांत जे असंख्य अंडाकार शिलाखंड आहेत, तेही शिवस्वरूप समजले जातात. तीर्थयात्रा करणारे भाविक लोक असें सांगतात कीं, या सरोवराच्या तीरावर उभें राहून पाहिलें असतां भगवान् नीलकण्ठ सर्पशय्येवर निद्रित असलेला दृग्गोचर होतो ! मि. ओल्ड-फील्ड यांचें या बाबतींत असें मत आहे कीं, पूर्वकालीं पर्वतशिखरांवरून तलावांत पडणाऱ्या हिमखंडांबरोबर हा मूर्तिरूपपाषाणही तलावांत पडला असावा. व तलावांतील पाण्याच्या चांचल्यामुळें तो वरील रूपानें दृग्गोचर होत असावा. या सरोवराच्या कांठीं, दगडाचा एक लहानसा नंदी व दीडफूट उंचीचा एक सर्प, यांशिवाय दुसरी एकही प्रतिमा नाहीं. या ठिकाणीं कांहीं दगडी खांब असून, पूर्वीं त्यांजवर एक मोठी घंटा टांगलेली होती, परंतु ती हल्लीं तेथें दृष्टीस पडत नाहीं. सगळ्या गोसाईस्थान शिखरावर वरील प्रतिमांशिवाय शिवमूर्तीचें एकही चिन्ह आढळण्यांत येत नाहीं. नीलकंठ तीर्थास जाण्याच्या रस्त्यावर, चंदनवाडी नामक गांवानजीक, एक फूट उंचीचा एक पाषाण असून त्याला गणपतीची प्रतिमा समजून लोक त्याचें पूजन करितात. या मूर्तीस ‘ लौडी गणेश ’ असें ह्मणतात. वर लिहिलेले तीन जलप्रवाह ज्या कुण्डांत पडतात त्या कुंडापासून उगम पावणाऱ्या, गण्डकी नदीच्या पहिल्या उपनदीस त्रिशूलगंगा हें नांव आहे. सूर्यकुंड नामक सरोवरापासून उत्पन्न झालेली वेत्रवती या नांवाची एक नदी त्रिशूलगंगेस येऊन मिळाली आहे. सूर्यबली उर्फ टाडी या नांवाची दुसरी एक नदी याच सरोवरांत उगम पावली आहे. ही नदी देवघांट नामक गांवीं त्रिशूलगंगेस मिळते. हा गांव नायकोट (नवकोट)नामक दरींत असून ती एक तीर्थाची जागा आहे. या ठिकाणची मुख्य

[illegible]वता भैरवी नामक देवी असून, नवकोट शहरांत तिचें देऊळ आहे. हिवाळ्यांतील बर्फ पडणें बंद झाल्यावर, यात्रेकरू लोक या ठिकाणीं येतात, व वरील नद्यांच्या संगमावर, लांकडाचे तक्ते व नदींतील मोठमोठे दगड यांचें एक तात्पुरतें देऊळ उभें करून, त्यांत ते या देवीची पूजा करितात. असें सांगतात कीं, देवीची प्रतिमा प्रथम या संगमावरच होती, परंतु ती तेथून दुसरीकडे नेण्याविषयीं देवीनें कोणास स्वप्नांत दृष्टांत दिल्यामुळें, लोकांनीं तिची स्थापना दुसऱ्या जागीं केली. त्रिशूलगंगा नदीच्या प्रवाहाचा वेग मूळचाच मोठा आहे व वरसातीच्या दिवसांत तर पाण्याच्या जोरानें नदीचे दोन्ही किनारे तुटून जातात. संगमावरून आपली मूर्ति काढून ती दुसरे जागीं नेण्याविषयीं देवीनें जो दृष्टांत दिला, त्याचें हेंच कारण होय.

गंडकी नदी ज्या खोऱ्यांतून वाहते त्या खोऱ्याचे गुरखे लोकांनीं चार विभाग करून त्यांस अनुक्रमें, मालीभूम, खपी, पाल्पा व गुरखा अशीं नांवें दिलीं आहेत. त्यांपैकीं मालीभूम नामक विभाग, धवलगिरी शिखराच्या मूलप्रदेशापासून, भरिगर नामक नदीपर्यंत पसरला आहे. याची राजधानी ‘ विनी ’ नामक शहर असून तें नारायणी नदीच्या कांठीं वसलें आहे. खपी विभाग मालीभूमच्या पूर्व व दक्षिण दिशांच्या मध्यें आहे. ‘ पाल्पा ’विभाग जरी फार मोठा नाहीं तरी महत्त्वाचा आहे. याचे उत्तरेस नारायणी नदी आहे व दक्षिणेस ‘ बेतुल खास ’ नामक तराई (जंगल)आहे. ही तराई अयोध्या प्रांतांतील तुलसीपूर गांवापासून गंडकी नदीच्या पश्चिमेस पाली शहरापर्यंत पसरलेली आहे. ‘ शालवन ’ नामक अरण्य प्रदेशांत हिमालय पर्वताची उंची कमी आहे. सध्यांच्या गुरखे लोकांचे पूर्वज जे रजपूत लोक , ते इसवी सनाच्या बाराव्या शतकांत मुसलमान लोकांपासून पराभव पावून, या ठिकाणीं येऊन वस्ती करून राहिले होते. पुढें ते श्वेतगंडकीच्या कांठीं ‘लमजूं ’ येथें येऊन राहिले. या प्रदेशांत पापला हें मुख्य शहर असून ‘ बेतूल ’व ‘ गुलमी ’ हीं दोन प्रसिद्ध शहरें आहेत. पापला शहराच्या पूर्वेस २॥कोसांवर ‘ तानसेन ’ शहर आहे, तेथें या प्रदेशांतील सैन्याची छावणी आहे. येथें एक कचेरी, टांकसाळ व बा-

जार आहे. टांकसाळींत फक्त पैसेच पाडतात. पापला शहरांत
लोक कापसाचें कापड विणून त्याचा व्यापार करितात.

वरील विभागांपैकीं गुर्खा विभाग गंडकीच्या खोऱ्याच्या पूर्वेस, त्रिशूलगंगा व मत्स्यगंगा या नद्यांच्या मध्यभागीं पसरलेला आहे. याची राजधानी जें ' गुर्खा ' शहर, तें ' हनुमानवनजंग ' पर्वतावर, धरमडी नदीच्या कांठीं, काटमांडूपासून नवकोट शहराकडे जाणाऱ्या रस्त्यावर वसलेलें आहे. तेथून काटमांडू तेरा कोस दूर आहे. गुरखाप्रदेशाच्या पश्चिम दक्षिणेस ' पोखरा ' नामक दरी असून तींत, श्वेतगंडकी नदीच्या कांठीं पोखरा हें मुख्य शहर आहे. या शहराची लोकसंख्या मोठी आहे. येथें तांब्याचीं भांडीं व इतर वस्तु यांचा मोठा व्यापार चालतो. तेथें प्रतिवर्षी एक यात्रा भरते व त्या वेळीं धान्य व तांब्याचीं भांडीं फार खपतात. खुद्द नेपाळांतील पर्वतांपेक्षां या दरींतील पर्वत फार उंच आहेत. या दरींत कित्येक तलाव आहेत, त्यांपैकीं एक तलाव एवढा मोठा आहे कीं, त्या सभोंवतीं प्रदक्षणा करण्यास दोन दिवस लागतात! हे तलाव फार खोल असून, कित्येक ठिकाणीं त्यांची खोली १५० फुटांपासून २०० फुट आहे! ह्मणजे हल्लींचें सर्वांत मोठें लढाऊ जहाजही त्यांत सहज चालूं शकेल! परंतु, पृथ्वीच्या सपाटीपासून हीं सरोवरें फार सखल असल्यामुळें, शेतकीकडे त्यांचा ह्मणण्यासारखा उपयोग होत नाहीं. 'पापला ' व ' बैतुल ' या दऱ्यांच्या मध्यें गंडकीच्या पश्चिम तीरावर, 'गोंगतालमिढी' नामक पठार, पूर्वेस ' चितवन ऊर्फ चैतनमढी ' नामक पठार व त्याचे उत्तरेस मारवनमढी नामक पठार, हीं पठारें फार प्रसिद्ध आहेत. यांपैकीं चितवन पठारावरून रावती नामक नदी वाहते. ही नदी भीमफेडी नामक ठिकाणीं, शेषपाणी पर्वतापासून उगम पावून, सोमेश्वर पर्वताच्या उत्तरेस गंडकी नदीस मिळाली आहे. या नदीच्या कांठीं 'हेटवाडा' शहर आहे. चितवन पठारांतील अरण्यमय प्रदेशांत, जेथें वृक्ष फार उंच वाढतात अशा ठिकाणीं गवत फार उगवतें, येथें उंसाचीही लागवड करण्यांत येते. या सर्व प्रदेशास जोडणारा एक मुख्य रस्ता असून तो काटमांडूपासून नवकोट, गोर्खा, टानाडं, पोखरा, शतडं,

...ग, गुल्मी, पेन्ताना व सलियाना या शहरांवरून दोती शहरा-पर्यंत ... आहे. या रस्त्यास टानाहुं येथें एक व पापूला येथें एक असे दोन फांटे फुटून ते अनुक्रमें, लमेजु व बैतुल, या शहरांकडे गेले आहेत. दोती शहरापासून निघालेला एक रस्ता जगरकोट व जुमला, या शहरांकडे गेला आहे.

३ नेपाळचा तिसरा विभाग ह्मणजे कोशी नदी ज्या प्रदेशांतून वाहते तो होय. हा विभाग 'सप्तकौशिकी' या नांवानें प्रसिद्ध आहे. मिलंची, इंद्राणी, भुटियाकोशी, तम्बा, (ताम्र) कोशी, लिखु, दूधकोशी आणि तामोर या सात नद्या मिळून कोशी अथवा कौशिकी नदी झालेली आहे. या सात नद्या तुषार क्षेत्रांत उगम पावून सारख्या अंतरानें वाहत गेल्या आहेत व वर्ष क्षेत्र ऊर्फ वडक्षेत्र या ठिकाणीं एकत्र होऊन, कौशिकी या नांवानें राजमहाल पर्वताजवळ गंगेस मिळाल्या आहेत. मिलंची नदी भुटियाकोशीस मिळाली आहे. ताम्रकोशी, लिखु व दूधकोशी या नद्या संकोशी (स्वर्णकोशी) नदीस मिळाल्या आहेत व पुढें या सर्व नद्या वडक्षेत्र ठिकाणीं एकत्र झाल्या आहेत. अरुण नामक नदीच्या दक्षिण तीरावर दूधकोशी नदीपर्यंत जो प्रदेश पसरलेला आहे, तो किरातदेश या नांवानें प्रसिद्ध आहे व अरुण नदीच्या उत्तर तीरावरील प्रदेश 'लिंबुआना' या नांवानें प्रसिद्ध आहे. या दोन्ही प्रदेशांचे लहान लहान सुभे (तालुके) केलेले असून, प्रत्येक सुभ्यांत चार पांच गांव आहेत. 'लिंबुआना' हा प्रदेश पूर्वीं सिकिम संस्थानच्या ताब्यांत होता परंतु नेपाळचा राजा पृथ्वीनारायण यानें तो नेपाळास जोडला. या प्रदेशांत विजापूर नामक एक सुपीक दरी असून, तींत 'विजापूर' हें मुख्य शहर आहे. कोशी नदीच्या दक्षिणेस जी तराई आहे तिला 'नेपाळची तराई' हें नांव असून, ती दोन भागांत विभागलेली आहे. पैकीं पहिल्या विभागास 'जंगल तराई' व दुसऱ्यास 'खरी तराई' असें म्हणतात.

तराई.

ही तराई पश्चिमेस 'औरका नदीपासून पूर्वेस मीची नदीपर्यंत पसर-

लेली आहे. हिची लांबी ११० कोस आहे. या तराईच्या उत्तरेस घाटी ' नामक पहाड व दक्षिणेस पुरैनिया जिल्हा आहे. ज्या ठिकाणीं, कोशी नदी नेपाळची तराई ओलांडून ब्रिटिश मुलखांत शिरते, त्या ठिकाणीं या तराईचा विस्तार केवळ सहा कोस आहे व कांहीं ठिकाणीं दहा कोस आहे. या अरण्यमय प्रदेशांत केवळ नदीच्या कांठीं जेथें थोडीशी सुपीक जागा आहे तेथें मात्र मनुष्यांची वस्ती आढळते. या तराईचा ' शालवन ' नामक जो उत्तरेकडील भाग आहे त्यांत, शाल, देवदार इत्यादि मोठमोठे वृक्ष होतात. चेरियाघाटी पहाडावर तर हे वृक्ष फार आढळतात. गण्डक आणि मीची या नद्यांमधील प्रदेशांत वाघमती, कमला, कोशी व कनकाई या मुख्य नद्या आहेत. यांपैकीं कांहीं नद्या उन्हाळ्यांत कोरड्या पडतात, परंतु बरसातीच्या दिवसांत या सर्व नद्या जलमय होऊन मोठ्या वेगानें वाहतात. या एकंदर वर्णनावरून असें दिसून येईल कीं, नेपाळ हा प्रदेश, मोठमोठे पहाड, नद्या, अरण्यें आणि सुपीक दऱ्या यांनीं व्यापिलेला असून, त्याचें सृष्टिसौंदर्यही प्रेक्षणीय असलें पाहिजे.

तराईच्या दक्षिणभागांस मुख्य तराई असें ह्मणतात. ओरेका नदीपासून कमला नदीपर्यंत ही तराई फार विस्तीर्ण असून तेथून पुढें कोशीनदीपर्यंत आकुंचित होत गेली आहे. कोशीच्या पूर्वेस मीचीनदीपर्यंतचा जो तराईचा भाग त्यास ' मोरंगदेश ' असें ह्मणतात. या देशाचा विस्तार २॥ कोसांपेक्षां अधिक नाहीं. या सगळ्या तराईवर एकट्या नेपाळ सरकारचाच अधिकार नसून खत्तावंग नामक ठिकाणीं राहणाऱ्या एका राजाचाही तराईच्या कांहीं भागावर अधिकार आहे. खत्तावंग येथें सैन्याचीं दोन पलटणें नेहमीं तयार असतात. या तराईतील ' परसा ' नामक ठिकाणीं इ. स. १८१५ सालीं क्याप्टन् सिलवी या इंग्रज योद्ध्याचा पराभव होऊन त्याच्या दोन तोफा नेपाळी लोकांनीं काबिज केल्या होत्या. मोठी तराई परसा, रोचत, शलयसप्तारि व मोहतारी या चार जिल्ह्यांत विभागलेली आहे. यांपैकीं पहिला जिल्हा गण्डकी नदीच्या कांठीं असून त्यांतून एक रस्ता काटमांडू शहराकडे गेला आहे. यामिनी नामक नदीच्या किनाऱ्यावर रोचत जिल्ह्याच्या सीमे-

...मती नदीपासून ७॥ कोसांवर सिमरौन नामक एका प्राचीन नगराचा अवशेष भाग दृष्टीस पडतो. येथें मोठें अरण्य असून विदेही जनकाची ' मिथिला ' नगरीही याच ठिकाणीं होती, असें सांगतात. हें मिथिला राज्य, त्याकाळीं हिमालयापासून गंगानदीपर्यंत पसरलें होतें. इ. स. १०९७ या वर्षी मिथिलेचा राजा नान्यपदेव यानें सिमरौन शहर वसविलें. इ. स. १३२२ या वर्षी दिल्लीचा बादशहा ग्यासुद्दीन तघलक यानें, नान्यपदेवाच्या वंशांतील हरिसिंहदेव राजाचा पराभव करून सिमरौन शहर उजाड करून टाकिलें. हरिसिंहदेव नेपाळांत पळून गेला व नेपाळच्या राजाचा पराभव करून आपण तेथील सिंहासनावर बसला. या प्रदेशीं वाघमती नदीच्या किनाऱ्यावर ' बाहखार ' नामक गांव असून तेथील हवापाणी फार उत्तम व प्रकृतीस हितकर आहे. इ. स. १८१४ यावर्षी इंग्रज आणि नेपाळी यांच्यामध्यें जी मोठी लढाई झाली, त्यावेळीं मेजर ब्रॉडरसन यानें या गांवास वेढा दिला होता.

' शलय सप्तारि ' हा जिल्हा वाघमती व कमला या दोन नद्यांच्या मध्यें आहे. या जिल्ह्याच्या सीमेवर ' जनकपूर ' नामक प्राचीन शहराचा पडका भाग दृष्टीस पडतो. मोहतारी जिल्हा, कमला व कोशी या नद्यांच्या मध्यें आहे. कोशीच्या दक्षिणतीरावर ' भानुखा ' नामक ठिकाणीं सैन्याची छावणी आहे. कोशीच्या पूर्वेस मीची नदीपर्यंत जो तराईचा भाग आहे, त्याची हवा फार वाईट व रोग उत्पन्न करणारी आहे. नद्यांचें पाणीही दूषित असून, सर्व वस्तु विषारी आहेत. हा भाग खेरीजकरून तराईचा इतर भाग चांगला सुपीक असून त्यांत अफू व तंबाकू यांचें मोठें उत्पन्न होतें. कोशीच्या पश्चिमेकडील जंगलांत हत्ती पुष्कळ असत, परंतु दिवसेंदिवस त्यांची संख्या कमी होत चालली आहे. ' मोरङ्ग ' नामक प्रदेशांत अद्याप पुष्कळ हत्ती सांपडतात, परंतु पूर्वीपेक्षां त्यांची उत्पत्ति आतां कमी होऊं लागली असल्याचें आढळून येत आहे.

सपाटीचा प्रदेश.

गोसाईस्थान शिखराजवळील धैवंग पर्वतापासून थेट दक्षिणेस, सप्तगड आणि सप्तकोशी यांच्यामध्यें जो उंच प्रदेश आहे, त्यास नेपाळांतील सपाटीचा प्रदेश असें म्हणतात. हा प्रदेश त्रिकोणाकार असून, त्याची पूर्व पश्चिम लांबी १० कोस व उत्तरदक्षिण रुंदी ७॥ कोस आहे. पश्चिमेस त्रिशूलगंगा व पूर्वेस इंद्राणी नदी आहे. हा प्रदेश चारी बाजूंनीं पर्वतवेष्टित असून, उत्तरेस धैवंग पर्वतमालेंतील शिवपुरी व काकन्रि, पूर्वेस महादेव पोखरा व देवचौक, पश्चिमेस नागार्जुन व दक्षिणेस शेषपाणि पर्वतमालेंतील चंद्रगिरी, चम्पादेवी व फुलचौका, हीं शिखरें आहेत. हा प्रदेश समुद्राच्या सपाटीपासून साडेचार हजार फूट उंच आहे. चारी बाजूंस लहान मोठीं गिरिशिखरें असल्याकारणानें, चारी बाजूंस लहान मोठ्या पुष्कळ दऱ्या आहेत. याशिवाय अणखी तीन लहान सपाटीचे प्रदेश असून, त्यांत जाणोरे रस्ते पहाडांतून गेले आहेत.

पर्वतमाला.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, नेपाळांतील सपाटीचा प्रदेश, चारी बाजूंनीं पर्वतवेष्टित असल्यानुळें, त्या प्रदेशांत जावयाचें, तर पहाडी मार्ग आणि जलप्रवाह यांतून जावें लागतें.या प्रदेशाचे उत्तरेस 'शिवपुरी' नामक पर्वत असून तो ८,०००फूट उंच आहे.याचीं शिखरें शाल व सिंदूर नामक वृक्षांनीं आच्छादिलेलीं आहेत. पश्चिमेच्या बाजूनें, हा पर्वत 'काकन्रि' नामक पर्वतास भिडलेला असून, त्या दोहोंच्या मध्यें, संगला नामक घांट आहे. काकन्रि पर्वत७००० फूट उंच आहे. पूर्वेच्या बाजूनें शिवपुरी पर्वत, मणिचूर नामक पर्वतास भिडलेला आहे, परंतु त्या दोहोंच्या मध्यें एकही घांट नाहीं. मणिचुर पर्वत ७,००० फुट उंच आहे. या प्रदेशाच्या थेट पूर्वेस महादेव पोखरा नामक शिखर असून तें ७,००० फूट उंच आहे. दाक्षिण आणि पूर्व या दिशांच्या मध्यें फुलचोया ऊर्फ फूलचौका नामक शिखर असून त्याजवर दाट जंगल

... पर्वत बराच लांब असून,८,००० फूट उंच आहे. महादेवपोखरा आणि फूलचौका या दोहोंच्या मध्यें रानीचोया नामक आणखी एक शिखर आहे. पश्चिमेच्या बाजूनें, ' महाभारत, नामक पर्वताची ओळ, वाघमती नदीपर्यंत लागून गेलेली आहे. फूलचोया पर्वताच्या एका अत्युच्च शिखरावर, सिंदूर वृक्षांचें दाट जंगल असून त्यांत 'भैरवी 'आणि 'महाकाल' या देवांचीं मंदिरें आहेत. या हिंदु लोकांच्या देवळाशेजारींच बौद्ध लोकांच्या 'मंजुश्री' नामक देवाचेंही देऊळ आहे. या स्थळीं उभें राहिलें असतां, नेपाळ प्रदेशाचें मनोहर सृष्टिसौंदर्य आणि हिमालयाचीं बर्फाच्छादित शिखरें यांची अनुपम शोभा एकसमयावच्छेदेंकरून दृग्गोचर होते व परमेशाच्या अतुलकुतूहलानें मन अगदीं आश्चर्यचकित होऊन नेत्र भक्तीपूर्वक अश्रु गाळूं लागतात !

या प्रदेशाच्या थेट दक्षिणेस, वर लिहिलेलें ' महाभारत ' शिखर असून त्याच्या पश्चिमेस वाघमती नदी आहे. दक्षिण व पश्चिम या दिशांच्यामध्यें ' चंद्रगिरि ' नामक पर्वत असून तो ६,६०० फूट उंच आहे. या पर्वताच्या पूर्वेकडील प्रदेशास ' हत्तीबन ' असें ह्मणतात व त्यांतून वाघमती नदी वाहते. चंद्रगिरीच्या एका शिखरास चम्पादेवी हें नांव आहे. पश्चिमेस, ह्मणजे महाभारत शिखराच्या पूर्वेस, इंद्रस्थान नामक शिखर आहे. हें शिखर १,५०० फूट उंच असून, त्याजवर घनदाट अरण्य लागून गेलें आहे. दक्षिण भागांत, एका उंच जागीं एक सरोवर असून त्याच्या कांठीं, दोन देवालयें आहेत. या देवालयांत,हत्तीवर बसलेला इंद्र व इंद्राणी यांच्या प्रतिमा आहेत. इंद्रस्थान पर्वतावर केशपूर आणि चव्वक या नांवांचीं दोन शहरें भरभराचीं आहेत.

वर दिलेल्या शिखरांशिवाय ' भीरवन्दी.' आणि ' कुमारपर्वत ' या नांवांचीं आणखी दोन शिखरें आहेत. हीं सर्व शिखरें उत्तरेच्या बाजूनें केवळ अरण्यमय असून, त्यांत चित्ते, वाघ, अस्वलें आणि रानडुकर यांचे भल्याचे थवे राहत असल्याचें आढळतात.

या प्रदेशासंबंधानें, आमच्या पौराणिक ग्रंथांत अशी माहिती याठिकाणीं पूर्वी एक मोठें वर्तुलाकार सरोवर होतें व वर लिहिलेले पर्वत त्याच्या किनाऱ्यास लागून उभे होते. बौद्ध लोक असें सांगतात कीं, मंजुश्री बोधिसत्व यानें त्या मोठ्या सरोवरांतील पाणी काढून टाकून, त्यास जमीनीचें रूप दिलें. त्यानें आपल्या तलवारीनें एका पहाडाचें शिखर तोडिलें व त्या मार्गानें सरोवरांतील पाणी बाहेर सोडून दिलें! फुलचोया व चम्पादेवी या पर्वतांच्यामध्यें, ज्या खळग्यांतून वाघमती नदी वाहते, तोच मंजुश्रीनें पाडिलेला वरील खळगा होय. हें मंजुश्रीचें उपपुराण जरी अतिशयोक्तिरूप आहे तरी एकाकाळीं वरील प्रदेश जलमय होता ही गोष्ट खरी आहे व पुढें पुष्कळ वर्षांनीं, नैसर्गिक परिवर्तनानें त्यास जमीनीचें रूप आलें असावें.

नद्या

वाघमती—शिवपुरी पर्वतावर उत्तरेच्या बाजूस, 'वाघद्वार' नामक ठिकाणीं ही नदी उगम पावून , पुढें, शिवपुरी व मणिचूर या दोन पर्वतांच्या मधून वाहत गेली आहे व पुनः शिवपुरी पर्वतावर येऊन , तेथील ' गोकर्ण ' नामक क्षेत्रीं, 'शिवाल 'ऊर्फ शिवा नामक नदीस मिळाली आहे. तेथून पुढें दक्षिणेस , केशचैत्य नामक प्राचीन बौद्ध क्षेत्रानजीक वहात येऊन, पुनः गंगेश्वरी नामक दरींतून जाऊन, पशुपतीनाथ नामक क्षेत्रास तीन बाजूंनीं वेढून पुढें ' काटमांडू ' शहरापर्यंत आली आहे. या नदीच्या उत्तर तीरावर पाटण व दक्षिण तीरावर काटमांडू हीं शहरें आहेत. पुढें ही नदी दक्षिणेस एका दरींतून वहात जाऊन ' चव्वर ' नामक एका प्राचीन शहरानजीक चंद्रगिरी पर्वताच्या सपाटीवर गेली आहे व तेथून चंपादेवी व महाभारत या शिखरांच्या मधून वाहात जाऊन फिङ्गा नामक पहाडावरून खालीं उडी टाकून ह्या प्रदेशाच्या बाहेर वाहात गेली आहे. शिवोपासक नेवार जातीचे लोक असें सांगतात कीं, या नदीची उत्पत्ति श्रीविष्णूपासून झालेली आहे. विष्णुमती, धोबिकिल्ला उर्फ रुद्रमती, मनोहरा आणि हनुमानमती या वाघमतीस मिळणाऱ्या मुख्य चार नद्या होत. विष्णुमती नदीस कृष्णवती असेंही ह्मणतात. ही नदी शिवपुरी पर्वतावरील नीलकंठ तीर्थांत उगम पावून विष्णुनाथ ना-

... पर्वतावरून खालीं उतरली आहे. तेथून पुढें एका दरींतून वाहात जाऊन नागार्जुन पर्वतामधून बालाजी व स्वयंभूनाथ या तीर्थांवरून काटमांडूच्या पश्चिमेकडून वाहात गेली आहे. पुढें दक्षिणेस वळून काटमांडूपासून थोड्या अंतरावर, वाघमती नदीस मिळाली आहे. या दोन्ही नद्यांच्या संगमावर एक मोठा घांट व अनेक देवालयें आहेत; त्या ठिकाणीं प्रेत जाळिलें असतां मृताच्या आत्म्यास सद्गति प्राप्त होते, अशी तिकडील लोकांची समजूत असल्यामुळें, ते आपलीं प्रेतें येथें जाळितात. वाघमती नदीच्या उत्पत्तीसंबंधानें एक अशी कथा प्रसिद्ध आहे कीं, 'उकुच्छंद' नामक चैाथा बुद्ध जेव्हां तीर्थयात्रेकरितां नेपाळांतील शिवपुरी पर्वतावर गेला, त्यावेळीं त्याच्या कांहीं अनुचरांनीं, त्या स्थळाच्या सृष्टिसौंदर्यानें मोहित होऊन, त्या ठिकाणीं बरेच दिवस राहण्याची इच्छा दर्शविली. परंतु, 'ऊकुच्छंद' यास अभिषेकासाठीं स्वच्छ पाणी पाहिजे होतें, त्याचा त्या ठिकाणीं केवळ अभाव असल्यामुळें, त्यानें जलप्राप्तीसाठीं देवाची आराधना करून आपला आंगठा त्या पर्वतांत खुपसला! तोंच असा चमत्कार झाला कीं, त्या ठिकाणीं एक स्वच्छ पाण्याचा झरा उत्पन्न होऊन तो जोरानें वाहूं लागला; तीच ही वाघमती नदी होय. पुढें ऊकुच्छंदानें त्या निर्झरोदकानें अभिषेक करून, आपल्या अनुयायांस बौद्ध धर्माची दीक्षा दिली. त्यावेळीं त्यांच्या मुंडनाचे जे केस पडले होते त्यांच्या शिळा झाल्या व ते केस ज्या कुंडांत टाकिले त्यास 'केशचैल' हें नांव प्राप्त झालें. त्यांतील कांहीं केस वाऱ्यानें उडून जाऊन दुसऱ्या एका ठिकाणीं पडले व तेथेंही एक जलधारा उत्पन्न झाली. हीच केशवती ऊर्फ विष्णुमती नदी होय. 'धाराही आणि 'वारिमती' हीं वाघमती नदीचीं आणखी दोन नांवें आहेत. 'सुवर्णवती आणि 'बदरी' या नांवांच्या दोन नद्या विष्णुमतीस येऊन मिळाल्या आहेत. रुद्रमती नामक एक नदी, शिवपुरी पर्वतांत उगम पावून, काटमांडू शहराच्या पूर्वेस दीड कोसावर, वाघमतीस, येऊन मिळाली आहे. हिच्या कांठीं हरिगांव आणि देवपाटण हीं गांवें आहेत. मनोहरा

ऊर्फ ' मनोमती ' नामक दुसरी एक नदी मणिचूड पर्वतांत
' पाटण ' शहरानजीक वाघमतीस मिळाली आहे. ' हनुमानमती ' महादेव पोखरा शिखरावरील एका सरोवरांत उगम पावून भाटगांव शहरास दक्षिणेच्या बाजूनें वळसा घालून कंसावती नदीसह चाङ्गनारायण नामक ठिकाणीं मनोहरा नदीस मिळाली आहे.

शेती.

नेपाळांतील शेतकीपासून होणारें उत्पन्न ऋतुमानावर अवलंबून आहे. नेपाळांतील पहाडी प्रदेशांत फळफळावळ आणि भाजीपाला फार चांगला होतो. हवापाण्याच्या अनुकूलतेप्रमाणें कांहीं भागांत वेत व बांबू यांचें बहुत उत्पन्न होतें. तथापि बहुतेक डोंगरी प्रदेशांत 'सुंदरी' आणि 'देवदार'या झाडांचीच उपज अधिक आहे. याशिवाय पिस्ते, अक्रोड, तूतफळ, राजबेरी, इत्यादि फळझाडेंही कोठें कोठें आढळतात. लहान पहाडांवर, जेथें उष्णता फार असते अशा ठिकाणीं द्राक्षें, ऊंस, जव, गहूं यांचें उत्पन्न होतें. कांहीं ठिकाणीं नारिंगें फार होतात. कधीं कधीं या पहाडी प्रदेशांत, इतका पाऊस पडतो कीं, त्यामुळें सगळ्या फळफळावळीचा नाश होऊन जातो ! परंतु इतर प्रदेशांत या पावसाचा फार उपयोग होतो. नेपाळांतील बहुतेक जमिनींत ऋतुपरत्वें तीन पेरण्या होतात. पावसाळ्यांत, ज्या ठिकाणीं गहूं व सरस होतो त्या ठिकाणीं वसंत ऋतूच्या सुरवातीस मुळे, लसूण, अळूं, इत्यादिकांचें उत्पन्न होतें. पर्वतांच्या उतरणीवरील सपाट जमिनींत हरभरे, गहूं व जवाचें पीक चांगलें येतें. ज्या जमिनींत सरस, मंजिष्ठ, ऊंस, व वेलची हीं होतात त्या जमिनीस पाणी फार लागतें. ज्यावर्षीं पाण्याचें दुर्भिक्ष असतें, त्यावर्षीं या जमिनींत मुळींच उत्पन्न होत नाहीं.

तांदूळ हें नेपाळांतील सर्व लोकांचें मुख्य अन्न असल्यामुळें राज्यांतील सर्व जमिनींत भातशेती होते. विशेषेंकरून सखल व पाणथळ जमिनींत भाताचीं शेतें अधिक आहेत. याशिवाय नेपाळांत आणखी एक प्रकारचे तांदूळ होतात त्यांस तद्देशीय लोक ' धीया ' असें ह्मणतात. या जातीच्या तांदु-

...ची मुळींच अवश्यकता नाहीं. पहाडांवरील कोरड्या जमिनींत हें धान्य पाण्याशिवाय पिकतें ! शिवाय जमीन नांगरण्याच्या कामीं नांगराचा उपयोग मुळींच करावा लागत नाहीं; कारण तें काम नेपाळी लोक आपल्या हातांनींच करितात ! नेपाळांतील तराईत, तांदूळ, अफू, पांढरा सरस, अळशी, तंबाकू व ऊंस यांचें मोठें उत्पन्न होतें. या तराईतून पाण्याचे लहान मोठे शेंकडो प्रवाह निरंतर वाहात असल्यामुळें तेथें पाण्याचें दुर्भिक्ष कधींही होत नाहीं. तराईच्या अरण्यमय भागांत, शाल, सफेत शाल, खैर, शिसू, अननस, मुलता, सोनी व भंज हीं झाडें व ज्यांच्यापासून कापूस, डामर, गोंद, वगैरे पदार्थ उत्पन्न होतात, अशीं झाडें फार होतात. पर्वतांच्या शिखरांवरील अरण्यांत सुंदरी, तिलपत्र, मंदार, कंजरू, तालिसपत्र, मंडल शिंगाडी, अक्रोड, चांफा, शिरस, देवदार व झाऊ, हीं झाडें फार आढळतात. शिवाय कांहीं फळझाडें व सुगंधी वृक्षही आहेत.

नेपाळांतील जमिनींत सर्व प्रकारचें धान्य पिकतें, इतकेंच नव्हे, तर निरनिराळ्या प्रकारच्या औषधीही उत्पन्न होतात. कित्येक सुगंधी वृक्षांपासून निरनिराळे रंग तयार करितां येतात. नेपाळी लोकांत या रंगाचा खप फार आहे. ‘ जोया ’ नामक वृक्षाच्या पानांच्या रसापासून चरस होतो. हा पदार्थ निशा उत्पन्न करणारा असून त्याचे जे भोक्ते आहेत त्यांच्यांत हा नेपाळी चरस फार प्रसिद्ध आहे. नेपाळी नेवारी लोक या वृक्षाचीं वाळलेलीं पानें कुटून त्यांचें एक प्रकारचें सूत काढितात व तें विणून त्याचे कपडे करितात.

खनिज पदार्थ.

नेपाळांतील डोंगरांत जे मूल्यवान् दगड आणि मिश्रधातू सांपडतात, त्यांवरून त्या प्रदेशांत कांहीं धातूंच्या गुप्त खाणी असाव्या असें अनुमान होतें. थोडीशी जमीन खणतांच कांहीं ठिकाणीं तांबें व लोखंड आढळतें. गंधक तर पुष्कळच सांपडतो व तो बाहेर प्रदेशींही पाठविला जातो. नेपाळांत जे अनेक प्रकारचे मिश्र आणि अशोधित धातू सांपडतात त्यांत कित्येक मूल्यवान् धातूंचाही बराच अंश आढळतो. याशिवाय त्या प्रांतीं जे अनेक

प्रकारचे दगड सांपडतात त्यांत मार्बल, स्लेटीचा दगड, चूनख
लाल व पिंवळ्या रंगाचे दगड हे मुख्य होत. गुर्खा नामक एका ठिकाणी एक प्रकारचा गुळगुळीत क्रिस्टल(crystal) पाषाण सांपडतो, तो जर चांगल्या रीतीनें घांसून तयार केला तर हिऱ्यासारखा चकाकतो. या प्रदेशांतील माती इतकी चिकट आहे कीं, उपयोग केल्यानंतर थोड्या दिवसांनीं ती सिमेंटासारखीं कठीण होते.

व्यापार उदीम.

नेपाळच्या व्यापारासंबंधानें माहिती देण्यापूर्वी कोणकोणत्या देशांशीं नेपाळचा व्यापार चालतो, हें पहिल्यानें सांगितलें पाहिजे. हा व्यापार मुख्यत्वें हिमालयाच्या पलीकडील तिबेट व नेपाळच्या दक्षिणेकडील ब्रिटिश हिंदुस्थान या देशांशीं चालतो. तिबेटांत जाण्यास जरी पुष्कळ पहाडी मार्ग (घांट) आहेत, तरी ते वर्षांतून बरेच दिवस बर्फानें आच्छादिलेले असतात. काटमांडूपासून तिबेटांतील ' नीलम ' उर्फ ' कुटी ' ठिकाणापर्यंत जो एक रस्ता गेला आहे तोच एकटा १४,००० फूट उंच आहे व दुसरा रस्ता ९,००० फूट उंच आहे. हा दुसरा रस्ता तिबेटांतील सानूपू उर्फ ब्रम्हपुत्रा नदीपर्यंत गेलेला असून नेपाळांतील नेवारी लोक याच मार्गानें तिबेटांत जातात येतात. नेपाळांतून तिबेटांत जाणारे व्यापाराचे जिन्नस बकऱ्याच्या पाठीवर लादून नेण्यांत येतात. घोडा अथवा खटारा या मार्गानें बिलकुल जाऊं शकत नाहीं. तिबेटांतून मीठ, सोहाग, कस्तूरी, चवऱ्या, हरताळ, पारा, सोनें, सुर्मा, मंजिष्ठ, चरस, इत्यादि पदार्थ नेपाळांत येतात व तेथून ब्रिटिश मुलुखांतही जातात. नेपाळांतून, तांबें, पितळ, लोखंड, कांसें, विलायती कपडा, लोखंडी पदार्थ, देशी कापड, मसाला, तंबाकू, सुपारी, पान व अनेक मूल्यवान् पाषाण, हे पदार्थ तिबेटांत जातात.

नेपाळी लोकांचा ब्रिटिश मुलखाशीं जो व्यापार चालतो तो नेपाळच्या सीमेवरील ७०० मैलांच्या टापूंतील शहरांशीं चालतो. नेपाळांतून या प्रदेशांत जो व्यापारी माल येतो त्याजवर नेपाळ सरकारानें कर बसविलेला आहे.

हिंदुस्थानांतून नेपाळांत जे व्यापाराचे जिन्नस पाठविण्यांत येतात त्याजवरही नेपाळ सरकाराकडून कर घेण्यांत येतो. हे कराचे रुपये नेपाळच्या सरकारी खजिन्यांत जमा होतात. नेपाळांतील श्रीमान लोक आपल्या हौसेखातर, नेपाळ सरकाच्या खासगी परवानगीनें जे परदेशी जिन्नस हिंदुस्थांतून नेपाळांत आणवितात, त्यांजवर जबर कर घेण्यांत येतो. परंतु मनुष्याच्या जीवनास अत्यंत अवश्यक असे जे जिन्नस हिंदुस्थानांतून नेपाळांत जातात, त्यांजवर फार थोडा कर घेतला जातो. हा कर वसूल करण्यासाठीं प्रत्येक बाजाराचे ठिकाणीं व रहदारीच्या रस्त्यांवर जकातीचीं ठाणीं केलेलीं आहेत. या जकाती कधीं कधीं मक्तयानेंही देण्यांत येतात. तंबाकू, वेलदोडे, मीठ, रोकडपैसा, हस्तिदंत व इमारतीचें लांकूड, या पदार्थांचा व्यापार खुद्द नेपाळसरकाराच्या हातीं आहे व त्याजवर नेपाळच्या राजकुटुंबांतील अथवा राजाच्या मर्जीतील एखाद्या मनुष्याची नेमणूक करण्यांत येते.

नेपाळांतील इतर जातींच्या लोकांपेक्षां नेवारी जातीचे लोक व्यापाराचे कामांत अधिक वाकबगार आहेत. या लोकांच्या बायकाही मोठ्या उद्योगी आहेत. नेवारी स्त्रिया व ' मगर ' नामक पहाडी लोक, कापसाचें कापड विणण्याच्या कामांत फार कुशल आहेत. हे लोक स्वतःच्या उपयोगाकरितां एक प्रकारचें जाडें कापड विणतात व परदेशांत पाठविण्याकरितां दुसऱ्या प्रकारचें बारीक कापड विणतात. नेपाळांतील साधारण प्रतीचे लोक एका प्रकारच्या कांबळीचा उपयोग करितात. या कांबळ्या भोटिये नामक एका जातीचे लोक आहेत ते तयार करितात. नेपाळांतील राजपुरुष व श्रीमंत लोक जे कपडे वापरतात ते बहुधा चीन व इंग्लंड या देशांतून येतात. स्वदेशांतील जाड्याभरड्या कपड्यांवर या लोकांची विशेष आवड असलेली दिसत नाहीं.

नेवारी लोक, लोखंड , तांबें, पितळ व कांसें यांचीं भांडीं करितात. पाटण व भाटगांव या शहरांत भांडीं तयार करण्याचे पुष्कळ कारखाने आहेत. तेथें मोठमोठ्या घंटाही तयार करण्यांत येतात. एक प्रकारच्या वृक्षाचे

सालीपासून कागद तयार करितात. या वृक्षास नेपाळी लोक जे फूल) व इंग्रजींत (Daphne) असें ह्मणतात. पहिल्यानें या वृक्षाची साल काढून ती एका भांड्यांत घालितात व त्यांत ऊन पाणी ओतितात. मग ती साल चांगली नरम झाल्यावर, उखळांत घालून कुटतात. अशा प्रकारें कुटून कुटून तिची गव्हांच्या कणिकेसारखी पूड झाल्यावर ती भिजवून व हातांनीं चांगली मळून तिचे कागद बनवितात व ते एका आडव्या दांडीवर वाळत टाकितात. वाळल्यावर ते घोंटून त्यांस गुळगुळीत करितात. काली नदीच्या किनाऱ्यावरील भोटिये लोक हे कागद तयार करितात. काटमांडू शहरांत, हे कागद सतरा आण्यांस तीन शेर या दरानें विकतात. हे कागद चांगले मजबूद व टिकाऊ असल्यामुळें त्यांचा पुष्कळ कामांत उपयोग होतो.

नेपाळी लोक तांदूळ व गहूं यांपासून एक प्रकारची दारू काढितात व ती पितात. या दारूस तिकडे ' रुक्सी ' असें म्हणतात. ही पितांना गोड लागते, परंतु कांहीं वेळानें इतर दारूप्रमाणेंच निशा उत्पन्न करिते !

नाणें.

पूर्वकालीं नेपाळांत जीं सोन्यारुप्याचीं नाणीं चालू होतीं, त्यांचीं नांवें व किंमत काय होती हें पुढील कोष्टकावरून दिसून येईलः—

नाण्याचें नांव	(सोन्याचीं नाणीं)	किंमत. रु. आ. पै.
अशरफी	... .	२०– ०–०
पाटले	... ...	८– ५–३
सूका	... .	६– २–८
सूकी	... ...	२– १–४
आणा	... ...	१– ०–८
दाम	... .	०– ४–२
	रुप्याचीं नाणीं	
रूपी	... ...	०–१२–४

[illegible]	... ...	०– ६–८
सूका	... ...	०– ३–४
सूकी	... ...	०– १–८
आणा	... .	०– ०–६
दाम	... ...	०– ०–३

तांब्याचीं नाणीं

पैसा	....	०– ०–२
दाम	... .	०– ०–॥

वरील नाण्यांपैकीं रुप्याची मोहोर मात्र सध्यां नेपाळांत चालते. हिची किंमत सहा आणे आठ पै आहे. तथापि, व्यवहारांत या नाण्याचा प्रत्यक्ष उपयोग फार कमी प्रमाणांत होतो. मात्र हिशोबाच्या कामांत त्याची फार आवश्यकता आहे.

अजकाल नेपाळांत, ज्या नाण्यांनीं व्यवहार चालतो त्यांचें कोष्टक येणेंप्रमाणें:— .

४ दाम = पैसा.
४ पैसे = आणा.
१६ आणे = रुपया.

यांशिवाय नेपाळांत, आणखी तीन प्रकारचीं तांब्याचीं नाणीं चालतात. इंग्रजी अंमलांतील बहरायच शहरापासून चम्पानेरपर्यंत जें तांब्याचें नाणें चालू आहे त्यास संयुक्त प्रांतांत (United provinces) ‘ ढिपले ’ अथवा ‘ मनूसुरी पैसा ’ असें म्हणतात, परंतु या नाण्याचें सर्वसाधारण नांव ‘ भोटिया - ऊर्फ गोरखपुरी पैसा असें आहे. संयुक्त प्रांतात एक रुपयास ७५ या प्रमाणानें या नाण्याची किंमत येते. परंतु नेपाळी लोक या आठ नाण्याचे बदला इंग्रजी नऊ पैसे घेतात; म्हणजे इंग्रजी राज्यांत ज्या नाण्याची किंमत पैशापेक्षां कमी होते त्या नाण्याची किंमत नेपाळांत इंग्रजी पैशापेक्षां अधिक होते ! हें नाणें, पाल्पा जिल्ह्यांतील तानसेन गांवीं जी टांकसाळ आहे तींत पाडितात.

नेपाळच्या पूर्वेकडील व उत्तरेकडील भागांत एक प्रकारचें ... चें नाणें चालतें. हें नाणें लोखंडाचें असून त्यास पैसा असें म्हणतात. इंग्रजी एक रुपया दिला असतां हे १०७ पैसे मिळतात. या पैशांत लोखंडाचा भाग अधिक असून तांब्याचा भाग कमी असतो. पूर्वेकडील पहाडावर, ज्यांत हे पैसे पाडिले जातात, अशा पुष्कळ टांकसाळी आहेत, त्यांत 'खिका मेक्छा' नामक गांवांत जी टांकसाळ आहे ती सर्वांत अधिक प्रसिद्ध आहे. सन १८६५ पासून, काटमांडू शहरांत जें एक प्रकारचें पातळ नवें नाणें चालू आहे तें गोलाकार आहे. हें नाणें यंत्राच्या साह्यानें पाडिलें जातें व त्याजवर राजाचें नांवही कोरण्यात येतें. या नव्या नाण्यामुळें, शहरांतील जुनें लोखंडी नाणें अजिबाद बंद झालें. काटमांडू शहरांतील टांकसाळींत हें नवें नाणें पाडितात.

पूर्वकाळीं, नेपाळांत जीं रुप्याचीं नाणीं चालू होतीं तीं हल्लींच्या नाण्यांपेक्षां आकारानें व किंमतीनें मोठीं होतीं. नेपाळच्या दक्षिणभागांत, नेपाळी मोहोरेच्या ऐवजीं इंग्रजी रुपया चालतो व कांहीं लोक इंग्रजी नोटाही घेऊं लागले आहेत. आजकाल, नेपाळांत जें चांदीचें नाणें चालू आहे त्याच्या एका बाजूस राजा सुरेंद्रविक्रमशाहदेव याचें चित्र व त्रिशूल व दुसऱ्या बाजूस गोरक्षनाथ व श्रीभवानी यांचीं चित्रें आहेत. मि. बेंडाल यांनीं असें लिहिलें आहे कीं, इसवी सनाच्या सातव्या शतकांत नेपाळांत चालू असलेलें जें नाणें सांपडलें आहे त्यावरून नेपाळच्या प्राचीन इतिहासासंबंधानें बरीच माहिती मिळते.* तथापि सोळाव्या शतकापूर्वींच्या नाण्यावरून, नेपाळच्या इतिहासांतलि कांहीं गोष्टींचा काल ठरविण्यास व राजांचीं नांवें समजून घेण्यास फार सुलभ जातें.

मापें आणि वजनें.

नेपाळांत सोनें, चांदी, व दुसरे धातू, कोरडे व प्रवाही पदार्थ मोजण्याची पद्धत कशी आहे हें खालील कोष्टकावरून समजेल.

---

* Bendall's, Cataiogue of Buddhist Mannscripts, Came rige, Introduction P. XI

सका[illegible]	रुपें
१० रती अथवा लाल=१ मासा	८ रती अथवा लाल=१ मासा
१० मासे =१ तोळा	१२ मासे =१ तोळा

तांबें, पितळ व इतर धातू

४॥ तोळे =१ कुणवा

४ कुणवे =१ टुकणी ऊर्फ पोया

४ टुकणी =१ शेर

या तीन शेरांचें वजन पांच इंग्रजी अवार्डुपाईस पौंडा इतकें असतें.

कोरडे जिन्नस	प्रवाही पदार्थ
२ मनाका = १ कुडवा	४ दियाकी = १ चौथाई
४ कुडवा = १ पाथी	२ चौथाई = १ अर्धा टुकणी
२ पाथी = १ मूडी	२ अर्ध्याटुकण्या = १ टुकणी
१ पाथी इंग्रजी ८ अवार्डुपाईस	४ टुकण्या = १ कुडवा = १ शेर
पौंडाबरोबर असते.	४ कुडवे = १ पाथी

कालमापन.

सांप्रतकाळीं, नेपाळांतील धानिक लोक मात्र युरोपियन घड्याळांचा उपयोग करितात. परंतु प्राचीनकाळापासून सगळ्या भरतखंडांत जी कालमापनपद्धति चालत आलेली आहे, तिचाच उपयोग सामान्य प्रतीच्या नेपाळी लोकांत अधिक होतो. ही पद्धत येणें प्रमाणें:—

६० विपळें = १ पळ

६ पळें = १ घडी = २४ मिनिटें

६० घडी = १ दिवस (२४ तास)

सकाळीं, हातावरील केंस स्पष्टपणें मोजतां येण्याइतका सूर्यप्रकाश पडला ह्मणजे दिवसाचा आरंभ झाला असें नेपाळी लोक समजतात.

प्राचीन काळीं, नेपाळी लोक, एका तांब्याच्या वाटीस एक भोंक पाडून, ती वाटी पाण्यानें भरलेल्या दुसऱ्या मोठ्या भांड्यांत सोडीत असत व त्या

छिद्रावाटे पाणी आंत जाऊन ती वाटी बुडाली म्हणजे १ घटि... समजून कालमापन करीत असत. अशा प्रकारें केलेल्या कालमापनांत कधीही अंतर पडत नसे. आपल्या महाराष्ट्रांतही, लग्नकार्याच्या वेळीं, अद्याप याच पद्धतीनें मुहूर्तकालमापन करितात.

आपण, अहोरात्राचे दिवस आणि रात्र असे दोन विभाग करितों. परंतु नेपाळी लोक अहोरात्राचे चार विभाग करितात. हे विभाग येणें प्रमाणें:—प्रभातकालापासून दुपारचा एक वाजेपर्यंत पहिला; एक वाजल्यापासून संध्याकालापर्यंत म्हणजे ७ वाजेपर्यंत दुसरा; संध्याकालापासून मध्यरात्रीपर्यंत तिसरा व मध्यरात्रीपासून पहांटेपर्यंत चौथा.

जातितत्त्व.

मोठमोठ्या पर्वतांच्या ओळींनीं नेपाळ देश छिन्नभिन्न झालेला असल्यामुळें, जातींची संख्याही बरीच वाढली आहे. नेपाळांतील डोंगरांतून अनेक पहाडी जातींचे लोक राहतात व हेच नेपाळांतील मूळचे राहणारे (Original tribes)लोक होत. काली नदीच्या पूर्वेकडील उंच प्रदेशांत ज्या जाती राहतात, त्यांचीं नांवें येणें प्रमाणें:—(१) मगर जात. भेरी व मत्स्यांग्री या नद्यांमधील पहाडांत, या जातीच्या लोकांची वस्ती आहे. हे लोक फार साहसी असून, विशेषेंकरून लष्करी नोकरीवर ते आपला चरितार्थ चालवितात. (२) गुरंग जात. मगर जातीच्या लोकांच्या वस्तीपासून हिमालयाच्या अरण्यमय प्रदेशापर्यंत पहाडापहाडातून या जातीचे लोक राहतात. (३) नेवार जात. काटमांडू शहरानजीक 'ने'नामक एक स्थान आहे, तेथें हे लोक प्राचीन कालापासून रहात आले आहेत. नेपाळांतील शेतकी व इतर कामें हेच लोक करितात, तथापि ते भिकारी आहेत. (४) नेपाळच्या पूर्वेकडील डोंगरांवर, लिम्बू ऊर्फ याकथुंवा व (५) किराती 'वारवोम्बा' या जातींचे लोक राहतात. (६)लेप्चा जात. या जातीचे लोक दार्जिलिंग व सिकीमच्या पश्चिमेस नेपाळ संस्थानच्या सरहद्दीच्या आंत राहतात. यांशिवाय भोटिया, कुशवार, देनवार, हायु, वोटिया, रांवो, सियेना, काटभो-

...।, था-सेन, सर्प, दूरे ऊर्फ दहरी, व्राम्, बोकमा, चेपां, कुसु-दा, थारू, सूनवार, मूर्मी इत्यादि अनेक जाती आहेत.

काली ऊर्फ शारदा या नदीच्या पश्चिमेस 'कुमांयु' नामक एक स्थान आहे, तेथें इसवी सनाच्या बाराव्या शतकांत, राजपुतान्यांतून गुरखे येऊन राहिले. या गुरखे लोकांचे उपाध्याय पांडे नामक ब्राह्मण असून, नेपाळांतील सर्व जातींत त्यांस मोठा मान आहे.

इंग्रज ग्रंथकारांचें असें अनुमान आहे कीं, नेपाळची लोकसंख्या सुमारें वीस लक्ष असावी; परंतु नेपाळ दरबारानें केलेल्या खानेसुमारीवरून असें समजतें कीं, नेपाळची लोकसंख्या ५२ लाखांपासून ५६ लाखांपर्यंत आहे. तथापि ही खानेसुमारी अव्यवस्थित रीतीनें केलेली असल्यामुळें, या आंकड्यांवर सर्वस्वीं विश्वास ठेवितां येत नाहीं, हें उघडच आहे.

वर ज्या पहाडी लोकांच्या जाती दिल्या, त्यांशिवाय बोधनाथ व स्वयंभूनाथ यांच्या मंदिरांनजीक कांहीं भुतानी व तिबेटी लोकही राहतात. काटमांडू शहरांत कांहीं काश्मीरी लोक व इराणी मुसलमान व्यापारी आहेत. हे लोक फार प्राचीन कालापासून या शहरांत राहात आले आहेत. नेपाळांत देव व देवी यांचीं असंख्य मंदिरें असल्यामुळें, ब्राह्मण व पुरोहित यांची संख्याही बरीच मोठी आहे. या शिवाय प्रत्येक गृहस्थास एकेक पुरोहित लागतो; हा पुरोहित, आपल्या यजमानाकडून मिळणारी दक्षिणा, पूजाद्रव्य व ब्राह्मणास दान दिलेली जमीन, यांजवर आपला चरितार्थ चालवितो. या सर्व पुरोहितांवर राजगुरूचा अधिकार चालतो व त्याची आज्ञा कोणीही मोडूं शकत नाहीं. नेपाळी लोकांची ब्राह्मणावर फार भक्ति आहे. कोणावर कांहीं संकट आलें किंवा कोणी आजारी पडला तर त्यावेळीं ब्राह्मणभोजन घालण्याची नेपाळांत चाल आहे.

नेपाळांत जसे कित्येक ज्ञानी ब्राह्मण आहेत तसे ज्योतिषीही आहेत. कित्येक पुरोहित ब्राह्मणही ज्योतिषाचा धंदा करितात. नेपाळी लोकांचा ज्योतिषावर इतका विश्वास आहे कीं, औषधाच्या एका थेंबापासून तों लढाईपर्यंत प्रत्येक गोष्टींत ज्योतिषाकडून मुहूर्त विचारून घेतल्याशिवाय, ते बिल-

कूल पुढें पाऊल टाकावयाचे नाहींत ! नेपाळांत वैद्यकीचा धंद[illegible] निराळीच जात आहे. या जातींतील प्रत्येक गृहस्थ एका नेपाळी कुटुंबा-चा वैद्य असतो. नेपाळांत सार्वजनिक दवाखाना मुळींच नाहीं. जे लोक का-रकुनाचें व हिशेब ठेवण्याचें काम करितात ते मूळचे नेवार जातीचे लोक अ-सतां, केवळ धंद्यामुळेंच त्यांची एक निराळी जात बनून गेली आहे !

नेपाळांत पूर्वी जशी अराजकता होती तशी आतां नाहीं. उलट सर जंग-बहादुर यांच्या वेळेपासून नेपाळची एकसारखी उन्नति होत चालली आहे. परंतु नेपाळच्या न्यायखात्याचा जो मुख्य अधिकारी आहे त्याचा महिन्याचा पगार अवघा दोनशें रुपये असल्यामुळें, प्रतिवादी व आरोपी यांजकडून तो लांच घेतो व अशा प्रकारें अनेक अपराधी लोक न्यायगृहांतून दोषमुक्त हो-ऊन बाहेर पडतात ! नेपाळचा बंगाल देशाशीं पुष्कळ वर्षांपासून संबंध असून शेंकडो बंगाली लोक नेपाळांत जाऊन राहिले आहेत. या लोकांनीं आपला आचार विचार नेपाळी लोकांच्या पद्धतीप्रमाणें ठेविल्यामुळें त्यांची आतां नेपाळी लोकांतच गणना होते. वास्तविक पाहतां हे बंगाली लोक पहि-ल्यानें जे नेपाळांत गेले ते धर्मप्रसार व व्यापार या कारणासाठीं गेले, परंतु तेथें त्यांनीं कायमची वसाहत केल्यामुळें त्यांचा बंगालीपणा अजिबाद नष्ट होऊन ते आतां पुरे नेपाळी बनून गेले आहेत !

वर ज्या जातींसंबंधानें संक्षिप्त माहिती दिली, त्या जातींशिवाय नेपाळांत आणखी कितीतरी जाती आहेत. ‘ काठभोटिया ’ जातीचे लोक ज्या प्रदे-शांत राहतात, त्याच्या आसपासच्या पहाडांतून ‘ थकसिया ’ व ‘ पाकिया’ या जातींचे लोक राहतात. याशिवाय पहियापधि, वायु, याकांयु, खस ऊर्फ खासिया, कोली, डोम, राझी, हरि, गढवाली, कुमेत, डोगरा, कक,बंब, गकर, व दर्डुवढुंधर या जाती नेपाळच्या पश्चिम भागांत राहतात व कोच, वोदो, धि-माला, कीचक, पल्लु, कुक्ष, दर्हि ऊर्फ दरी, वोधया व अवलिया, या जाती नेपाळच्या दक्षिणेस जी तराई आहे तिच्या आसमंतात् प्रदेशांत राहतात. याशिवाय धंद्यांवरून झालेल्या जाती आहेत त्या येणें प्रमाणेः— सार्की (चां-भार),कामि (लोहार), सुनार (सोनार),गाइन (गाणारा वाजविणारा),

...), या जातीचे लोक आपल्या स्त्रियांकडून वेश्येचा धंदा कर-वितात, दमाइ (शिंपी), आगरी (खणणारा), किन्नरी (कुंभार), नाय (कसाई),चमारवल (भंगी),डोंगवामुगी (वाजंत्री), कौ (लोहार), धूसी (अशोधितधातु शोधणारे), नौ (न्हावी), संगत (धोबी), तट्टि (प्रेताचे कपडे शिवणारा), गथा (माळी), सावो (तुंबडी लावून रक्त काढणारा), छिप्पी (शिंपी), दकमी (शिल्पशास्त्री), व लोहोंगकामि (पाथरवट).

वस्त्राच्छादनपद्धति.

नेपाळांतील सर्व जातींत नीटनेटकेपणांत गुरखा जातीचे लोक फार श्रेष्ठ आहेत. हे लोक निळ्या रंगाचे कपडे वापरतात. निळा पायजमा, निळें कुडतें व निळें शिरस्त्राण घालून कंबरे सभोंवतीं कित्येक हात लांबीचा निळा कंबरबंद गुंडाळितात व त्यांत एक मोठा सुरा लटकावून देतात. या सुऱ्यास नेपाळांत कुकडी असें ह्मणतात. थंडीच्या दिवसांतही गुरखे लोक हेच कपडे वापरितात. परंतु त्यांच्या आंतील अंगास कापूस लावून घेतात. श्रीमंत लोकांच्या पोषाखाची तऱ्हा याहून निराळी आहे. हे लोक आपल्या पायजम्याचा अंतर्भाग बकऱ्याचे केंसांनीं मढवून घेतात व डोक्यास चित्रविचित्र रंगांच्या कापडांच्या तुकड्यांची टोपी घालितात. अधिकारी लोक ज्या टोप्या वापरितात, त्यांस कलाबतूची फीत लाविलेली असते.

नेवारी लोक कंबरेपर्यंत पोषाक करितात व थंडीच्या दिवसांत जाड सुताच्या कापडाचे किंवा लोकरीचे पायजमे घालितात. त्यांच्यांत जे व्यापारावर श्रीमंत झालेले आहेत व ज्यांस वरचेवर तिबेटांत जावें लागतें असे लोक चुण्या घातलेला पायजमा, उंची कापडाचा लांब आंगरखा व लोंकरीच्या टोप्या वापरितात. ‘ हरिसिद्धि ’ नामक ठिकाणीं जे नेवारी लोक राहतात, ते स्त्रियांचा घागरा किंवा संन्याशाच्या कफनीप्रमाणें पायांच्या टांचेपर्यंत लांब अंगरखा घालितात. हे लोक ज्या टोप्या घालितात त्या काळ्या कपड्याच्या बनविलेल्या असून, त्यांच्या आंतील भागांस कापसाची मऊ गादी लाविलेली असते.

नेपाळवर्णन.

नेपाळांतील सर्व जातींच्या लोकांचा पोषाक बहुधा वर लि[illegible] असतो, तथापि स्थानपरत्वें कांहीं जातींच्या लोकांच्या पोषाकाची तऱ्हा याहून निराळी आढळते. नेपाळांतील सर्व जातींच्या स्त्रिया, एक प्रकारचा चुण्या पाडलेला घागरा वापरितात. या घागऱ्याचा पुढील भाग जमिनीवर लोळण्याइतका लांब असतो, परंतु मागचा भाग याहून आंखूड असतो. राजघराण्यांतील स्त्रिया व श्रीमंत लोकांच्या बायका जो घागरा नेसतात त्यास ६० पासून ७० गज लांबीचें कापड लागतें ! हें कापड फार बारीक असतें. परंतु श्रीमंत लोकांच्या बायका असल्या पोषाकांत कधींही बाहेर पडावयाच्या नाहीत. फक्त आपल्या कुलाची मर्यादा ठेवण्याकरितांच त्या असला पोषाक करितात व त्यामुळें त्यांस इतर स्त्रियांकडून मोठा मान मिळतो. याशिवाय नेपाळी स्त्रिया, इतर हिंदु स्त्रियांप्रमाणें साडी अथवा शालही परिधान करितात. परंतु शिरस्त्राणादाखल एकाद्या विशेष कपड्याचा उपयोग करण्याची त्यांच्यांत चाल नाहीं. नेवारी लोकांच्या बायका आपल्या केसांचे बुचडे बांधितात, परंतु इतर जातींच्या स्त्रिया आपल्या केसांच्या वेण्या बांधून त्या तशाच पाठीवर लोंबत ठेवतात. नेपाळी स्त्रियांस कपड्यांची फार आवड आहे व यथाशक्ति निरनिराळ्या प्रकारच्या कपड्यांनीं आपलें शरीर शृंगारण्यांत त्यांस मोठा आनंद वाटतो. श्रीमंत लोकांच्या स्त्रिया, आपलें सौंदर्य अधिक खुलावें या हेतूनें, डोकींत सोन्याचीं किंवा पितळेचीं फुलें, गळ्यांत सोन्याच्या मण्याच्या किंवा मोत्यांच्या माळा, हातांत आंगठ्या, कानांत बाळ्या व कर्णफुलें व नाकांत नथ घालितात. जे लोक मोठे श्रीमंत आहेत त्यांच्या स्त्रिया हिऱ्यामोत्यांचे व सोन्याचे दागिने घालितात. भोटिया जातीच्या असभ्य स्त्रिया आपल्या दागिन्यांत निरनिराळे मूल्यवान् पाषाण व मोतीं, यांचाच फार उपयोग करितात.

नेपाळी स्त्रियांस सुवासिक फुलांचा फार शोक आहे. फुलांचे गजरे करून ते माळणें त्यांस फार आवडतें. सणाच्या दिवशीं तर नेपाळी स्त्रिया इतकीं फुलें माळितात कीं, पहाणारास त्यांच्या मस्तकावर एकादें फुलझाड फुललें आहे कीं काय असें वाटतें ! नेपाळांतील वारांगनाही फुलांचा फार उपयोग करितात.

...मुळीं स्त्रीनें एखाद्या झाडावर एखादें फूल पाहिलें, तर तें तोडून घेत-ल्याशिवाय पुढें पाऊल टाकणें तिच्या जिवावर येतें !

नेपाळांतील राजपुरुषांच्या पोषाकाची तऱ्हा याहून निराळी आहे. ते, मोत्यांनीं आणि हिऱ्यांनीं मढविलेलीं कलाबतूचीं मंदिलें आपल्या मस्तकीं धारण करितात व अंगांत पायघोळ रेशमी अंगरखा घालितात. पायांत रेशमी पायजमा व पादत्राण घालितात व कंबरेसभोंवतीं गुंडाळलेल्या दुपट्यास तलवार लटकावून देतात. नेपाळचे माजी पराक्रमी प्रधान राणा जंग-बहादूर हे जो मुकुट आपल्या मस्तकीं धारण करित असत, त्याची किंमत दीड लक्ष रुपये होती ! नेपाळी सैन्यांतील सेनापती, इंग्रजी लष्करांतील सेनापतीसारखा पोषाक करितात.

खाणें पिणें.

नेपाळांत, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चारवर्ण व त्यांपासून झालेल्या शेंकडो जाती असतां, त्यांच्या खाण्यापिण्याच्या बाबतींत, फारशी भिन्नता असलेली दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. नेपाळांतील ब्राह्मण लोक, इतर जातींच्या ब्राह्मणांप्रमाणेंच निवृत्तमांस आहेत. परंतु त्यांशिवाय इतर सर्व जातींचे लोक पक्कें मांसहारी आहेत. गुरखेलोक बहुधा, उत्तरेकडील पहाड व तराई, यांतील बकऱ्यांचें मांस खातात. हे लोक शिकारीचे तर फार शोकी आहेत. श्रीमंत गुरखे लोक तर शिकारीच्या कामीं फारच पटाईत आहेत. त्या लोकांचा बहुतेक वेळ रानांत जाऊन रानडुकरें, हरणें, ससे इत्यादि जनावरांची शिकार करण्यांत जातो. त्या जनावरांचें मांस गुरखे लोक मोठ्या आवडीनें खातात. कित्येक हौशी लोक, रानडुकराचे बच्चे पाळितात व त्यांस चांगलें खावयास घालून खूप धष्टपुष्ट बनवितात. लहानपणापासून माणसांच्या सहवासांत राहिल्यानें हे डुकर पुढें इतके माणसाळतें कीं, कुत्र्याप्रमाणें, धनी जाईल तिकडे तें जातें. नेवारी लोक, रेडे, मेंढरें, बकरीं इत्यादि जनावरें व हंस, मयूर इत्यादि पक्षी, यांचें मांस खातात. विशेषेंकरून, सिंध व पंजाब प्रांतात दुंबा नामक जातीचे जे बकरे आहेत, त्यांचें मांस नेवारी लोकांस फार

फार आवडतें. नेपाळांतील "मगर" व "गुरंग" या जातीचे ले
हिंदु ह्मणवितात व त्यांपैकीं मगर जातीच्या लोकांस डुकरांचे मांस फार आवडतें! हे लोक ह्मैस किंवा रेडा यांचें मांस खात नाहींत, परंतु गुरंग जातीचे लोक तें मोठ्या प्रेमानें खातात. त्यांतही आश्चर्याची गोष्ट ही कीं, हे गुरंग लोक डुकराच्या मांसास नुसता स्पर्शही करित नाहींत ! लिंबु, किराती, लेप्चा इत्यादि बौद्ध धर्मीय जातींचे लोकांची भोजनपद्धति नेवारी लोकांच्या पद्धतीसारखीच आहे.

नेपाळांतील मध्यम प्रतीचे लोक जरी नित्य मांसाहार करितात, तरी गरीबगुरीब लोकांस तसें करितां येणें शक्य नाहीं. वस्तुतः ते जरी मांसप्रिय आहेत तरी द्रव्याभावामुळें त्यांस आपली मांसलोलुपता आंवरून धरणें भाग पडतें. या लोकांचें मुख्य अन्न ह्मटलें ह्मणजे शाकान्न हें होय. तांदूळ, निरनिराळ्या प्रकारच्या शाकभाज्या, मुळे, कच्ची किंवा शिजविलेली लसूण व कांदे यांचा या लोकांच्या जेवणांत फार उपयोग होतो. खाल्लेलीं कंदमुळें चांगल्या रीतीनें पचन व्हावीं यासाठीं, हे लोक एकप्रकारची चटणी तयार करितात. ही चटणी फार घाणेरडी व दुर्गंधयुक्त असते.

नेवारी व दुसऱ्या नीच जातीचे लोक दारू फार पितात. आपली तहान भागविण्यासाठीं गहूं व तांदूळ, यांपासून हे लोक एक प्रकारची दारू काढितात; तिला 'रुकसी' असें ह्मणतात. नेपाळांतील उच्च श्रेणीचे लोक मद्यपान करीत नाहींत, कां कीं, इतर जातींस ज्यांनीं आपल्या सद्वर्तनानें धडा घालून द्यावयाचा, त्या जातींच्या लोकांनीं जर मद्यपान केलें तर त्यांची सर्वत्र छी थू होते. या श्रेष्ठ जातींच्या लोकांपैकीं एखादा मनुष्य मद्यपान करून जर रस्त्यांत पडलेला आढळला, तर त्यास जातिबहिष्कृत करण्यांत येतें. एकंदरींत, मद्यपाननिषेधाच्या बाबतींत नेपाळांतील उच्च प्रतीच्या लोकांत जे हे निर्बंध आहेत ते फार चांगले व अनुकरणीय आहेत यांत संशय नाहीं. तथापि हल्लीं इंग्रजी सुधारणेचा नेपाळांत प्रवेश झालेला असून, त्याजबरोबरच ब्रँडी, व्हिस्की, शाम्पेन इत्यादि मादक पदार्थांचाही, नेपाळी लोकांत प्रसार होत चालला आहे, ही दुःखाची गोष्ट होय !

...क, आपल्या हौसेखातर जें मद्य पितात, तें ते आपल्या घरांतच तयार करितात व त्यामुळें त्यांस सरकारास दारूवरचा कर द्यावा लागत नाहीं. परंतु, अशाप्रकारें घरांत काढिलेली दारू जर कोणी बाजारांत नेऊन विकील तर त्यास सरकारचा कर दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. नेवारी लोक रोज मद्य पितात. नेपाळांतील पहाडी लोकही या रुकसी दारूचे मोठे भोक्ते आहेत.

सर्व नेपाळी लोक चहा पितात. परंतु ज्यांच्यापाशीं चहा विकत घेण्यास पैसा नाहीं, असे नीच जातीचे दरिद्री लोक मात्र तो पीत नाहींत. नेपाळांत येणारा चहा मुख्यत्वें तिबेटांतून येतो. नेपाळी लोक पिण्यासाठीं दोन प्रकारचा चहा तयार करितात. पहिला प्रकार असा कीं, दालचिनी, लिंबाचा रस व इतर मसाल्याचे पदार्थ घालून चहा उकळावयाचा; व दुसरा प्रकार असा कीं, चहा चांगला उकळला ह्मणजे त्यांत दूध व तूप घालून मग तो प्यावयाचा ! याशिवाय, चहाचें पीठ करून तें खाण्याचाही नेपाळी लोकांत प्रघात आहे. हें पीठ तयार करण्याची कृति अशी आहे कीं, एका भांड्यांत चरबी व तांदूळ धुतलेलें पाणी किंवा दुसरा एकादा क्षारयुक्त पदार्थ घालून त्यांत चहाचा ताजा पाला टाकावयाचा व कांहीं वेळानें तो चांगला फुगला ह्मणजे तव्यासारख्या एका भांड्यांत घालून चुलीवर ठेवावयाचा. अशाप्रकारें त्यांतील ओलसरपणा जाऊन, तो चांगला कोरडा झाला ह्मणजे त्याची पूड करावयाची. नेपाळी लोक ही पूड दुधांतून घेतात. चिनी भाषेंत, या पेयास 'तुंकाऊ' असें ह्मणतात. इंग्रजी पद्धतीनें तयार केलेल्या चहास नेपाळांत मुळींच महत्त्व नाहीं. फक्त, जे नेपाळी गृहस्थ ब्रिटिश अंमलांतील कलकत्यासारख्या मोठ्या शहरीं राहून नेपाळांत गेलेले आहेत, ते मात्र इंग्रजी चहाचा उपयोग करितात.

विवाहपद्धति.

नेपाळी लोकांत, एका पुरुषानें अनेक स्त्रियांशीं लग्नें करण्याची चाल आहे एवढेंच नव्हें, तर तसें करणें हें एक मोठें भूषण आहे, असें ते मानितात !

श्रीमंत लोक तर, आपल्या घरांत कित्येक स्त्रिया बाळगतात
ज्याच्या स्त्रिया अधिक असतील, त्यास लोकांकडूनही मोठा मान मिळतो व यामुळें, असा विलक्षण प्रकार दृष्टीस पडतो कीं, कित्येक श्रीमंत लोकांच्या पन्नास साठ बायका असतांही, त्यांची विवाहलालसा बिलकूल कमी न होतां ते आणखी लग्नें करण्याची तयारी चालवितच असतात ! परंतु, याप्रमाणें अनेक लग्नें करण्याची चाल नेपाळांत जितकी प्रबल आहे, तितकीच विधवाविवाहास तेथें सक्त मनाई आहे. पूर्वकालीं या प्रदेशांत अनेक पतिव्रता स्त्रिया आपल्या पतीच्या शवाबरोबर सहगमन करीत असत व अशा स्त्रियांचा स्वार्थत्याग, कठोरहृदयी नेपाळी लोकांच्या अंतःकरणांत चांगलाच धर्मप्रकाश पाडीत असे. परंतु हल्लीं ही सती जाण्याची चाल हिंदुस्थानांतील इतर प्रांतांप्रमाणें नेपाळांतही नामशेष होऊन गेली आहे.

नेपाळचे पूर्वींचे राजपुरुष केवळ स्वच्छंदानुवर्ती असल्यामुळें राज्यांत सर्वत्र बेबंदशाही माजून राहिली होती व राजकुलोत्पन्न पुरुषांच्या आपसांतील द्वेषास बिच्याऱ्या प्रजेस आपल्या स्वास्थ्याचा प्रत्यहीं बळी द्यावा लागत असे. परंतु, नेपाळाचे माजी मुख्य प्रधान जंगबहादुर यांनीं नेपाळच्या राजास पदच्युत करून, सर्व राज्यसत्ता आपल्या हातीं घेतल्यापासून नेपाळांत सर्वत्र स्वस्थता आहे. नेपाळचें सिंहासन आपण बळकाविल्यामुळें देशांतील पुष्कळ मोठे लोक आपले शत्रु झालेले आहेत, असें जेव्हां जंगबहादूर यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें, तेव्हां त्यांनीं मोठ्या दूरदर्शीपणानें नेपाळांतील मोठमोठ्या खानदानीच्या व कुलीन घराण्यांशीं आपला शरीरसंबंध केला व आपल्याशीं शत्रुत्वानें वागणाऱ्या सरदार लोकांच्या मुलींचे आपल्या पुत्रपौत्रांशीं विवाह करून टाकिले. अशा प्रकारें निर्वेधपणा प्राप्त झाल्यावर इ. स. १८५१ त ते इंग्लंडास गेले व तेथें एक वर्ष राहून इंग्रज लोकांच्या चालीरीतींचें व राज्यव्यवस्थेचें त्यांनीं सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें. पुढें सन १८५२, ता. ८ फेब्रुवारी रोजीं, ते पुनः नेपाळांत आले व पहिल्यानें त्यांनीं नेपाळचे जुने फौजदारी कायदे रद्द करून प्रजाजनांस सुखावह होतील असे नवे फौजदारी कायदे केले. सती जाण्याच्या चालीस प्रतिबंध करण्याकरितांही

...वे कायदे केले; त्यांचा सारांश असा आहेः— (१) ज्या स्त्रीस मुलगा झालेला असेल, तिला सती जातां येणार नाहीं; मग तसें करण्याची तिची इच्छा असो वा नसो. (२) स्मशानांत गेल्यावर जी स्त्री आपल्या मृत पतीच्या चितेस पाहून भिईल, व अग्निप्रवेश करितांना कंपित होईल, तिला सती जाऊं दिलें जाणार नाहीं. हे नवे नियम होण्यापूर्वी या बाबतींत तिकडे अशी भयंकर चाल होती कीं, जर एखाद्या स्त्रीनें सती जाण्याची आपली इच्छा एकवेळ प्रदर्शित केली व पुढें स्मशानांत गेल्यावर तेथील प्रचंड अग्नि व भयंकर देखावा पाहून, तिनें सती जाण्याचें नाकबूल केलें, तर तिकडे बिलकूल लक्ष न देतां तिचे आप्त तिला बळजोरीनें अग्नीमध्यें लोटून देत असत. कदाचित् त्या स्त्रीनें पळून जाण्याचा यत्न केला तर ते दांडक्यानें तिचें कपाळ फोडीत असत व तिला विस्तवांत ढकलून देत असत. तर अशा या भयंकर अत्याचाराच्या जबड्यांतून आपली मुक्तता केल्याबद्दल नेपाळांतील महिलावर्गानें जंगबहादूर यांचे मोठे आभार मानिले पाहिजेत. वरील कायद्याच्या अंमलबजावणीच्या वेळीं नेपाळांतील ब्राह्मण पुरोहितांनीं जंगबहादूर यांच्या विरुद्ध फार ओरड केली, परंतु त्यांनीं तिकडे बिलकूल लक्ष न देतां आपले कायदे बेधडक अमलांत आणिले.

एखाद्या गुरख्यास आपल्या बायकोच्या चालचलणुकीसंबंधानें कांहीं संशय आला किंवा ती व्यभिचारिणी आहे, अशी त्याची समजूत झाली; तर तो तिला फार भयंकर शासन करितो. पहिल्यानें तो तिला घरांतच ठेवून तिची वाईट खोड घालविण्याचा प्रयत्न करितो व इतकेंही करून जर ती सुधारणेच्या मार्गास लागली नाहीं, तर तिला जन्मकैदेची शिक्षा देण्यांत येते. जो व्यभिचारी पुरुष दुसऱ्याच्या स्त्रीवर नजर ठेवून, तिच्या पातिव्रत्याचा भंग करण्याचा प्रयत्न करितो, अशा मनुष्याचें तें दुष्कृत्य जर त्या स्त्रीच्या नवऱ्यास समजलें, तर तो त्याला आपल्या स्त्रीशीं भाषण करीत असतांना पकडून, आपल्या सुरीनें छाटून टाकितो! या व्यभिचारामुळें आपल्या समाजाची फार अवनति व वर्णसंकर होत आहे, असें जेव्हां जंगबहादूर यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें, तेव्हां त्यांनीं या बाबतींत असा कडक

कायदा केला कीं, जो कोणी परस्त्रीशीं प्रेमसंबंध ठेवील
दिली जाईल. या कायद्याविरुद्ध जर एखाद्यानें वर्तन केलें, तर
न्यायाधीशापुढें नेऊन उभा करितात व त्याची चौकशी सुरू होते. चौकशींत तो मनुष्य जर खरोखरच अपराधी ठरला, तर त्यानें ज्या स्त्रीशीं व्यभिचार केला असेल, तिचा नवरा सर्वांसमक्ष त्याचें डोकें उडवितो. परंतु अशावेळीं अपराधी मनुष्यास आपला प्राण वांचविण्याकरितां एक सवलत देण्यांत येते. ही सवलत अशी कीं, त्यास त्याच्या शत्रूपासून कांहीं अंतरावर उभा करितात व नंतर पळावयास सांगतात. त्याप्रमाणें तो पळूं लागला म्हणजे त्यास मारणारा हातीं शस्त्र घेऊन त्याच्या मागें लागतो! अशा प्रकारें पळतां पळतां तो अपराधी मनुष्य जर शेवटीं आपल्या शत्रूच्या हातीं लागला नाहीं, तर त्यास सोडून देतात! याशिवाय अपराध्यानें आपले प्राण वांचविण्याचे दुसरेही कांहीं मार्ग आहेत. परंतु या मार्गांनीं प्राणरक्षण करून घेणें नेपाळी लोक फार निंद्य समजतात. ते अशा वेळीं आपलें डोकें उडवून घेण्यास खुषीनें तयार होतील, परंतु आपल्या प्रियपात्राच्या नवऱ्यास कदापि शरण जाणार नाहींत! कुकर्म केल्यामुळें जातिबहिष्कृत होण्यापेक्षां मरण आलेलें चांगलें अशी त्यांची समजूत आहे. अपराधी मनुष्यानें ज्या स्त्रीशीं व्यभिचार केला असेल, त्या स्त्रीनें जर असें सांगितलें कीं, आपणास अनीतिमार्गास लाविणारा अपराधी हाच पहिला मनुष्य नसून, त्या पूर्वींही आणखी कांहीं लोकांनीं आपल्या पातिव्रत्याचा भंग केलेला आहे, तर त्या स्त्रीच्या सांगण्यावर विश्वास ठेवून, राजा त्या अपराध्यास सोडून देतो! वर सांगितल्याप्रमाणें दुसऱ्यांच्या स्त्रियांच्या प्रेमपाशांत सांपडून, शेंकडो नेपाळी लोक अकालीं मृत्युमुखी पडले आहेत. अपराधी मनुष्यास पळून जाण्याची सवलत देण्यांत येते खरी, परंतु त्याही सवलतीचा फायदा करून घेणें केवळ अशक्य असतें, कारण अपराधी पळत असतां, कोणी ना कोणी तरी त्यास पकडतोच! वास्तविक पाहतां अशाप्रकारें व्यभिचार व वर्णसंकर करणारास इतकी भयंकर शिक्षा देणें हा केवळ अत्याचार होय. परंतु आनंदाची गोष्ट ही कीं, या कडक कायद्यांत हल्लीं बरीच सुधारणा करण्यांत आलेली आहे.

[illegible] ती व भोटिया या जातींचे लोक जरी धर्मानें बौद्ध आ-[illegible] आचारविचारांत त्यांचें हिंदु लोकांशीं फार साम्य आहे. यामुळें त्या लोकांत पुष्कळ भेद झालेले आहेत. परंतु त्यांचे आचार व्यवहार बहुतेक एकसारखेच आहेत. नेवारी लोकांची विवाहपद्धति गुरखे लोकांच्या विवाहपद्धतीहून फार भिन्न आहे. हिंदुस्थानच्या नेपाळेतर प्रांतांतील हिंदु लोकांच्या रिवाजाप्रमाणें पुरुष किंवा स्त्री यांपैकीं कोणीतरी एक मरण पावल्याशिवाय नेवारी लोकांच्या विवाहसंबधाचा दुसऱ्या कोणत्याही प्रकारें भंग होऊं शकत नाहीं. नवऱ्यानें आपल्या स्त्रीचा त्याग करणें किंवा स्त्रीनें नवऱ्याचें घर सोडून दुसऱ्याचा हात धरून जाणें हें नेवारी लोक अत्यंत निंद्य मानितात. एखाद्या पुरुषानें किंवा स्त्रीनें एखादे वेळीं असें कृत्य केल्यास तें आपल्या जातीस मोठें लांच्छन आलें असें त्यांस वाटतें! नेवारी लोकांच्या मुली बाल्यावस्थेंत असतांनाच श्रीफळाबरोबर त्यांचा विवाह केला जातो! पुढें कन्या ऋतुमती झाल्यावर तिचीं वडील माणसें तिच्याकरितां एखादा चांगला नवरा शोधून काढितात व त्या दोघांचें लग्न करून देतात. पुढें त्या मुलीच्या मनांत जर आपल्या नवऱ्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें नाहीं व त्यामुळें वरचेवर कलह होऊं लागला, तर वधू आपल्या नवऱ्याच्या मस्तकावर एक सुपारी ठेवून, त्यास सोडचिठ्ठी देते व घरांतून बाहेर निघून जाते! इतकें झालें, म्हणजे नवरा समजून चुकतो कीं, आपल्या स्त्रीस कांहीं आपण आवडलों नाहीं! अशा प्रकारें काडी मोडण्याची रीत नेवारी लोकांत जरी अगदीं नियमबद्ध झालेली आहे, तरी इतक्या स्पष्टपणें आपल्या नवऱ्यास सोडून जाण्याचें धाष्टर्य नेवारी स्त्रिया क्वचितच करितात.

नेवारी लोकांत विधवाविवाहास बिलकूल प्रतिबंध नाहीं. परंतु बाळपणींच श्रीफळाशीं लग्न होत असल्यामुळें, त्या लोकांच्या स्त्रिया कधींही विधवा होत नाहींत! लग्नाचा नवरा जरी मरण पावला तरी श्रीफळाशीं पूर्वीं विवाह झालेला असल्यामुळें, त्यांस कपाळाचें कुंकूं पुसून टाकण्याचें बिलकूल कारण पडत नाहीं!!

नेवारी जातीच्या स्त्रीनें जर व्यभिचार केला , तर ति
देण्यांत येते. परंतु ज्या पुरुषाशीं तिनें व्यभिचार केला अस
तिच्या नवऱ्यास लग्नाचा खर्च देवविला जातो व हा खर्च सोसण्याची त्यास ऐपत नसली , तर त्याला तुरुंगांत जावें लागतें. नेवारी लोक हिंदु लोकांप्रमाणें आपलीं प्रेतें जाळितात व त्यांच्यांत सती जाण्याचीही चाल आहे; परंतु विधवाविवाहाचें प्राबल्य फार असल्यामुळें नेवारी स्त्रियांस सती जाण्याचा प्रसंग क्वचितच येतो .

शासनपद्धति

प्राचीन काळीं नेपाळांतील एखाद्या मनुष्यानें जर एखादा क्षुल्लक अपराध केला, तर त्याचे हात, पाय, नाक, कान किंवा डोळे, यांपैकीं एखादा अवयव कापून टाकण्याची त्यास शिक्षा देण्यांत येत असे एवढेंच नव्हे; तर क्वचित् प्रसंगीं अशा मनुष्यास देहांत शिक्षाही दिली जात असे. याशिवाय वेतानें फटके देण्याची व अपराधी मनुष्याची कातडी दोऱ्यानें शिवण्याचीही भयंकर चाल प्रचारांत होती. परंतु सर जंगबहादूर हे विलायतेंत जाऊन आले त्यावेळीं असले कडक शिक्षा देणारे कायदे त्यांनीं अजिबाद रद्द करून टाकिले व पुढील नवे कायदे अमलांत आणिले:— जो मनुष्य राजद्रोह करील, किंवा राजकीय कामांत विश्वासघाताचें वर्तन करील, अथवा युद्ध चालू असतां, आयत्या वेळीं माघार घेऊन पळून जाईल, त्यास जन्मठेप काळेंपाणी किंवा शिरच्छेद यांपैकीं एक शिक्षा दिली जाईल. जर कोणी सरकारी कामदार प्रजेपासून लांच घेईल; सरकारच्या हितसंबंधांत अडथळा येण्यासारखें वर्तन करील किंवा सरकारी पैशाची अफरातफर करील, तर त्यास फार मोठा दंड केला जाईल व नोकरीवरून काढून टाकून, तुरुंगांत पाठविलें जाईल. गाय अथवा मनुष्य यांची हत्या करणारास शिरच्छेदाची शिक्षा दिली जाईल. कोणी शस्त्रानें गाईची कातडी काढील अथवा रागानें तिचा वध करील, तर त्याला जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा देण्यांत येईल. याशिवाय क्षुल्लक प्रतीच्या

...ा व अल्प मुदतीच्या कैदेच्या शिक्षा देण्यांत येतात. ए- ...च्या मनुष्यानें आपण उच्च जातीचे आहों, असें भासवून लोकांस फसविण्याचा किंवा एखाद्या उच्च जातीच्या मनुष्यास जातिभ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला, तर त्यास दंड किंवा कैद, यांपैकीं एक शिक्षा देण्यांत येते अथवा या दोन्ही शिक्षा देण्यांत येतात; अथवा त्याची संपत्ति सरकारांत जमा केली जाते. याहून भयंकर अपराध केल्यास अपराधी मनुष्यांस गुलाम ह्मणून विकून टाकण्यांत येतें. जे लोक धर्मबाह्य वर्तनानें जातिभ्रष्ट होतात, ते उपास व व्रतें करून किंवा पुरोहित ब्राह्मणांस द्रव्यदान करून, पुनः आपल्या जातींत येतात.

ब्राह्मण व स्त्रिया, यांस शिरच्छेदाची शिक्षा माफ आहे. ईश्वराचा ज्यांच्यावर जन्मतःच अनुग्रह झालेला आहे, अशा स्त्रियांनीं जर सर्वांत मोठा ह्मणजे गाय किंवा मनुष्य यांचा वध करण्याचा अपराध केला, तर त्यांस जन्मकैदेची शिक्षा देण्यांत येते. ब्राह्मण जातीच्या अपराध्यासही हाच नियम लागू आहे. शिवाय कोणताही ब्राह्मण एकवेळ तुरुंगांत गेला कीं, जात व जातिगौरव या दोहोंसही त्यास मुकावें लागतें.

सेनाविभाग.

राज्यरक्षण व राज्यव्यवस्था या कामीं नेपाळ सरकारचे पुष्कळ रुपये खर्च होतात. सैनिकांस युद्धकलेचें यथाशास्त्र शिक्षण देण्यांत नेपाळ सरकार फार काळजी घेतें व तिरकमठे, तलवारी, तोफा, बंदुका व दारुगोळा इत्यादि युद्धोपयोगी साहित्य जय्यत तयार ठेवण्याकडे लाखों रुपये खर्च केले जातात. नेपाळी सैन्यांत गुरखे लोकांचा भरणा अधिक आहे. ज्यांस सरकारीखाजिन्यांतून पगार दिला जातो, असे नेपाळच्या सैन्यांत सुमारें १६,००० शिपायी आहेत. पाहिजे त्यावेळीं लढाईवर जाण्यास तयार असें (Standing Army) नेपाळकरांचें हें एवढेंच सैन्य होय. हें सैन्य २६ पलटणांत विभागलेलें असून, राज्यांत ठिकठिकाणीं त्याच्या छावण्या आहेत. याशिवाय नेपाळी कायद्याप्रमाणें, राज्यांतील बहुतेक लोकांस नियमित वर्षें लष्करांत

राहून, युद्धकलेचें शिक्षण संपादावें लागतें. लष्कर सो[illegible] जरी आपल्या उद्योगधंद्यांत पडून पुनः प्रापंचिक बनतात, तरी लढाईचा प्रसंग आल्यास त्यांस घरदार सोडून, स्वदेशसंरक्षणार्थ सरकारी लष्करास जाऊन मिळावें लागतें. प्रत्येकानें कांहीं नियामित वर्षे लष्करांत नोकरी केलीच पाहिजे असा कायदा असल्यामुळें, प्रत्यक्ष पगार देऊन, मोठें सैन्य ठेवण्याचें नेपाळ सरकारास कारणच पडत नाहीं. परंतु लढाईचा प्रसंग आल्यास, नेपाळ सरकार एका दिवसांत चांगलें युद्धकलाविशारद ७०००० सैन्य समरांगणांत सहज उभें करूं शकेल !

नेपाळ सैनिकांस जें युद्धशिक्षण दिलें जातें, तें बहुतेक इंग्रजी पद्धतीवर दिलें जातें, परंतु कित्येक बाबतींत मात्र इंग्रजी नियम पाळण्यांत येत नाहींत. सैन्यविभाग, सेनानायक, सेनाधिपति, इत्यादि सर्व गोष्टींत जरी इंग्रजी सैन्याचेंच अनुकरण करण्यांत येतें, तरी सैन्यांतील लोकांस क्रमाप्रमाणें बढती मिळवितां येत नाहीं. राजपुत्र किंवा राजकुटुंबांतील इतर लोक एका वर्षांत सैन्यांतील उच्च पद सहज प्राप्त करून घेऊं शकतात, परंतु इतर लोकांनीं जरी कितीही शौर्य दाखविलें तरी त्यांस आपली उन्नति करून घेणें फार जड जातें.

नेपाळी सैनिकांचा नित्याचा पेहराव ह्मटला ह्मणजे निळ्या रंगाचा सुती अंगरखा व पायजमा एवढाच होय. परंतु लढाईवर जातेवेळीं नेपाळी शिपाई अंगांत लाल रंगाचा अंगरखा, पायांत काळी विजार व पादत्राण व कपाळास टोपी घालितात व मस्तकावर आपल्या सैन्याचें विशेष चिन्ह ह्मणून चांदीचा एक बिल्ला धारण करितात. तोफखान्यावरील लोकांचा पोषाख निळ्या रंगाचा असतो. नेपाळचा भूपृष्ठभाग पर्वतमय असल्यामुळें, नेपाळी सैन्यांत घोडेस्वारांचा भरणा फार कमी आहे. दारू, तोफेचे गोळे व बंदुकीच्या गोळ्या बनविण्याचे कारखानेही नेपाळांत आहेत. हिंदुस्थानांतील इंग्रजी सैन्याप्रमाणें, नेपाळी सैन्याच्याही नित्य कवाइती होतात. डोंगराळ

...यासंबंधानें नेपाळी फौजेची विशेष प्रख्याति आहे.* इ० स० १८१७ मध्यें इंग्रज व नेपाळी यांची जी मोठी लढाई झाली, तींत गुरखे लोकाच्या चिकाटीपुढें मोठमोठ्या इंग्रज सेनापतींसही कसे हात टेकावे लागले, हें सर्व इतिहासज्ञांस विदितच आहे. नेपाळी कारखान्यांत ज्या तोफा व बंदुका तयार होतात, त्या युरोपियन तोफांबंदुकांइतक्या चांगल्या नसतात. नेपाळ सरकारापाशीं चार इंग्रजी डोंगरी तोफाही (Mountain Battaries) आहेत. या तोफा, सरदार बाबरजंग हे नेपाळी सैन्याचे सेनापति असतांना, ह्मणजे इ० स० १८५७ च्या बंडांत, नेपाळी सैन्यानें इंग्रजांस जें साहाय्य केलें, त्यामुळें खुष होऊन, मित्रत्वाचें चिन्ह ह्मणून इंग्रज सरकारानें नेपाळ सरकारास बक्षीस दिलेल्या आहेत. ह्यांशिवाय नेपाळ सरकारापाशीं दुसऱ्या अगणित तोफा असून, सरकारी कारखान्यांतून आणखी तोफा पाडण्याचें काम चालूच आहे.

सेवकपद्धति.

नेपाळांत गुलामाची चाल अद्याप प्रचारांत आहे. सामान्य प्रतीचे लोकही आपल्या गृहकार्यासाठीं पैसा देऊन दासदासी विकत घेतात. तथापि आफ्रिकेंत जी गुलामाची चाल प्रचलित होती व आहे, तिच्याहून नेपाळांतील चाल निराळ्या स्वरूपाची आहे. नेपाळांतील गुलामास आपल्या धन्याच्या घरांतील सर्व कामें करावीं लागतात, परंतु इतर बाबतींत तो अगदीं स्वतंत्र असतो. आफ्रिकेंतील गुलामांचा त्यांच्या धन्याकडून भयंकर छळ होतो, परंतु नेपाळांतील गुलामास त्याचे धनी प्रेमानें वागवितात. श्रीमंत नेपाळी लोक असे पुष्कळ गुलाम विकत घेऊन आपल्या घरांत बाळगितात. नेपाळांत असे गुलाम आज सुमारें ५५,००० आहेत ! अगम्यागमन व वर्णसंकर करणारे लोक नेपाळी कायद्याप्रमाणें सहकुटुंब सहपरिवार

---

* गेल्या १० वर्षांत, सरहद्दीवर व आफ्रिडी लोकांशीं, इंग्रजांच्या ज्या कटकटी झाल्या त्यांत व परवांच्या तिबेट प्रकरणांत गुरखा पलटणींनीं दाखविलेलें शौर्य तर सुप्रसिद्धच आहे. (ग्रंथकर्ता)

गुलाम ह्मणून विकले जातात व दिवसेंदिवस अशा लोकां [illegible] वाढत्या प्रमाणांत आहे. विकत घेतलेल्या दासींना आपल्या धन्याचीं सर्व गृहकृत्यें करावीं लागतात व कधीं कधीं, बकरीं व घोडे यांसाठीं गवत कापून आणणें इत्यादि पुरुषांचीं कामेंही त्यांस करावीं लागतात. कित्येक धनी आपल्या दासींस बिलकूल घराबाहेर पडूं देत नाहींत, परंतु बहुतेक धनी दासीजनांस पाहिजे तिकडे जाण्यास व फिरण्यास मोकळीक देतात. या दासींची नीतिमत्ता असावी तितकी चांगली नसते. घरांतील एखाद्या पुरुषाशीं बहुतकरून त्यांचा संबंध असतो. अशाप्रकारच्या संबंधापासून एखाद्या दासीस मुल झालें, तर ती आपल्या धन्याच्या गुलामगिरींतून मुक्त होऊं शकते, परंतु अशा स्त्रियांस आपल्या धन्याचा इतका लोभ जडलेला असतो कीं, त्याचें घर सोडून जाण्यास त्या क्वचितच तयार होतात. नेपाळांत दासदासींची किंमत प्रत्येकीं १५० रुपयांपासून २०० रुपयांपर्यंत असते.

देवपूजा व उत्सव.

नेपाळी लोकांची देवब्राह्मणांवर फार भक्ति असल्यामुळें नेपाळांत देव व देवी यांचीं असंख्य देवळें आहेत. ज्या ठिकाणीं तिथिपर्वणीच्या दिवशीं जत्रा भरते व उत्सव होतात, अशीं देवळें, तीर्थें व क्षेत्रें सुमारें २,७३३ आहेत. या ठिकाणीं प्रायः प्रत्येक दिवशीं एक दोन तरी उत्सव होतात. वर्षाचे सहा महिने तर पूजा व उत्सव यांतच जातात. एखादा परदेशीय गृहस्थ नेपाळांत जाऊन जर हे उत्सव पाहील तर नेपाळी लोकांची उत्सवप्रियता व देवभक्ति अवलोकन करून त्यास मोठें आश्चर्य वाटेल यांत संशय नाहीं. त्यांतही विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, प्रत्येक नेपाळी मनुष्य या उत्सवास हजर राहूनही आपल्या प्रपंचाचीं कामें चालवितो. या उत्सवांपैकीं प्रत्येक उत्सवासंबंधानें एकेक पौराणिक कथा प्रचारांत आहे, परंतु ग्रंथविस्तारभयास्तव ह्या कथा येथें देतां येत नाहींत ही निरुपायाची गोष्ट आहे. तथापि नेपाळांतील मुख्य यात्रेचीं ठिकाणें व तेथील उत्सव यांची माहिती संक्षेपरूपानें येथें देतों.

... नाथ यात्रा—मत्स्येंद्रनाथ हा नेपाळी लोकांचा एक ... भोगमती नामक गांवीं या देवाचें देवालय आहे. देवालयांत मूर्ति नसून, महादेवाचें लिंग स्थापन केलेलें आहे. नेपाळी वर्षाच्या पहिल्या दिवशीं ह्मणजे वैशाख शुद्ध प्रतिपदेस या ठिकाणीं उत्सवास पहिल्यानें प्रारंभ होतो. या दिवशीं सर्वांचीं यथाशास्त्र स्नानें झाल्यावर नेपाळच्या राजाची तलवार देवाच्या पायांपाशीं ठेवून, ती पुजण्यांत येते व नंतर मत्स्येंद्रनाथाची मूर्ति एका शृंगारलेल्या रथांत घालून मिरविण्यांत येते. ही मिरवणूक पाटण नगरांत आल्यावर तेथें मूर्तीचा एक महिना मुक्काम होतो व पुनः शुभ मुहूर्तावर पाटणहून निघून सर्व भक्तमंडळी मूर्ति व रथ यांसह भोगमती गांवांत प्रवेश करितात. पुढें मूर्तीस एक कांबळी परिधान करविण्यांत येते; व ती सर्वांसमक्ष देवाच्या अंगावरून काढून दाखविण्यांत येते. असें करण्याचा उद्देश एवढाच कीं, देव एका कांबळीवर संतुष्ट राहतो हें लोकांस समजून, त्यांनीं ईश्वर त्यांस ठेवील त्या स्थितींत संतुष्ट राहण्याचा धडा घ्यावा. या उत्सवास 'गुडदीझाडा' असें ह्मणतात. पाटणहून निघालेली मिरवणूक भोगमती गांवाकडे येत असतां, वाटेंत तिचा ज्या ज्या गांवीं मुक्काम होईल, तेथील लोक या भक्तमंडळीच्या खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था ठेवितात. नेवारी लोकही मत्स्येंद्रनाथाचा प्रतिवर्षीं दोन वेळ उत्सव करितात. याशिवाय—(२) नेता देवीची यात्रा व (३) पशुपतिनाथ यात्रा अशा दोन यात्रा भरतात. (४) वज्रयोगिनी यात्रा, ही बौद्धधर्मीय लोकांकडून साजरी करण्यांत येते. शिवाय कांहीं हिंदु लोकही अलीकडे या देवीस भजूं लागले आहेत. मणिचूड नामक पर्वतावर या वज्रयोगिनी देवीचें देवालय असून, वैशाख शुद्ध तृतीया या दिवशीं तिचा उत्सव सुरू होतो. त्यादिवशीं एका खाटेवर देवीची मूर्ति बसवून ती मिरविण्यांत येते. वज्रयोगिनीच्या देवळासमोर खड्गयोगिनी नामक दुसऱ्या एका देवीचें मंदिर आहे. देवीच्या मूर्तीसमोर सदोदित विस्तव पेटलेला असतो व तेथें मनुष्याचें एक दगडी रुंड पडलेलें दृष्टीस पडतें! (५) सीथी यात्राः—काटमांडू व स्वयंभूनाथ या

दोन स्थळांच्या मध्यें विष्णुमती नदीच्या कांठीं ज्येष्ठ म[illegible]
भरते. सर्व यात्रेकरूंचें जेवण झाल्यावर आपल्या समुदायाचे [illegible] करून
ते नदीतीरीं जातात, व एकामेकांवर विटा फेंकितात. पूर्वकाळीं, अशा प्रकारें वीट मस्तकास लागून, जर एखादा मनुष्य मूर्छित झाला, तर त्यास उचलून देवीपुढें नेऊन बळी देत असत !! परंतु राजाज्ञेनें हा भयानक प्रकार हल्लीं बंद झालेला आहे. (६) **गोधिया मंगल ऊर्फ घंटाकर्णः**—घंटाकर्ण नामक राक्षसास देशांतून हांकून लाविल्यापासून हा उत्सव प्रचारांत आलेला आहे. या बाबतींत बंगाली लोकांची समजूत अशी आहे कीं, घंटाकर्णाची पूजा केली असतां, लहान मुलांस मारणारे रोग उत्पन्न होत नाहींत. नेपाळांतील नेवारी जातीचीं मुलें या उत्सवांत गवताची एक बाहुली घेऊन घरोंवर भिक्षा मागत फिरतात व उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं ती बाहुली जाळून टाकून मोठा आनंद कारितात. हा उत्सव श्रावण महिन्यांत होतो. (७) **बांडा यात्राः**—बौद्धधर्मीय नेवार जातीचे पुरोहित लोक, श्रावण शुद्ध अष्टमी व भाद्रपद शुद्ध त्रयोदशी या दिवशीं प्रत्येक गृहस्थाकडून तांदुळाच्या रूपानें आपला वार्षिक कर वसूल करण्यासाठीं बाहेर पडतात. या भिक्षावृत्तीचा अर्थ असा आहे कीं, या पुरोहित लोकांचे पूर्वज आपला निर्वाह भिक्षावृत्तीवर चालवीत असत. परंतु हल्लींचे त्यांचे वंशज गृहस्थाश्रमी असल्यामुळें आपल्या वाडवडिलांचें नांव राखण्याकरितां वर्षांतून फक्त दोन दिवस ते या भिक्षामार्गाचें अवलंबन कारितात ! परंतु या दोन दिवसांत त्यांस इतकी द्रव्यप्राप्ति होते कीं, सबंध वर्षभर कुटुंबाच्या उदरंभरणासाठीं त्यांस बिलकूल श्रम करावे लागत नाहींत ! या दिवशीं नेवारी लोक आपलीं घरें व दुकानें फुलांनीं सुशोभित कारितात, व स्त्रिया तांदूळ व इतर धान्यें घेऊन, दारांत येऊन बसतात. या स्त्रिया, एखादा बांडा (बौद्धधर्मीय पुरोहितांस बांडे असें ह्मणतात) दारीं आला कीं, त्यास धान्य देऊन वाटेस लावितात. या दोन दिवसांशिवाय वर्षांतील दुसऱ्या एखाद्या दिवशीं सर्व बांडे लोकांस भिक्षा घालण्याचें जर एखाद्या श्रीमंत नेवाऱ्यानें योजिलें तर तसें करण्यास त्यास पुष्कळ पैसा खर्च करावा लागतो. या उत्सवांत अशी एक विलक्षण

... कोणत्याही गृहस्थाच्या दारीं जो बांडा पहिल्यानें जाईल, ... अपेक्षां अधिक धान्य द्यावें लागतें ! या उत्सवप्रसंगीं राजास आपल्या घरीं आणावें, असें जर एखाद्या गृहस्थाच्या मनांत आलें, तर राजाचा सन्मान ठेवण्यासाठीं एक चांदीचें सिंहासन, छत्र व सैंपाकाचीं भांडीं, इतक्या वस्तु त्याच्या चरणीं अर्पण करून, नंतर त्याच्याशीं आपला परिचय करून घेतां येतो ! (८) राखीपौर्णिमाः—श्रावण शुद्ध पौर्णिमा. या दिवशीं हिंदु व बौद्ध या दोन्ही धर्मांचे लोक हा उत्सव करितात. परंतु त्यांच्या क्रिया मात्र वेगवेगळाल्या आहेत. बौद्ध लोक या दिवशीं पवित्र तीर्थांत स्नान करून, देवदर्शनास जातात व ब्राह्मण पुरोहित लोक आपल्या यजमानांच्या हातांत रंगित दोरा बांधून त्याबद्दल दक्षिणा घेतात. पुष्कळ लोक आपलें पुण्य वाढावें या हेतूनें गोसांईस्थान शिखरावरील नीलकंठतीर्थ व गोसांईकुंड या सरोवरांत स्नान करावयास जातात. (९) नागपंचमीः—श्रावणशुद्धपंचमीदिवशीं नाग व गरुड यांच्या युद्धस्मरणार्थ हा उत्सव सांजरा केला जातो. 'चाम्बू नारायण' देवाच्या मंदिरांत जी गरुडमूर्ति स्थापन केलेली आहे, ती या दिवशीं युद्धाच्या श्रमानें थकून जाऊन, तिला घाम येतो, अशी नेपाळी लोकांची समजूत आहे ! ब्राह्मण पुरोहितलोक हा घाम वस्त्रानें पुसून काढितात. या वस्त्राचा एकच तंतु कसल्याही भयंकर जातीच्या सर्पविषावर केवळ रामबाण आहे असें पुरोहितबुवा म्हणतात ! (१०) जन्माष्टमी (गोकुळ अष्टमी) (११) गोष्ट उर्फ गाभी यात्राः—ही यात्रा (भाद्रपद शुद्ध प्रतिपदा) फक्त नेवारी जातीच्या लोकांची आहे. या दिवशीं ज्या घरचें एखादें मनुष्य त्या वर्षांत मरण पावलें असेल, त्या घरचीं सर्व माणसें गाईबैलांचीं सोंगें घेऊन, राजवाड्यासभोंवतीं नृत्य गायन करीत फिरतात ! (१२) वाघ यात्राः—वरील यात्रा झाल्यावर भाद्रपद शुद्ध तृतीया या दिवशीं नेवारी लोक वाघांचीं सोंगें घेऊन नृत्यगायनानें ही यात्रा साजरी करितात. (१३) इंद्रयात्राः—हा उत्सव भाद्रपद महिन्यांत एकसारखा आठ दिवस चालू असतो. पहिल्या दिवशीं राजवाड्यासमोर एक उंच ध्वज उभारण्यांत येतो व राजाश्रित नृत्यांगनांचा राजमहालासभोंवतीं

नाच होतो. तिसऱ्या दिवशीं पुष्कळ कुमारिकांस राजवा[illegible] त्यांचें पूजन करितो व लगेच रथावर आरूढ होऊन कुमा[illegible] मध्य प्रदेशांतून मिरवत जातो. अशा प्रकारें ही मिरवणूक पुनः [illegible]जवाड्यांत आली, ह्मणजे एका गादीवर राजा विराजमान होतो, व राजा हजर नसल्यास त्याची तलवार गादीवर ठेवण्यांत येते. मग राज्यांतील सरदार लोक व इतर कामदार राजास अनेक प्रकारच्या भेटी नजर करितात. हा सर्व प्रकार अनंत चतुर्दशीच्या दिवशीं होतो. गुरखे लोकांचा राजा पृथ्वीनारायण यानें काटमांडू शहरांत आपल्या सैन्यासह याच दिवशीं प्रवेश केला होता. त्या-वेळीं सर्व नेवारी लोक उत्सवमग्न व मदिरावश असतां राजा पृथ्वीनारायण यानें नेपाळची गादी बळकाविली. आपले लोक मदिरापानानें धुंद झालेले पाहून, पृथ्वीनारायणाशीं लढाई करण्याच्या भानगडींत न पडतां, नेपाळचा नेवार जातीचा राजा पळून गेला! अशा प्रकारें बिलकूल रक्तपात न होतां नेपाळचें राज्य गुरखा जातीच्या हातीं आलें. नेपाळी लोकांची अशी समजूत आहे कीं, या दिवशीं जर भूकंप होईल, तर राज्यावर एखादें संकट खात्रीनें येणार! व याप्रमाणें जर खरोखरच भूकंप झाला, तर नेवारी लोक त्या दिवसापासून आणखी आठ दिवस हा उत्सव साजरा करितात!! (१४) दशहरा (दुर्गोत्सव):— आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून विजयादशमीपर्यंत हा उत्सव सुरू असतो. हिंदुस्थानांतील इतर ठिकाणीं हा उत्सव ज्या प्रकारें साजरा करण्यांत येतो, त्याप्रकारेंच तो नेपाळांतही साजरा करण्यांत येतो. उत्स-वाच्या १० दिवसांत अनेक रेडे व बकरे बळी देण्यांत येतात. परंतु बंगाली लोकांप्रमाणें मातीची दुर्गाप्रतिमा करून, ती पुजण्याची चाल नेपाळी लोकांत नाहीं. पहिल्या दिवशीं ह्मणजे घटस्थापनाकालीं नेपाळी ब्राह्मण पूजास्थानीं पंच धान्यें ठेवून, तीं पवित्र तीर्थोदकानें सिंचन करितात व दहावे दिवशीं आपल्या यजमानांकडून दक्षिणा घेऊन त्यांस आशीर्वाद देतात. (१५) दिवाळी:—कार्तिकमासीं लक्ष्मीपूजन झाल्यावर, सारी रात्र नेपाळी लोक जुगार खेळतात. वास्तविक पाहतां जुगार खेळणें कायद्यानें बंद केलेलें आहे, परंतु या उत्सवांत तीन दिवस जुगार खेळण्यास सर्वांस

[illegible] या तीन दिवसांत जुगारी लोकांच्या येण्याजाण्यानें [illegible] होते. कित्येक लोक जवळचा सर्व पैसा हरवून बसल्यावर आपल्या [illegible]यांस जुगारांत लावितात व शेवटीं त्यांसही हरवून बसतात! क्वचित् प्रसंगीं एखादा अट्टल जुगारी आपला एक हात छाटून तो जुगारांत घालितो व त्या डावांत त्यास जय मिळाल्यास आपल्या प्रतिस्पर्ध्यानें आपला हात तोडून द्यावा किंवा त्यानें मिळविलेले सर्व रुपये आपणांस द्यावे, अशी मागणी करितो!! * जुगाराचे इतके शोकी दुनियेंत दुसरीकडे क्वचितच आढळतील. (१६) किचा पूजाः—हा नेवारी लोकांचा उत्सव असून, तो कार्तिकमासीं साजरा करण्यांत येतो. या दिवशीं सर्व नेवारी लोक कुत्र्यांची पूजा करितात व त्यांच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालितात! या प्रकारें रेडा, कावळा व बोकड यांच्या पूजनांचेही कांहीं नियमित दिवस आहेत. (१७) भाईपूजा ऊर्फ भइया दोयजः—(कार्तिक शुक्ल द्वितीया) या दिवशीं सर्व नेपाळी स्त्रिया आपल्या बंधुगृहीं येऊन, आपल्या बंधूंचे दोन्ही पाय धुतात व त्यांच्या मस्तकीं टिळा लावून, गळ्यांत पुष्पमाला घालितात. नंतर पकान्नें करून त्यांस वाढितात. बंधूही आपल्या भगिनींस प्रसन्न करण्यासाठीं वस्त्रें, दागिने, रुपये इत्यादि कांच्या रूपानें त्यांस यथाशक्ति देणगी देतात. (१८) बाला चतुर्दशी (आश्विन शु० १४) या दिवशीं सर्व नेपाळी लोक पशुपतिनाथमंदिराजवळच्या नृगस्थली नामक अरण्यांत जाऊन, तेथील वानर व माकडें यांस तांदूळ व फळफळावळ फेंकितात. (१९) कार्तिकी पौर्णिमाः—या दिवसापूर्वी एक महिना अनेक नेपाळी स्त्रीपुरुष पशुपतिनाथाच्या मंदिरांत जाऊन, तेथें महिनाभर उपोषणें करितात. सर्व स्त्रिया केवळ मूर्तीच्या स्नानोदकावर आपला निर्वाह करितात! कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं हे उपोषित लोक आपापलें पारणें फेडून, तत्प्रीत्यर्थ मोठा उत्सव करितात. या दिवशीं पशुपतिनाथाच्या मंदिरांत मोठा दीपोत्सव होतो व रात्रभर नृत्यगायन चालू असतें. दुसऱ्या दिवशीं ज्या पर्वतावर हें पशुपतिनाथाचें मंदिर आहे, तेथें ब्राह्मणभोजन घालून, सर्व स्त्रिया आप-

* असा प्रकार नेपाळांत फक्त एकवेळ घडला आहे.

आपल्या घरीं जातात. (२०) **गणेशचतुर्थी**:—हा उत्सव [illegible] दिवसा गणेशपूजन करून, सर्व लोक उपोषण करितात व रात्रौ [illegible]ष्टान्नभोजन होतें. (२१) **वसंतोत्सव अथवा श्रीपंचमी.** (२२) **होळी ऊर्फ दोललीला**:—फाल्गुन शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं हा उत्सव होतो. राजवाड्यासमोर वस्त्रें व लांकडें रचून, त्यांत उंच निशाणें उभीं करितात व रात्रौ त्यास आग लावून देतात. या उत्सवासंबंधानें नेपाळी लोकांत असा प्रवाद आहे कीं, जुन्या वर्षास होळीच्या रूपानें जाळून टाकून, नव्या वर्षाची वाट पाहत बसण्याच्या उद्देशानें हा उत्सव प्रचारांत आलेला आहे. (२३) **माघी पूर्णिमा**:—या दिवशीं तरुण नेवारी लोक वाघमती नदीच्या पवित्रोदकांत स्नान करितात. कित्येक लोक डोलींत बसून, आपला हात, पाठ किंवा छाती, यांवर एक जळता दिवा ठेवून, स्नान करण्याच्या घाटावरून देवदर्शनास जातात व इतर यात्रेकरू आपापल्या मस्तकावर पाण्यानें भरलेला एकेक घडा घेऊन त्यांच्या मागून चालतात. या घड्यास एक छिद्र पाडिलेलें असतें, त्यांतून थेंब थेंब पाणी खालीं पडतें, तें पवित्र आहे असें समजून, हे लोक त्या पाण्यानें आपलें सर्वांग भिजवून घेण्यांत मोठी धन्यता मानितात. पुढें एके ठिकाणीं मोठा अग्नि प्रज्वलित केलेला असतो, त्या मार्गानें ही सर्व मंडळी आपापल्या घरीं जाते. अग्नीच्या उष्णतेनें आपल्या डोळ्यांस इजा होऊं नये ह्मणून, नेवारी लोक निळ्या कांचेचे चष्मे वापरतात.(२४) **घोडा यात्रा**:—हा घोड्यांचा एक मेळा आहे. चैत्री अमावास्येच्या दिवशीं राजाच्या आज्ञेनें सर्व कामदार लोक आपापले घोडे घेऊन, कवाइतीच्या मैदानावर येतात. तेथें सर जंगबहादूर यांची एक प्रतिमा ठेविलेली असते, तिच्या समोर राजासुद्धां सर्व मंडळी आसनस्थ होते. पुढें सर्व लोक उठून आपापल्या अश्वांवर आरूढ होतात व भरधांव घोडे उडवितात. ज्या खांबावर जंगबहादूर यांची मूर्ति स्थापिलेली आहे, त्याच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी एक मोठा मेळा भरतो. सरकारी कामदार लोक या ठिकाणीं तंबू ठोकून, त्यांतून सारी रात्र नाचरंग करितात व जुगारही खेळतात. शेवटच्या दिवशीं मूर्तीच्या सभोंवतीं दिवे लावितात. (२५) **पिशाच चतुर्दशी**:—हा वज्रे-

...त्सवाचा दिवस आहे. चैत्र कृष्ण द्वादशीस पुष्कळ लोक या देवी... मंदिरांत एकत्र होतात व देवीस मनुष्याचा (?) बली देतात. दुसऱ्या दिवशीं कुमारिकांचा भोजनसमारंभ होतो व पिशाचचतुर्दशी व्रतकल्पास आरंभ होतो. या दिवशीं रात्रौ देवीच्या देवळांत दीपोत्सव होतो, व मोठा अग्नि प्रदीप्त करण्यांत येतो. चतुर्दशीच्या दिवशीं देवीची मूर्ति रथांत घालून शहरांतून मिरवितात व पुनः देवळांत आणून तेथील शिवमूर्तिसमीप तिची स्थापना करितात. अशा प्रकारें मोठ्या धामधुमीनें हा वज्रेश्वरी देवीचा उत्सव समाप्त होतो. (२६) पंचलिंग भैरव यात्राः— आश्विन शुक्ल पंचमीस या उत्सवास प्रारंभ होतो. असें सांगतात कीं, या दिवशीं महाभैरवाची स्वारी खग्डनी ऊर्फ काशायनी नामक देवीशीं रममाण होते! (२७) हील्या यात्राः—कांतिपुर नगराच्या स्थापनाकालापूर्वीं बहुत वर्षें देवमाहात्म्य प्रकाशित करण्यासाठीं ही यात्रा अस्तित्वांत आली. (२८) कृष्ण यात्राः—कृष्णकीर्तीचें वर्णन करण्यासाठीं ही यात्रा भरते. (२९) लाखिया यात्राः—शाक्यमुनी (गौतम बुद्ध) ज्यावेळीं बोधिवृक्षाखालीं ध्यानमग्न होते, त्यावेळीं त्यांचा ध्यानभंग करण्यासाठीं इंद्र त्या ठिकाणीं आला होता. परंतु मुनिरायांचें योगबल केवळ अभंग आहे, असें दृष्टोत्पत्तीस येऊन त्यास साश्चर्य स्वर्गलोकीं परत जावें लागलें. पुढें ब्रह्मादि देवांनीं मृत्युलोकीं येऊन शाक्यमुनींची भेट घेतली व त्यांस अनेक आशीर्वाद दिले. या गोष्टीच्या स्मरणार्थ ही यात्रा अस्तित्वांत आली आहे. (३०) भैरवी यात्रा व विषकाटी उत्सवः—भाटगांव नगरांतील भैरवदेवाच्या सेवेप्रीत्यर्थ नेवारी लोक हा उत्सव करितात. वैशाखाच्या पहिल्या दोन दिवशीं हा उत्सव होतो. भैरव देवाच्यादेवळा शेजारींच शक्तिस्वरूपिणी नेता नामक देवींचें मंदिर आहे. या दिवशीं भैरवमंदिरासमोर, चकोर [?] नामक वृक्षाचें एक लांकूड पुरून, त्याची पूजा करण्यांत येते. (३१) अमिताभबुद्धाचा उत्सवः—स्वयंभूनाथाच्या मंदिरांतून, अनेक प्रकारची पवित्र पूजासामग्री व अमिताभबुद्धाचा मुकुट आणून काटमांडु शहरांतील लोक हा उत्सव करितात. पूजाविधी आटोपल्यावर बांडे लोकांस

अन्न व दुसरे अनेक प्रकारचे पदार्थ देण्यांत येतात व [illegible] रस्त्यांत फेंकून देतात. देवाचा प्रसाद असें समजून, तें अ[illegible]ण्यासाठीं नेवारी लोकांच्या उड्या पडतात ! शेवटीं, बांडे लोकांचें भोजन झाल्यावर हा समारंभ समाप्त होतो. (३२) रथयात्राः—ही यात्रा, इ० स० १७४० व १७५० यांमधील एका वर्षी राजा जयप्रकाश याच्या कारकीर्दींत अस्तित्वांत आली. त्यावेळीं एका सात वर्षांच्या बांडा कुमारिकेच्या अंगांत येऊन, तिनें असें सांगितलें कीं, आपण आदिशक्तीचा अंशरूप अवतार आहें. ही गोष्ट जेव्हां परंपरेनें राजाच्या कानीं गेली, तेव्हां तिच्या बोलण्याची थट्टा करून त्यानें तिला नगराबाहेर हाकून लाविलें व तिच्यापाशीं जें काय होतें नव्हतें, तें सर्व जप्त केलें. यानंतर रात्रीं राणीला अकस्मात् वायु झाला व ती मोठ्यानें ओरडूं लागली कीं, आपल्या छातीवर देवी बसली आहे ! आपल्या राणीची एकाएकीं अशी भयंकर अवस्था झालेली पाहून व तिचें भाषण ऐकून राजास मोठें आश्चर्य वाटलें. नंतर त्यानें त्या देवकन्येस मोठ्या समारंभानें राजवाड्यांत आणिलें व सर्वांसमक्ष तिचें देवत्व कबूल करून, तिचा क्रोध शांत केला, इतकेंच नव्हे, तर तिला मोठ्या उत्पन्नाची जमीन इनाम करून देऊन, तिची मोठी बडदास्त ठेविली. पुढें या मुलीस प्रतिवर्षी रथांत बसवून तिची मिरवणूक काढण्यांत येऊं लागली व त्या दिवसापासून ही रथयात्रा अस्तित्वांत आली. ज्याप्रमाणें ओढ्या जगन्नाथाच्या रथोत्सवांत, जगन्नाथ व बलराम यांच्यामध्यें सुभद्रेची मूर्ति ठेवितात त्याप्रमाणें या बांडा कन्येच्या दोहों बाजूंस दोन बांडाकुमार बसविण्याचा प्रघात आहे. पुढें कांहीं वर्षांनीं ती कन्या मरण पावली, तथापि तिच्या मूर्तीचा उत्सव करण्याची चाल नेपाळी लोकांत अद्याप सुरू आहे. (३३) स्वयंभूमेळाः—स्वयंभू देवाच्या जन्मदिवशीं म्हणजे आश्विनी पौर्णिमेस हा मेळा भरतो. परंतु ज्येष्ठ महिन्यापासूनच देवळाचें शिखर कपड्यांनीं आच्छादून टाकितात ! पुढें, ज्या दिवशीं हा मेळा निघावयाचा, त्या दिवशीं हे कपडे काढितात व नंतर उत्सव सुरू होतो. बौद्धधर्मीय लोकांचा हा एक मोठा पवित्र दिवस आहे. (३४) मत्स्येंद्रनाथाची उपयात्राः—

...रांतील लोकांचा एक वार्षिकोत्सव आहे. वास्तविक पाहतां, हा उ... ...मंतभद्रनामक देवाप्रीत्यर्थ साजरा करण्यांत येतो. परंतु समंतभद्र हा फारसा प्रसिद्ध देव नसल्यामुळें नेपाळी लोक या उत्सवास ' मत्स्येंद्रनाथाचा उत्सव ' असेंच म्हणतात. चैत्रशुक्लअष्टमीस हा उत्सव सुरू होतो व पुढें आणखी चार दिवस तो चालू असतो. परंतु कांहीं कारणानें उत्सवांतील रथाचें एखादें चाक मोडलें किंवा दुसरें कांहीं विघ्न उपस्थित झालें तर या उत्सवाचा आणखी एक दिवस वाढतो ! (३५) **रामनवमीः**— श्रीरामचंद्राच्या जन्मदिवशीं गुरखे लोक हा उत्सव करितात. चैत्र शुक्ल अष्टमीदिवशीं सूर्य उत्तरायणांत जातो, त्या दिवशीं गुरखे लोक देवपूजा करून ब्राह्मणास व देवास यथाशक्ति द्रव्यदान करितात. हा हिंदु लोकांचा उत्सव पाहून आपणही या वेळीं एखादा उत्सव करावा अशी बौद्ध लोकांस इच्छा उत्पन्न झाल्यावरून त्यांनींही अष्टमीपासून एकादशीपर्यंत समंतभद्राचा उत्सव करण्याचा परिपाठ ठेविला आहे. (३६) **नारायणपूजा व उत्सवः**—या उत्सवाचे दिवशीं शिवपुरी पर्वताजवळील नीलकंठ नामक गांवीं व नागार्जुन पर्वताच्या पायथ्यावरील बालाजी नामक गांवीं विष्णुपूजेची मोठी धामधूम सुरू असते. पूर्वकालीं हा उत्सव नीलकंठतीर्थावर साजरा करण्यात येत असे. तेथें एका लहान पुष्करणींत श्रीशेषशायी नारायणाची एक मोठी मूर्ति असून तिच्या हातीं शंख, चक्र व गदा हीं आयुधें व एका हातीं शालिग्राम आहे. तथापि कित्येक नेपाळी लोकांची अशी समजूत आहे कीं, ही मूर्ति महादेवाची आहे. या मूर्तीस बौद्ध व हिंदु या दोन्ही धर्मांचे लोक भजतात. (३७) **मठजात यात्रा.** (३८) **शृंगवेर यात्रा.** (३९) **लोकेश्वर यात्रा** (४०) **स्वसर्प लोकेश्वर यात्रा,** इत्यादि लहानसहान यात्रा अनेक आहेत.

वर ज्या यात्रोत्सवांचीं वर्णनें दिलीं, त्यांपैकीं बऱ्याच यात्रोत्सवांसंबंधानें स्कंदपुराणाच्या हिमवत्खंडांत व स्वयंभूपुराणांत पौराणिक कथा आढळतात. या उत्सवांपैकीं, जे नेवारी लोकांचे उत्सव आहेत, त्यांतील मुख्य

कार्याकडे ते लोक फारसें लक्ष न देतां विशेषतः नाचर
गुंग होऊन जातात.

प्रसिद्ध ठिकाणें.

नेपाळांत चार मोठीं शहरें अशीं आहेत कीं, तीं भिन्न भिन्न काळीं भिन्न भिन्न राजांचीं राजधानीचीं शहरें होतीं. हीं शहरें ह्मटलीं ह्मणजे नेपाळची हल्लींची राजधानी काटमांडू, व पूर्वींच्या राजधान्या कीर्तिपुर, पाटण व भाट-गांव हीं होत. हीं चारी शहरें विष्णुमती नदीच्या कांठीं आहेत. यांशिवाय, नेपाळांत जीं दुसरीं प्रसिद्ध ठिकाणें आहेत, त्यांतील बहुतेक ठिकाणें तीर्थें, क्षेत्रें किंवा देवस्थानें ह्मणून प्रसिद्ध आहेत. त्यांतही मोठें नीलकण्ठक्षेत्र, लहान नीलकंठक्षेत्र, स्वयंभूनाथग्राम, (हीं ठिकाणें विष्णुमतीच्या कांठीं आहेत.) हरिग्राम, हयग्राम (रुद्रमतीच्या कांठीं) बोधनाथ, (रुद्रमती व वाघमती यांच्या मधील उंच प्रदेशांत) गोकर्ण, देवपाटण, चरनगर, फिर-फिंग शहर, (वाघामतीच्या उत्तर किनाऱ्यावर) शंकुनगर, चांगनारायण, तिस्मि (मनोहरा नदीकांठीं) गोदावरी गांव (चोया पर्वताच्या सपाटविर) थानकोट शहर (चंद्रगिरी पर्वतावर) हीं ठिकाणें वर्णन करण्यासारखीं आहेत. काटमांडू, कीर्तिपुर, पाटण व भाटगांव, हीं चार शहरें नेवारी जातीच्या हातीं राजसत्ता असतांना तटबंदीचीं शहरें होतीं व त्यांतून बाहेर जाण्यायेण्याकरितां अनेक ठिकाणीं मोठमोठ्या वेशी होत्या. गुरखा घराणें राज्यस्थानारूढ झाल्यापासून हे तट कोसळूं लागले आहेत व त्यांची कोणी दुरुस्ती करीत नसल्यामुळें ते लवकरच जमीनदोस्त होतील. तथापि शहराची मर्यादा या प्राचीन तटापर्यंत अद्याप समजण्यांत येते. त्या वेळच्या रीती-प्रमाणें भंगी, कसाई वगैरे नीच जातींचे हिंदु लोक शहराबाहेर राहात असत, परंतु मुसलमान लोक शहरांतच राहात असत. शहराच्या प्रत्येक वेशीपर्यंत एकेक पेंठ लागलेली असून, त्या त्या पेंठेची म्युनिसिपालिटी स्वतंत्र आहे. या म्युनिसिपालिट्या आपापल्या पेंठेच्या आरोग्यासंबंधानें योग्य ती काळजी घेतात. या चारी शहरांत एकेक राजवाडा असून त्यांत

...राजवाडे शहराच्या अगदीं मध्यभागीं आहेत. प्रत्येक राज... ...एकेक खुलें मैदान आहे व त्यांच्या चारी बाजूंस पुष्कळ मंदिरें आहेत. एकट्या काटमांडू शहरांत अशीं बत्तीस मैदानें असून त्यांत कचेऱ्या भरतात. काटमांडू, पाटण व भाटगांव, या शहरांतील मुख्य देवालयें राजवाड्यांच्या अगदीं सन्निध आहेत व कित्येक देवालयें तर राजवाड्यांच्याच इमारतींत आहेत. कीर्तिपुर येथील राजवाडा एका पर्वतावर होता तो हल्लीं मोडून पडलेला आहे! या राजवाड्यानजीक अनेक पडकीं देवळें अद्याप दृष्टीस पडतात. राजवाड्याच्या पिछाडीस मोठमोठे बगीचे, पिलखाने व घोड्यांच्या पागा आहेत.

नेपाळची हल्लींची राजधानी जें काटमांडू शहर, त्याची रचना त्रिकोणाकार आहे. बौद्ध लोक असें सांगतात कीं मंजुश्री नामक एका बौद्धधर्मीय योद्ध्यानें, आपल्या खड्गाच्या आकाराप्रमाणें या शहराची रचना केली आहे व हिंदु लोक ह्मणतात कीं ही रचना भवानीच्या तलवारीप्रमाणें करण्यांत आली आहे ! या दोहोंपैकीं कोणाचें ह्मणणें खरें आहे, हें जरी सांगतां येणें कठीण आहे, तरी एकंदरींत शहराची रचना खड्गाकार आहे, ही गोष्ट खचीत. काटमांडू शहरास प्राचीन काळीं मंजुपाटण हें नांव होतें. या शहरांतील मुख्य राजवाड्यासमोर जीं जुनीं लांकडी घरें आहेत, त्यांस नेवारी लोक 'काटमांडू' (काष्ठमंडप) असें ह्मणतात व त्यामुळें सगळ्या शहरास 'काटमांडू' हें नांव प्राप्त झालें ! इ०स०१८९६ (?)त राजलक्ष्मीन्द्रसिंहमल्लानें संन्यासी लोकांकरितां हे काष्ठमंडप बनविले असून त्यांत अद्याप हेच लोक राहतात. शिवाय या मंडपांत एक शिवमूर्तिही स्थापन करण्यांत आली आहे. काटमांडू शहराला पूर्वकाळीं ३२ वेशी होत्या. त्यांपैकीं कांहीं वेशी अद्याप पूर्वस्थितींत असून कांहीं मोडून पडलेल्या आहेत. या बत्तीस वेशींस लागून वसलेल्या ३२ पेंठा अद्याप जशाच्या तशाच आहेत. यांपैकीं शहराच्या उत्तरभागांतील राणीतलावाजवळील 'आसन टोला, इंद्रचौक, दरबारचौक, काटमांडू टोला, टोवा टोला व लहान टोला, या पेंठा प्रेक्षणीय आहेत. दरबार चौकांत मुख्य राजवाडा असून, त्याचे उत्तरेस तलिजुमंदिरनामक देवालय, दक्षि-

णेस वसंतपुर व नवा दरबार महाल, पूर्वेस राजोद्यान, हस्ति [illegible] व पश्चिमेस सिंहदरवाजा आहे. या चौकांत, नेवारी लो[illegible] णीचीं घरें दृष्टीस पडतात. हल्लीं कांहीं लोकांनीं आपल्या घरांची रचना इंग्रजी पद्धतीवर केलेली आहे. काटमांडू शहरांत जीं हिंदु देवतांचीं देवळें आहेत, त्यांत ‘ तल्लिजुमंदिर ’ हें एकच पाहण्यासारखें देऊळ आहे. शहराची लोकसंख्या साठ हजारांपासून ऐशींहजार असून, सर्वांत अधिक वस्ती नेवारी लोकांची आहे. शहराबाहेर पूर्वदिशेस ‘ ठण्डीखेल ’ नामक मठांत सैन्याच्या कवाइतीचें मोठें मैदान आहे. या मैदानाच्या मध्यभागीं सर जंगबहादूर यांची सोन्याचा मुलामा चढविलेली एक मूर्ति असून, ती, इ० स० १८५६ त, त्यानींच स्वतः स्थापन केलेली आहे. शहरांतील दारुखान्यांत जगन्नाथाचें देऊळ असून, तें सर जंगबहादुर यांनीं इ० स० १८५२ या वर्षी बांधिलें. कवाइतीच्या मैदानाकडे जाण्याच्या रस्त्यावर महाकालाचें एक अत्यंत पुरातन असें लहानसें मंदिर असून, त्यांत जी महाकालस्वरूप शंकराची मूर्ति आहे, ती ‘ पद्मपाणी बोधिसत्व ’ या बौद्ध देवतेची मूर्ति आहे, असें बौद्ध लोकांच्या प्राचीन लेखांवरून समजतें. या महाकालमूर्तीच्या मस्तकावर आणखी एक लहान मूर्ति असलेली दृष्टीस पडते, परंतु ती कोणत्या देवतेची आहे, हें समजत नाहीं. कदाचित् ही चंद्राची मूर्ति असेल. परंतु बौद्धलोक म्हणतात कीं, ही मूर्ति पद्मपाणीचीच आहे. त्यांतही विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, या मूर्तीस बौद्ध व हिंदु सारखेच पूज्य मानितात व आपआपल्या पद्धतीप्रमाणें त्यांची पूजाअर्चा करितात ! शहराच्या उत्तर–पश्चिम अंगास एक तलाव असून, त्याच्या मध्यभागीं देवीचें देऊळ आहे. या देवळाकडे जाण्यासाठीं एक पूल केलेला असून, त्याजवर दाट गवत असल्यामुळें तो देखावा मोठा रमणीय दिसतो. पूर्वी या तलावाची शोभा फार प्रेक्षणीय होती, परंतु सर जंगबहादूर यांनीं त्याच्या चारी बाजूंस तटबंदी करून, ती शोभा नष्ट करून टाकिली.

‘ राणी पोखरा ’ सरोवराच्या पूर्वोत्तर कोनास नारायणाचें एक लहानसें मंदिर असून, त्याच्यासभोंवतीं देवदारांचें दाट अरण्य व जवळच एक

... साहात असल्यामुळें, हें स्थळ फार प्रेक्षणीय झालें आहे. या स्थळा... ...हट्टी' असें ह्मणतात. मंदिराच्या समोरच 'फत्तेजंग चौथरा' नामक स्थळ असून, त्या ठिकाणीं 'फत्तेजंग' नामक एक प्रसिद्ध नेपाळी गृहस्थ रहात असे. सरोवराच्या दक्षिणतीरावर एक दगडी हत्ती असून, त्याजवर राजा प्रतापमल्ल व त्याची राणी यांच्या मूर्ति वसविलेल्या आहेत. याच राणीनें राणीपोखरा तलाव बांधविला. काटमांडू शहराच्या पश्चिमेकडील स्वयंभूनाथनामक पहाडाच्या दक्षिणेस जी उंच जमीन आहे, ती सैन्याच्या कवाइतीची जागा असून, तेथें नेपाळच्या तोफखान्यावरील गोलंदाज लोक राहतात. शहराच्या दक्षिणेस, वाघमती व विष्णुमती या नद्यांच्या संगमावर वाघमतीच्या दक्षिणतीरीं सेनापति व्योमबहादूर यांनीं बांधविलेला २०० गज लांबीचा एक घाट असून, त्यास काटमांडू, कान्तिपुर, जिनदेशी इत्यादि अनेक नांवें आहेत. काटमांडु शहराच्या स्थापनेसंबंधानें अशी माहिती मिळते कीं, कलियुगाच्या ३,८२४ व्या वर्षीं (इ. स. ७२), राजा गुणकाम देव यानें हें शहर वसविलें.

राणीपोखरा तलावाच्या दक्षिणेस 'ठण्डीखेल' नामक छावणी असून तींत 'धरारा' नामक एक उंच दगडी खांब आहे. हा खांब भीमसेन थापा नामक एका पूर्वकालीन सेनापतीनें बांधविला असून, तो २५० फूट उंच आहे शिखरावर चढून जाण्यासाठीं खांबाच्या आंत दगडी जिना असून, आंत हवा येण्यासाठीं ठिकठिकाणीं लहान लहान द्वारें ठेविलीं आहेत. इ० स० १८५६ यावर्षीं, वीज पडून या स्तंभाचा कांहीं भाग तुटून पडला होता, परंतु तो पूर्ववत् बांधून काढण्यांत आला. याच ठिकाणीं भीमसेन थापानें बांधविलेला आणखी एक स्तंभ होता, परंतु १८३२ सालीं झालेल्या भूकंपानें तो अगदीं जमीनदोस्त होऊन गेला. वर ज्या स्तंभाचें वर्णन दिलें आहे, तो स्तंभ फार प्रेक्षणीय असून त्याची रचना तारीफ करण्यासारखी आहे. काटमांडूच्या उत्तरेस एक मैलावर ब्रिटिश रेसिडेंटचा बंगला व एक मोठा बगीचा आहे. काटमांडूहून पाटणकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाघमती नदीस जो मोठा पूल आहे, त्याच्या उत्तरेस जवळच एका चौथऱ्यावर एक पाषाण-

स्तंभ असून त्याच्या शिखरावर सिंहाची एक मूर्ति ... अद्भुत स्तंभ, सेनापति भीमसेनथापा यानेंच उभारले... तारीफ हिमालयापासून सेतुबंध रामेश्वरापर्यंत सारखी ऐकूं येते. नेपाळांतील सर्व शहरांत पाटण हें फार मोठें शहर आहे. या शहराचें दुसरें नांव ‘ ललित पट्टण ’ असून तें काटमांडूच्या दक्षिण व पूर्व या दिशांच्यामध्यें पाऊण कोसावर वाघमतीच्या दक्षिण तीरीं वसलेलें आहे. गुरखा राजवंशाच्या हातीं नेपाळची राजसत्ता जाण्याच्या पूर्वीं नेपाळांत जीं तीन प्रमुख राज्यें होतीं, त्यांपैकीं एका राज्याची पाटण ही राजधानी होती.

कीर्तिपुरापासून चंद्रगिरी पर्वतापर्यंत जीं लहान मोठीं अनेक गांवें आहेत, त्यांत **थानकोट** हें गांव बरेंच प्रसिद्ध आहे. थानकोटच्या पूर्वेकडील पहाडांवरही पुष्कळ गांव आहेत. त्यांत **कीर्तिपूर** शहर मुख्य आहे. हें शहर पूर्वीं एका स्वतंत्र राज्याची राजधानी होती, परंतु पुढें तें राज्य पाटणयेथील राजानें जिंकून आपल्या राज्यास जोडिलें. कीर्तिपुर शहर सपाट जमिनीपासून ४०० फूट उंचीवर वसलेलें असून, तेथील किल्ला केवळ दुर्भेद्य आहे, अशी प्रसिद्धि आहे. इ०स० १७६५ पासून १७६७ पर्यंत राजा पृथ्वीनारायण यानें या शहरास वेढा दिला होता परंतु केवळ युद्ध करून शहर घेणें अशक्य वाटल्यामुंळ त्यास शेवटीं विश्वासघातानें शहर घेणें भाग पडलें ! अशा रीतीनें नगरांत प्रवेश होतांच, राजा पृथ्वीनारायण यानें शहरांतील एकून एक मनुष्यांस नासिकाच्छेदाची शिक्षा दिली व ती तात्काळ अमलांत आणिली ! म्हातारे, स्त्रिया व बालकें यांजवर सुद्धां त्यानें दया केली नाहीं ! मात्र वांसरी (मुरली) वाजविण्यांत जे लोक कुशल होते, त्यांस ही शिक्षा माफ करण्यांत आली होती. या वेळीं फादर गेसनी नामक एक पाद्री कीर्तिपुर येथें राहात असे; त्यानें आपल्या नेपाळच्या इतिहासांत राजा पृथ्वीनारायण याच्या या भयंकर कृत्याच्या पुष्कळ गोष्टी लिहिलेल्या आहेत. ही गोष्ट घडल्यानंतर ३० वर्षांनीं कर्नल प्याट्रिक नामक एक इंग्रज योद्धा नेपाळांत गेला होता, त्यानेंही कीर्तिपुर शहरांत आपण पुष्कळ नाक कापलेले लोक पाहिले, असें लिहिलें आहे. कीर्तिपुर शहराची लोक संख्या सुमारें पांच

...वीनारायण याच्या आज्ञेवरून या शहरास 'नासकाटा-...' ...त. हें शहर गुरखे लोकांच्या हातीं गेल्यापासून त्याचा विध्वंस हो... चालला आहे, परंतु देवळें व इतर प्राचीन इमारती, यांस मात्र फारसा धक्का पोंचलेला नाहीं. या शहरांत केवळ नेवारी लोकांचीच वस्ती आहे. येथील हवापाणी फार उत्तम आहे, परंतु आसपासच्या डोंगरी प्रदेशांत गंड-माळा रोगाचें बरेंच प्राबल्य आहे. तथापि खुद्द कीर्तिपुर शहरांत या रोगाचा एकही रोगी सांपडणार नाहीं. येथील राजवाडा व मंदिरें, शहराच्या पश्चिमेस जो पहाड आहे, त्याजवर बांधिलेलीं असून, तीं फार प्रेक्षणीय आहेत. या सर्व इमारती सध्यां छिन्नभिन्न झालेल्या असल्यामुळें, त्यांच्या मूळच्या आकाराची व बांधणीची बिनचूक कल्पना करितां येणें कठीण आहे. या इमारतींपैकीं पिंवळ्या रंगाच्या दगडांचीं दोन मंदिरें मात्र हा कालपावेतों पंचमहाभूतांच्या भयंकर जबड्यांतून सुरक्षित राहिलेलीं आहेत. तथापि त्यांचें छत तुटून पडलें असून भिंतींवर गवत उगवलें आहे. मात्र आंतील सिंहव्याघ्रादिकांच्या मूर्ति अद्याप जशाच्या तशा आहेत. हीं मंदिरें ज्या पिंवळ्या पाषाणांनीं बांधलेलीं आहेत म्हणून वर लिहिलें, त्याप्रकारचा पाषाण नेपाळांत हल्लीं मुळींच सांपडत नाहीं. हीं मंदिरें इ. स. १५५५ या वर्षी बांधण्यांत आलीं.

कीर्तिपुर शहरांतील बहुतेक मंदिरें पडलेलीं असून, ज्यांच्या दुरुस्तीसाठीं सरकारांतून पैशाची नेमणूक करून देण्यांत आलेली आहे, अशीं कांहीं मंदिरें मात्र चांगल्या स्थितींत आहेत. त्या सर्वांत भैरवाचें मंदिर मुख्य असून, वार्षिक उत्सवाचे वेळीं तेथें शेंकडो यात्रेकरू जमा होतात. या देवळांत महादेवाचें लिंग किंवा मूर्ति यांपैकीं एकही नसून, त्यांचे ऐवजीं एक पाषाणाचा व्याघ्र आहे! व लोक त्याचेंच पूजन करितात! या देवळाच्या आसपास, आणखी दोन तीन पडकीं देवालयें आहेत. कीर्तिपुरच्या उत्तरेस एका पहाडावर एक गणेशमंदिर आहे. या मंदिराचें बांधकाम फार वर्णनीय आहे. मंदिराच्या भिंतीवर जीं असंख्य चित्रें कोरलेलीं आहेत, त्यांत पौराणिक चित्रांचाच भरणा अधिक आहे. हें मंदिर इ० स०

१६६५ या वर्षी 'जैसी' नामक जातीच्या एका धर्मगुरून... तील गणेशमूर्तीच्या डाव्या अंगास मयूरारूढ सरस्वती, महि... शिवारोहिणी चामुंडा यांच्या मूर्ति आहेत आणि उजव्या बाजूस गरुरारूढ वैष्णवी, ऐरावतारूढ इंद्राणी, व सिंहारूढ महालक्ष्मी यांच्या मूर्ति आहेत. मंदिराच्या वरच्या मजल्यावर मध्यभागीं भैरव व शिव व त्यांच्या डाव्या बाजूस हंसारूढ सावित्री (ब्रह्माणी) व उजव्या बाजूस वृषभारूढ रुद्राणी यांच्या मूर्ति असून, या आठ देवींस अष्टमातृका असें ह्मणतात. कीर्तिपुरच्या नैर्ऋत्य दिशेस 'चिलनदेव' या नांवाचें एक बौद्धमंदिर आहे. हें मंदिर जरी फार लहान आहे, तरी त्याच्या भिंतींवर बौद्ध देवतांचीं चित्रें व बौद्ध धर्मातील कांहीं सांकेतिक चिन्हें कोरलेलीं असल्यामुळें, बौद्ध लोकांत त्याची विशेष मान्यता आहे. कीर्तिपुरच्या पूर्वेस व काटमांडूच्या दक्षिणेस एक कोस 'चौवहाल' नामक गांव असून, तेथून दीड कोसावर '**भाटगांव**' आहे. हा गांव, महादेव पोखरा शिखरापासून दीड-कोस व काटमांडूपासून चार कोस असून, तो हनुमानमती नदीच्या कांठीं वसलेला आहे. या गांवच्या पूर्व व दक्षिण बाजूंनीं हनुमानमती व उत्तर व पश्चिम बाजूंनीं कंसावती या नद्या वाहतात. या गांवाची रचना शंखाकार आहे. भाटगांव व काटमांडू यांच्या दरम्यान नदी, बूढी व खेमी हे गांव असून, त्यांपैकीं खेमी गांवांत सोन्याचे दागिने व इतर जिन्नस फार चांगले तयार होतात. 'फिरफिंग' हें लहान शहर वाघमतीच्या दक्षिण तीरावर आहे. पाटण शहराच्या दक्षिणेस जो मार्ग जातो, त्याजवर 'चम्पागांव' नामक शहर असून, तेथील पवित्र अरण्यांत एक पुरातन मंदिर आहे.

गोदावरी उर्फ गदौरी, हें शहर, फुलचोया पर्वताच्या उतरणीवर असून, तें एक पवित्र क्षेत्र आहे. तेथें, प्रत्येक बारावर्षांनीं एका झऱ्याच्या कांठीं एक महिनाभर मोठी यात्रा भरते. या शहरचे रहिवासी असें सांगतात कीं, दक्षिणेंतील गोदावरी नदीचा व या झऱ्याचा गुप्तपणानें संगम झालेला असून, या शहरास 'गोदावरी' हें नांव प्राप्त होण्याचेंही हेंच कारण आहे. शहराच्या आसपास पुष्कळ मंदिरें व जलाशय आहेत. येथें वेलदोडे

र्वे त्यांचा मोठा व्यापार चालतो. पर्वतांच्या शिखरांवर गुलाब, माल, जाई, जुई इत्यादि फुलझाडें इतकीं आहेत कीं, सगळ्या नेपाळांत दुसरीकडे अशीं फुलझाडें कोठेंही होत नाहींत. या पुष्पाधिक्यामुळेंच या पर्वतास ' फुलचोया ' हें नांव प्राप्त झालेलें आहे. या पर्वताच्या शिखरावर एक लहानसें पवित्र मंदिर असून, तेथें शेंकडो यात्रेकरू जातात. मंदिराजवळ दोन मातीचे स्तंभ असून, त्यांपैकीं एकावर कापड विणण्याच्या मागाचें चित्र व दुसऱ्यावर त्रिशूल काढलेला आहे.

पशुपतिनाथः—काटमांडूच्या पूर्वोत्तर बाजूनें एक रस्ता नवसागर, नन्दीगांव, हरिगांव, चवाहिल व देशोपाटण या गांवांवरून पशुपतिनाथ तीर्थापर्यंत गेला आहे. हें तीर्थ काटमांडूपासून चार मैल आहे.

चंगुनारायणः—हें शहर पशुपतिनाथ तीर्थापासून सहा मैल असून तें मनोहरा नदीच्या कांठीं वसलें आहे. या नगरांत चार उपनगरें असून त्यांपैकीं प्रत्येक उपनगरांत एकेक नारायणाचें मंदिर आहे, व त्या त्या देवाच्या नांवावरून हीं नगरें ओळखिलीं जातात. या चारी नारायण मूर्तींचें एका दिवसांत दर्शन घेतलें असतां मोठें पुण्य प्राप्त होतें, असा नेपाळी लोकांचा समज आहे व त्याप्रमाणें पडेल तो त्रास सहन करून शेंकडो भाविक लोक हें पुण्य संपादन करितात. या चारी मूर्तींचीं नांवें अशीं आहेतः—चंगुनारायण, विशंकुनारायण, शिखरनारायण व एचंगुनारायण, या चार गांवांचा विस्तार बावीस कोस आहे.

शंकुः—हें शहर चंगुनारायणाच्या पूर्वोत्तर बाजूस तीन मैल अंतरावर आहे. येथेंही पुष्कळ यात्रेकरू जमा होतात. या ठिकाणीं सिद्धिविनायकाचें मंदिर आहे.

गोकर्णः—हें तीर्थ पशुपतिनाथ तीर्थाच्या पूर्वोत्तर दिशेस वाघमतीनदीच्या कांठीं असून नेपाळांतील प्रसिद्ध तीर्थांत त्याची गणना होते. या तीर्थानजीक सर जंगबहादूर यांनीं राखलेलें एक शिकारीचें अरण्य आहे.

बोधनाथः—हा गांव पशुपतिनाथ व काटमांडू यांच्या दरम्यान वसलेला असून, त्याची रचना चक्राकार आहे. मध्यभागीं एक मोठें बौद्ध

मंदिर असून त्यांतील वेदीं विटांनीं बांधलेली आहे. असून, त्याचा कळस पितळेचा आहे. मंदिराचा व्यास आंत बौद्ध देवतांच्या प्रतिमा ठेवलेल्या आहेत. नेपाळांतील भोटिये लोक व तिबेटी बौद्ध लोक यांचा या मंदिराचे ठायीं विशेष पूज्यभाव आहे. या मंदिराच्या वार्षिकोत्सवप्रसंगीं या ठिकाणीं, ताईत व धातूचे गळपट्टे यांचा मोठा खप होतो. विशेषतः भोटिये लोक हे जिन्नस फार उपयोगांत आणितात.

नीलकण्ठः—शिवपुरी पर्वतावर नीलकण्ठ नामक जें प्रसिद्ध सरोवर आहे, त्याच्या कांठीं हा गांव असून, तेथें नीलकंठाचें देवालय आहे.

बालाजीः—हा गांव विष्णुमती नदीच्या पलीकडे नागार्जुन पर्वताच्या अरण्यमय पायथ्याशीं आहे. या पर्वताच्या कांहीं भागावरील अरण्य सर जंगबहादूर यांनीं राखून ठेविलेलें असून, त्यास मृगारण्य असें ह्मणतात. या पर्वतावर पाण्याचे पुष्कळ झरे आहेत; शिवाय येथें नेपाळ सरकारचा एक बगीचाही आहे.

स्वयंभूनाथः—हा गांव काटमांडूच्या पश्चिमेस दोन मैल असून, तेथें पर्वताच्या शिखरावर बौद्ध देवता स्वयंभूनाथ याचें मंदिर आहे. मंदिरापर्यंत चढून जाण्यास ४०० पायऱ्या आहेत. पहिल्या पायराजवळ शाक्यसिंहाची एक फार मोठी मूर्ति असून, एका तीन फूट उंचीच्या वेदीवर इंद्राच्या वज्राची एक पाषाणी प्रतिमा आहे.

भोगमतीः—हा गांव, कीर्तिपुर शहराच्या दक्षिणेस दीड कोसावर वाघमती नदीच्या कांठीं आहे. या गांवांत मत्स्येंद्रनाथाची रथारूढ मूर्ति, वर्षांतून सहा महिने वास करिते.

नवकोटः—हें शहर नवकोट प्रांतांतील मुख्य शहर आहे. काटमांडूच्या पूर्वेस २५ मैलांवर धैवंग उर्फ जिवजिविया या नांवाचा जो पहाड आहे, त्याच्या शिखरावर हें शहर वसलेलें आहे. या नगरापासून पूर्वेच्या बाजूस अर्ध कोस त्रिशूलगंगा व पूर्व व दक्षिण या बाजूस अर्धकोस ताडी उर्फ सूर्यगंगा या नद्या वाहतात. नवकोट शहरांत दोन राजवाडे अथवा दरबार-महाल आहेत. नेपाळांतील प्रख्यात भैरवी देवीचें देवालयही याच शहरांत

... ६–१७ सालीं नेपाळी लोकांची इंग्रजांशीं जी लढाई ... त नेपाळचे राजे उन्हाळ्यांत याच शहरांत येऊन राहात असत. इ. स. १८१३ पासून नेपाळ सरकारानें काटमांडू येथेंच आपलें कायमचें ठाणें केल्यामुळें या शहरांतील राजवाडे व इतर प्राचीन इमारती पडत झडत चालल्या आहेत.

देवीघाटः—हें ठिकाण नवकोट शहरापासून पाऊण कोसावर असून, तेथें त्रिशूलगंगा व सूर्यमती या नद्यांचा संगम झालेला आहे. या संगमस्थानीं भैरवी नामक देवीचें मंदिर असून वैशाख महिन्यांत तेथें मोठी यात्रा भरते. वस्तुतः या मंदिरांत मूर्ति मुळींच नसून यात्रेच्या वेळीं नवकोट शहरांतील भैरवीची मूर्ति तेथें नेण्यांत येते.

रंगोलीः—हें हवाशीर ठिकाण मोरंग नामक तराईच्या मध्यभागीं वसलें आहे. येथील हवा फारच आल्हादकारक आहे. येथील नदीचें पाणीही फार उत्तम आहे. या तराईत हनुमानगंज, जलेश्वर, बुडहरवा इत्यादि शहरें आहेत.

थानकोटः—हें लहान परंतु टुमदार शहर, खुद्द नेपाळप्रांताच्या सरहद्दीवर आहे.

महेश डोवंगः—हा गांव काटमांडूच्या पश्चिमेस दहा कोसांवर आहे. या गांवानजीक त्रिशूलगंगा व महेशखोला या नद्यांचा संगम झालेला आहे.

भंगकोटधारः—हें शहर काटमांडूच्या पश्चिमेस वीस कोसांवर असून, तेथें सेनापति भीमसेन यानें बांधविलेलीं कांहीं दगडी मंदिरें आहेत.

गुर्खा नगरः—हें शहर काटमांडूपासून ३६ कोसांवर धरमडी नदीच्या कांठीं आहे. नेपाळच्या वर्तमान राजवंशाची ही प्राचीन राजधानी आहे.

टानाहंगुः—हें प्राचीन राजधानीचें शहर काटमांडूपासून ३४ कोस असून, तेथील राजवाडा जमीनदोस्त झाला आहे.

पोखराः—हें शहर सेतुगंज नदीच्या कांठीं आहे. ही एका लहानशा स्वतंत्र राज्याची राजधानी आहे. हें शहर बरेंच मोठें असून, तेथील लोक

वस्तीही मोठी आहे. येथें सर्व प्रकारचीं धान्यें व तांब्या[illegible]
व्यापार चालतो. येथें एक मोठा वार्षिक मेळाही भरतो.

शतहुं:—हीही एका लहान परंतु स्वतंत्र अशा राज्या[illegible] राजधानी असून, तेथें एक मोठा राजवाडा आहे.

तानसेन:—हें शहर एका मांडलिक राज्याच्या राजधानीचें शहर असून, तेथें पाल्पा देशांतील सैन्याची मुख्य छावणी आहे. या छावणींत १,००० शिपाई राहतात. येथें एक नवा राजवाडा व बाजार असून, त्यांत सुती कपड्यांचा मोठा व्यापार चालतो. येथें एक टांकसाळ आहे, तींत तांब्याचें नाणें पाडितात. हें शहर काटमांडूच्या पश्चिमेस ६१ कोस आहे.

पापलानगर:—हें शहर काटमांडूपासून ६३ कोस अंतरावर आहे. येथें एक राजवाडा आहे.

पेन्टाना:—हें शहर काटमांडूपासून ६३ कोस असून तेथें दारू व बंदुका यांचे कारखाने आहेत. या शहरानजीक मुसिनिया व भनगंज हे गांव असून तेथून पुष्कळ सोरा पेन्टाना येथें येतो.

सलियाना:—हें एका स्वतंत्र राज्याच्या राजधानीचें शहर असून काटमांडूपासून ११० कोसांवर पश्चिमेकडील इरंवलखोला नामक नदीकांठीं तें वसलेलें आहे. येथें एक राजवाडा व कित्येक मंदिरेंही आहेत.

जजुरकोट:—हें प्राचीन राजधानीचें शहर भेडीगंगा नदीच्या कांठीं असून तेथील राजवाडा व मंदिरें पडक्या स्थितींत आहेत.

तरिया:—हा गांव धैवंग पर्वताच्या एका शाखेवर वसलेला आहे. गांवानजीक एक मोठी स्वाभाविक गुंफा असून तींत दोन तनिशें माणसें सहज राहूं शकतात. गोसाईस्थान पर्वतावर जाणारे यात्रेकरू या गुंफेंत विश्रांति घेतात. या गुंफेस नेवारी लोक 'भीमलपार्कु' व इतर पहाडीलोक 'भीमलगुंफा' असें ह्मणतात. या संबंधानें अशी एक आख्यायिका सांगण्यांत येते कीं, 'भीमल' नामक एका नेवारी पुरोहितानें, तिबेट जिंकण्यासाठीं कांहीं सैन्य पाठविलें होतें. त्यावेळीं तिबेट येथील लामानें, एक मोठा पर्वतखंड या सैन्यावर फेंकिला; परंतु 'भीमल' यानें तो पर्वतखंड आपल्या हातांनीं झेलून, आपल्या सैन्याचें

...पासून तो पर्वतखंड तसाच अंतराळीं राहिल्यामुळें ही ... आलेली आहे.

दुगचा—हा गांव भीमलगुंफेपासून दीड कोस असून, तेथें बौद्ध त्रिमूर्तीचें एक मंदिर आहे. या मंदिराच्या शिखरावर दोन छत्रें आहेत. या गांवा-नजीक चंदनवाडी नामक पर्वतावर लौडीगणेशाचें मंदिर आहे. मंदिरांत गणपतीची मूर्ति नसून, तिच्या ठिकाणीं एक मोठा पाषाण आहे. तेथें एक अशी विलक्षण चाल आहे कीं, या गणपतीच्या दर्शनास जाणाऱ्यांनीं आपल्या हातांतील काठी तेथेंच ठेविली पाहिजे. जर कोणी ती काठी परत आपल्या बरोबर घेऊन जाईल, तर श्रीगणेशाचा त्याच्यावर रोष होईल असें ह्मणतात !

प्राचीन व अर्वाचीन इतिहास.

भरतखंडांतील इतर देशांच्या इतिहासाप्रमाणेंच नेपाळचा प्राचीन इतिहासही म्हणण्यासारखा उपलब्ध झालेला नाहीं. पौराणिक ग्रंथांपैकीं स्कंदपुराणाचीं नागर, सह्याद्रि व रेवा हीं खंडें, देवीपुराण, गरुडपुराण, जैनाच्या अरिष्टनेमीपुराणांतर्गत हरिवंश, बृहन्नीलतंत्र, वराहमिहीरकृत बृहत्संहिता व हेमचंद्रकृत स्थविरावलीचरित, या ग्रंथांत नेपाळदेशासंबंधानें कांहीं गोष्टी सांगितलेल्या आहेत. याशिवाय बौद्धतंत्र व स्वयंभूपुराण, या बौद्धग्रंथांत व स्कंदपुराणाच्या हिमवत् खंडांत, नेपाळचें थोडेंबहुत वर्णन आढळतें. परंतु या तुटपुंज्या पौराणिक माहितीवरून नेपाळचा विश्वसनीय प्राचीन इतिहास लिहितां येणें अशक्य आहे.

असें समजतें कीं, नेपाळांतील अनेक स्थलीं कित्येक जुन्या घराण्यांत, नेपाळच्या पूर्वकालीन इतिहासासंबंधाचे बरेच कागदपत्र आहेत. प्रसिद्ध शोधक गृहस्थ भगवानलाल इंद्रलाल हे नेपाळांत असतांना, हे जुने कागदपत्र मिळविण्याची त्यांनीं पुष्कळ खटपट केली होती, परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, त्यांना या कामीं बिलकूल यशप्राप्ति झाली नाहीं. थोड्या वर्षांपूर्वी 'पार्व-

(१) Indian Antiquary, Vol. XIII. P. 411,

तीय वंशावली ' नामक एक पुस्तक उपलब्ध झालेलें ... आधारानें नेपाळचा विस्तृत इतिहास लिहिण्याचा कांहीं ... युरोपियन गृहस्थांनीं प्रयत्न केला आहे[२], परंतु या ग्रंथांत, सर्व ऐतिहासिक गोष्टी कालक्रमानुसार दिलेल्या नाहींत. येन केन प्रकारेण नेपाळचा प्राचीन इतिहास लिहून तो प्रसिद्ध केल्याचें श्रेय आपणास मिळावें, या उत्कट लालसेनें वेडावून गेलेल्या या अर्वाचीन ग्रंथकारांनीं सरसकट सगळ्या खऱ्या खोट्या गोष्टींचा व दंतकथांचा आपल्या ग्रंथांत समावेश केलेला असल्यामुळें त्यांत ऐतिहासिक सत्याचा भाग किती आहे व जांवईशोधामुळें झालेल्या घुसडाघुसडीनें त्या ग्रंथांचीं किती पृष्ठें अडविलीं आहेत याचा निर्णय करणें मुष्किलीचें झालें आहे व यामुळेंच आजपर्यंत या ग्रंथांच्या आधारानें नेपाळचा विश्वसनीय प्राचीन इतिहास लिहिण्याचा ज्यांनीं ज्यांनीं प्रयत्न केला, त्या सर्वांस विश्वसनीय माहितीच्या अभावीं शेवटीं आपल्या लेखणीस या विषयापुरती कायमची रजा देणें भाग पडलें !

' बौद्धपार्वतीयवंशावली ' या ग्रंथाच्या मतें गोपाळवंशांतील नैमुनी नामक मनुष्यानें नेपाळांतील मातातीर्थ येथें पहिल्यानें राज्य स्थापन केलें. या वंशांतील राजांनीं ५२१ वर्षें नेपाळांत राज्य केलें. यानंतर ५२६ वर्षांनीं किरात वंशांतील जितदास्ती नामक एका मनुष्यानें नेपाळ देश अधिकृत केला. हा ' जितेदास्ति ' कौरव पांडवांच्या महायुद्धांत पांडवांच्या तर्फेनें लढत असतां मरण पावला अशी वरील ग्रंथांत माहिती मिळते, परंतु ही माहिती कितपत विश्वसनीय आहे हें सांगतां येणें अशक्य आहे. तथापि सुधारलेल्या आर्य लोकांचा नेपाळांत प्रवेश होण्यापूर्वी तो देश किरात व गोपाळ यांच्या किंवा अशाप्रकारच्या दुसऱ्या कांहीं रानटी लोकांच्या ताब्यांत होता, असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

---

(२) या सर्व इतिहासग्रंथांपैकीं, Francis Hamilton's ' Kingdom of Nepal ' Kirkpatriek's Nepal; J. Prinsep's useful Tables ' व D. Wright's History of Nepal हे चार ग्रंथ महत्वाचे आहेत.

...त अशोक राजाच्या वेळचा जो शिलालेख सांपडला आहे, ... आले असें समजतें कीं, एका काळीं नेपाळच्या दक्षिण भागांत शाक्य वंशांतील राजे राज्य करीत होते व याच वंशांत गौतमबुद्धानें अवतार घेतला. वायु व ब्रह्मांड या पुराणांत शाक्यवंशांतील एका राजाच्या नांवाचा उल्लेख केलेला आढळतो व त्यावरून गौतमबुद्धापूर्वी, शाक्य-वंशांत निदान पांच सात राजे तरी होऊन गेले असावे, असें अनुमान होतें. गौतमबुद्धानंतर बऱ्याच वर्षांनीं अशोक राजा गादीवर बसला हें इतिहास-ज्ञांस सांगावयास नकोच.

वरील काळा नंतर **लिच्छविराज** नामक राजवंशाच्या हातीं नेपाळची राजसत्ता गेली, परंतु बौद्धपार्वतीय वंशावली ग्रंथांत या वंशांतील राजांच्या नांवाचा बिलकुल उल्लेख केलेला नाहीं. तथापि प्रसिद्ध शोधक गृहस्थ भग-वानलाल इंद्रजी यांच्या प्रयत्नानें जे २३ प्राचीन शिलालेख उपलब्ध झालेले आहेत, त्यांपैकीं १५ शिलालेख या लिच्छविराजवंशांतील राजांच्या वेळचे आहेत. यानंतर, मि. बेन्डेल यांनींही तीन प्राचीन शिलालेख छापून प्रसिद्ध केले. या २६ शिलालेखांच्या आधारानें या लिच्छविराज राज-वंशाचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न, डॉ. फ्लिट व डॉ. हॉर्नली यांनीं केला होता; परंतु इतकी अनुकूलता असतांही केवळ अनास्थेमुळें हा त्यांचा प्रयत्न जावा तसा सिद्धीस गेलेला नाहीं.

पंडित भगवानलाल यांनीं संग्रहीत केलेल्या १५ शिलालेखांवरून नेपाळ-च्या पुरातन राजगणासंबंधानें जो कालनिर्णय केला आहे, तो खालीं लिहि-ल्याप्रमाणें—

(१) जयदेव पहिला, सुमारें इसवी सन १

(२) जयदेव दुसरा, हा या राजकुलांतील १२ वा पुरुष होय. याच्या नंतरच्या ११ पुरुषांचीं नांवें शिलालेखांत दिलेलीं नाहींत व दुसऱ्या जय-देवाचा कालही दिलेला नाहीं.

(१३) वृषदेव, सुमारें इ० स० २६०

(१४) शंकरदेव, सुमारें इ० स० २८५

(१५) धर्मदेव, (याच्या स्त्रीचें नांव राजवती)
(१६) मानदेव, संवत् ३८६–४१३, इ०सन ३
(१७) महीदेव, सुमारें इ०सन ३६०
(१८) वसंतदेव उर्फ वसंतसेन, संवत् ४३५ इ०सन ३७८
(१९) उदयदेव, सुमारें इ०सन ४००

वीसापासून सत्तावीसपर्यंत आठ राजांचीं नांवें १५ व्या शिलालेखांत सोडून दिलेलीं आहेत.

(२८) शिवदेव पहिला, सुमारें इ० सन ६१०महासामंत अंशुवर्मा (मागाहून महाराज) श्रीहर्षसंवत्३४–४५व इ.सन६४०–६५१
(२९) या राजाचें नांव शिलालेखांत दिलेलें नाहीं.
(३०) ध्रुवदेव श्रीहर्षसंवत् ४८ व इ.सन ६५४–५५विष्णुगुप्त श्रीहर्षसंवत् ४६ व इ.सन ६५५–५७
(३१) याचें नांव शिलालेखात नाहीं.
(३२) विष्णुगुप्त
(३३) नरेंद्रदेव. सुमारें इ.सन.६९०
(३४) शिवदेव दुसरा, आदित्यसेनाची कन्या व मैखरी राजभोगवर्मा याची कन्या वत्सदेवी, या दोन स्त्रियांशीं याचा विवाह झाला होता. श्रीहर्ष संवत् ११९–१४५ इ०सन७२५–७५१
(३५) जयदेव दुसरा, (परचक्रकाम) (गौडोड्र कलिंगकोशलाधिप) भगदत्तवंशीय हर्षदेवाची कन्या राजमती हिर्शी याचा विवाह झाला होता. श्रीहर्ष संवत्१५३ व इ. सन७५९–६०

या शिलालेखासंबंधानें मूळ हिंदी ग्रंथांत बरेंच विवरण केलेलें आहे; परंतु तें येथें देणें अनवश्यक वाटल्यावरून त्या संबंधाचा विचार येथें केला नाहीं.

ज्या ‘ पार्वतीयवंशावलीचा ’ मागें उल्लेख केला आहे, ती जरी केवळ विश्वसनीय नाहीं, तरी त्यांत बऱ्याच ऐतिहासिक गोष्टी ग्रथित केलेल्या असून पंडित भगवानलाल व दुसरे विद्वान् ग्रंथकार ह्यांनीं आपल्या ग्रंथ-

... गोष्टींचा उपयोग केलेला आहे. या वंशावलींत एके ... आले हिलें आहे:—

सूर्य...य राजा विश्वदेववर्मा यानें ठाकूरवंशीय अंशुवर्मा यास आपली कन्या दिली होती. या राजाच्या कारकीर्दींत उज्जनीचा प्रतापी राजा विक्रमादित्य हा नेपाळांत गेला व तेथें त्यानें आपला संवत् सुरू केला. अंशुवर्मा हाही राजा होता, त्यानें मध्यलखु (कैलासकूट) नामक ठिकाणीं आपली राजधानी वसविली होती. याच्या कारकीर्दींत विभुवर्मा नामक एका पुरुषानें एक नहर तयार करून त्याच्या कांठीं एक शिलालेख स्थापन केला. पंडित भगवानलाल व डॉ. बुल्लर यांनीं असें लिहिलें आहे कीं, अंशुवर्म्याचे कारकीर्दींत विक्रमादित्य नेपाळांत गेला होता, ही गोष्ट अगदीं खोटी आहे. असें संभवतें कीं, हर्षदेवाच्या विजयोत्सवकालीं त्याचा संवत् नेपाळी लोकांनीं ग्रहण केला असावा, व ह्मणूनच तो प्राचीन शिलालेखांत कोठें कोठें दिलेला आढळतो. आतां येथें असा प्रश्न उद्भवतो कीं, सार्वभौम हर्षदेव नेपाळांत गेला होता कीं काय ? व तेथें त्यानें आपला संवत् चालू केला कीं काय ? वास्तविक पाहतां या बाबतींत एकही ऐतिहासिक प्रमाण सांपडत नाहीं. बाणभट्टविरचित हर्षचरित, चिनी प्रवासी हुएन श्यांग याचा प्रवासवृत्तांत, व राजा हर्षवर्धन याचे शिलालेख यांपैकीं एकाही ग्रंथांत किंवा शिलालेखांत हर्षदेव नेपाळांत गेला होता व तेथें त्यानें आपला संवत् सुरू केला असें लिहिलेलें नाहीं. यावरून ही केवळ दंतकथा असावी असें मानणें भाग आहे. हुएन एश्यांक हा इ. सन ६३७ ता. ५ फेब्रुआरी रोजीं नेपाळांत गेला होता; त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, अंशुवर्मा या नांवाचा नेपाळांत एक राजा होऊन गेला. तो स्वतः विद्वान् व विद्वानांचा मोठा पुरस्कर्ता होता; त्यानें शब्दविद्येसंबंधानें कांहीं पुस्तकें लिहिलीं आहेत. या राजाची कीर्ति नेपाळांत सर्वत्र ऐकूं येते. यावरून वरील लेखकांनीं असें ठरविलें आहे कीं, हा चिनी प्रवासी नेपाळांत मुळींच गेला नव्हता. तो व्रजदेशाच्या राजधानीपर्यंत गेला होता व तेथील लोकांनीं जी कांहीं माहिती त्यास दिली ती त्यानें लिहून ठेविली ! कारण

या वेळीं अंशुवर्मा राजा विद्यमान होता. या पंडितांचे
दिसतें, कां कीं, ज्या अंशुवर्मा राजाची कीर्ति सर्व नेपाळ
त्याच्या मृत्युकालासंबंधानें गैरसमज होणें संभवनीय दिसत नाही. चिनी प्रवाशानें अंशुवर्माकृत ग्रंथांसंबंधानेंही माहिती दिलेली आहे व यावरून त्याचा लेख अविश्वसनीय मानणें प्रशस्त होणार नाहीं.

सार्वभौम गुप्त घराण्याशीं नेपाळच्या लिच्छविराज घराण्याचा संबंध होता. डॉ. फ्लिट यांनीं असें प्रसिद्ध केलें आहे कीं गुप्तराजांचा जो संवत् तो वास्तविक पाहतां लिच्छवि संवतच होता. पहिल्या गुप्तराजानें हा संवत् आपल्या राज्यांत सुरू केला. तथापि हें केवळ अनुमान आहे, प्रामाणिक गोष्ट नव्हे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. भरतखंडांत विक्रमादित्य हें नांव धारण करणारे पुष्कळ राजे होऊन गेले, त्यांपैकीं जो राजा नेपाळांत गेला त्यानें आपलें सार्वभौमत्व प्रसिद्ध करण्यासाठीं आपला संवत् (गुप्त संवत्) सुरू केला. या राजाचें नांव चंद्रगुप्त विक्रमादित्य; त्यानें नेपाळच्या लिच्छविराज राजाची कन्या कुमारदेवी हिचें पाणिग्रहण केलें. या संबंधानें आपला सन्मान अधिक वाढला असें गुप्तराजास वाटून त्यानें आपल्या नांवाच्या नाण्यावर ' लिच्छवय ' या शब्दाचा गौरवानें उपयोग केला. कुमारदेवीपासून चंद्रगुप्त राजाला समुद्रगुप्त या नांवाचा मुलगा झाला. या समुद्रगुप्तानें आपल्या बाहुबलानें नेपाळांतील सर्व सामंत जिंकिले होते, असें अलाहाबाद येथें सांपडलेल्या (हा शिलालेख समुद्रगुप्तानेंच खोदविला होता) एका शिलालेखावरून समजतें. तथापि नेपाळच्या लिच्छवि राजानीं गुप्तराजांचा कोणत्या वेळीं पराजय केला याचा कोठेंही उल्लेख केलेला आढळत नाहीं. चंद्रगुप्त विक्रमादित्याचा सासरा वृषदेव हा ज्या वेळीं नेपाळांत राज्य करित होता, त्या वेळीं चंद्रगुप्त हा नेपाळांत गेला व कुमारदेवीचें पाणिग्रहण करून तेथें त्यानें आपला संवत् चालू केला. पहिल्या सार्वभौम चंद्रगुप्तानें इ. सन ३१९ पासून ३४७ पर्यंत राज्य केलें. अर्थात् या २८ वर्षांपैकीं कोणत्या तरी एका वर्षी तो नेपाळांत गेला असावा. लिच्छविवंशीय राजा मानदेव याच्या एका शिलालेखावरून असें समजतें कीं, तो इ. स. ४६४ त राज्य करित होत

...ाकटा भाऊ होय. एका शतकांत तीन पिढ्या होतात असें ... आले कीं गुप्तराजा नेपाळांत गेला, त्यावेळीं ही वृषदेव हा नेपाळच्या सिंहासना... आरूढ असला पाहिजे हें उघड होतें. व यावरून "पार्वतीयवंशावली" च्या कर्त्यांनीं 'वृषदेवा' च्या जागीं 'विश्वदेव' हा पाठ चुकीनें दिला असावा असें स्पष्ट ह्मणावें लागतें! वृषदेवानंतर इ० सन ३५४ मध्यें महासामंत अंशुवर्मा हा उदयास आला. हा आपणास महाराजाधिराज असें ह्मणवीत असे, व शौर्य व चातुर्य या गुणांनींही तो परिपूर्ण होता, तथापि लिच्छवि राजांचा तिरस्कार करून त्यांचें राज्य हरण करण्याची महत्त्वाकांक्षा त्यानें कधींही धारण केली नाहीं. त्यानें स्वतः स्थापिलेले जे शिलालेख उपलब्ध झाले आहेत त्यांत त्यानें आपल्या मागें राजा हें पद धारण केलेलें नाहीं. महासामंत या पदवीवरच तो संतुष्ट होता. लिच्छविराजवंशीय पहिल्या शिवदेवाच्या शिलालेखावरून असें समजतें कीं, लिच्छविराजानें या महासामंत अंशुवर्म्याच्या पराक्रमावरच आपल्या राज्यलक्ष्मीचें रक्षण केलें. पूर्वींचे व हल्लींचे मांडलिक राजे आपआपल्या राज्यांत आपणांस राजा ह्मणवितात व त्याप्रमाणेंच महासामंत अंशुवर्माही आपल्या राज्यांत आपणास राजाधिराज ह्मणवीत असेल. त्याच्या ऐश्वर्यकालीं लिच्छवि कुलांतील ध्रुवदेव राजा राज्य करीत होता व सार्वभौम समुद्रगुप्तानें सर्व भरतखंड स्वाधिकृत केलें होतें. ध्रुवदेव इ. सन ३६७–६८ त सिंहासनारूढ होता, परंतु त्यानें किती वर्षें राज्य केलें हें समजण्यास मार्ग नाहीं. याच्या वेळीं जिष्णुगुप्तानें खोदविलेल्या शिलालेखावरून कित्येक शोधक असा तर्क करितात कीं, इ. सन ३६७ च्या पूर्वींच महासामंत अंशुवर्मा मृत्यु पावला होता; परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं आहे, कारण बेंडल साहेबांनीं प्रसिद्ध केलेल्या लिच्छविराज शिवदेवाच्या शिलालेखांत असें लिहिलें आहे कीं, इ. सन ३८४ या वर्षीं अंशुवर्मा हयात होता. महासामंत अंशुवर्मा हा, ध्रुवदेव आणि शिवदेव या दोन्ही राजांच्या कारकीर्दींत विद्यमान होता; त्याच्या प्रयत्नानें नेपाळची बरीच उन्नती झाली. या वेळीं लिच्छविराजे बौद्ध व सनातन या दोन्ही धर्मांच्या लोकांस समदृष्टीनें वागवित असत. अंशुवर्म्याच्या

एका शिलालेखावरून असें दिसतें कीं त्याची हिंदुधर्मावर
तितकीच बौद्ध धर्मावरही होती.

ध्रुवदेव व शिवदेव यांच्या मागून मानदेवाच्या नांवाचा उल्लेख केलेला आढळतो. हा मानदेव लिच्छविवंशीय असून, शिवदेवाचा मुलगा धर्मदेव हा त्याचा बाप होता. या मानदेवानें शके ३८६ पासून ४१३ (इ. स. ४६४ ते ४८१) पर्यंत राज्य केलें. हा मोठा मातृभक्त असून, त्या वेळच्या महावीरांत त्याची गणना होत असे. याच्या कारकीर्दींत, महासामंत अंशुवर्मा याच्या घराण्यांतील ठाकुरांनीं लिच्छवि राजांपासून आपलें स्वातंत्र्य मिळविण्याची खटपट केली होती. या मानदेवाच्या राज्यकालीं **जयवर्मा** नामक एका पुरुषानें सध्यांच्या पशुपतिनाथमंदिरांत 'जयेश्वर' नामक शिवलिंगाची स्थापना केली होती, परंतु सांप्रत हें शिवलिंग अस्तित्वांत नसून, त्याच्या जागीं **शंकरदेव** नामक एका लिच्छविराजानें स्थापन केलेला १४ हात उंचीचा त्रिशूल आहे.

मानदेवानंतर त्याचा पुत्र **महीदेव** सिंहासनावर बसला. याच्या कारकीर्दीचा इतिहास मुळींच उपलब्ध नाहीं. याच्या मागून **वसंतदेव** सिंहासनारूढ झाला. याच्या कारकीर्दींतील इ. स. ५१३ या वर्षीं खोदविलेला एक शिलालेख सांपडला आहे. दुसऱ्या जयदेवाच्या शिलालेखांत या वसंतदेवासंबंधानें असें लिहिलें आहे कीं, तो मोठा वीर होता व त्याच्या पराक्रमास भिऊन सर्व सामंत त्यास अगदीं नमून असत. नेपाळांतील प्रसिद्ध देवता **श्री अवलोकितेश्वर ऊर्फ मत्स्येंद्रनाथ**, याची उपासना याच वेळीं सुरू झाली. पार्वतीयवंशावलींत यासंबंधानें असें लिहिलें आहे कीं, कलियुग वर्ष ३६२३ या वर्षीं श्रीअवलोकितेश्वराची नेपाळांत स्थापना झाली, व त्यावेळेपासून हीच देवता नेपाळांतील प्रधान देवता समजली जाते.

वसंतदेव मृत्यु पावल्यावर त्याचा पुत्र **उदयदेव** हा नेपाळचा राजा झाला. या राजासंबंधानें डॉ. फ्लीट साहेबाचें असें मत आहे कीं, तो लिच्छविवंशीय नसून ठाकुरवंशीय अर्थात् महासामंत अंशुवर्मा याच्या वंशजांपैकीं होता. दुसऱ्या जयदेवाच्या शिलालेखांत उदयदेवाच्या पूर्वीच्या ज्या राजांची वंशवाली

[illegible] लिच्छविवंशीय होते, परंतु डॉ० फ्लीट यांच्या मतें, [illegible] आले [illegible]ढील सर्व राजे ठाकुरवंशीय होते. तथापि मूळ शिलालेखांत असें नमूद केलेलें आहे कीं, उदयदेव हा लिच्छविवंशीय वसंतदेवाचा पुत्र होता. उदयदेवाच्या मागून कोणता राजा सिंहासनावर बसला, हें या शिलालेखापासून समजत नाहीं. परंतु पुढें नरेंद्रदेव नामक राजाचा उल्लेख आढळतो. हा राजा महापराक्रमी होता. याच्या कारकीर्दींत चिनी संन्यासी हुयेनशांग हा नेपाळांत गेला होता; त्यानें असें लिहिलें आहे, ' पुष्कळ पर्वत व दऱ्या ओलांडून मी नेपाळांत आलों. हा देश असंख्य पर्वतराजींनीं व्यापिलेला आहे. ' याप्रकारें प्रदेशवर्णन दिल्यावर वरील प्रवासी लिहितो, या देशांत आस्तिक (हिंदु) व नास्तिक (बौद्ध) या दोन्ही धर्मांचे लोक सख्यत्वानें राहतात. हिंदु देवतांच्या मंदिरांनजीकच्या मठांत राहणाऱ्या बौद्ध भिक्षूंची संख्या २००० आहे. राजा क्षत्रिय लिच्छविवंशांतील आहे. तो विद्वान्, सदाचरणी व उदार असून, त्याची बौद्धधर्मावर फार श्रद्धा आहे.

वरील उताऱ्यांतील राजा हा नरेंद्रदेवच असावा, असें वाटतें. या राजासंबंधानें नेपाळी बौद्ध लोकांकडून अद्याप अनेक आख्यायिका सांगण्यांत येतात. दुसऱ्या जयदेवाच्या शिलालेखावरून असें समजतें कीं, नरेंद्रदेवाच्या पूर्वींच लिच्छविवंशानें बौद्धधर्माचा स्वीकार केला होता. नरेंद्रदेवाच्या मागून त्याचा मुलगा दुसरा शिवदेव हा सिंहासनाधिष्ठित झाला. मगधराज आदित्यसेन याची कन्या वत्सदेवी व मोखरीराज भोगवर्मा याची कन्या वत्सदेवी अशा याच्या दोन स्त्रिया होत्या. याच्या वेळचे जे शिलालेख उपलब्ध झाले आहेत, त्यांत १४३, १४५ व १४९ हीं संवत् वर्षे दिलेलीं आहेत. यावरून असें अनुमान निघतें कीं, हा राजा इ० स० ६६५ ते ६७१ याच्या दरम्यान विद्यमान होता. याच्या पश्चात् त्याचा मुलगा परचक्रकाम हा गादीवर बसला. याच्या वेळचा जो शिलालेख उपलब्ध झाला आहे, त्यावरून असें समजतें कीं, गौड, आंध्र, कलिंग व कोशल या देशांचा अधिपति हर्षदेव याची कन्या राज्यमती, हिशीं परचक्रकाम याचा विवाह

झाला होता. या राजानंतरचा सुमारें २५० वर्षां[illegible]
अंधकारमय आहे.

या बाबतींत मि० वेन्डल यानीं मोठ्या परिश्रमानें बरीच माहिती संपादन केली आहे. तीवरून असें समजतें कीं, इ. स. १००८ पासून १४५७ पर्यंत निरनिराळ्या ३५ राजांनीं नेपाळांत राज्य केलें. या राजांपैकीं शेवटचा राजा यक्षमल्ल याच्यामागें नेपाळच्या राज्याचे दोन भाग झाले. त्यांपैकीं एका भागाची राजधानी ' भातगांव ' येथें व दुसऱ्याची " काटमांडू " येथें होती. या दोन्ही राजकुलांची वंशावळ पुढें परिशिष्टांत दिली आहे.

यापुढें नेपाळचें राज्य गुरखे लोकांच्या हातीं गेलें. इ. सनाच्या अकराव्या शतकांत मुसलमान लोक हिंदुस्थानावर स्वाऱ्या करूं लागले, त्यावेळीं या देशाचा पश्चिमोत्तर भाग अनेक लहान मोठ्या राज्यांनीं व्यापिलेला होता व हे राजे वरचेवर एकमेकांशीं लढाया करीत असल्यामुळें शेवटीं ते अगदीं दुर्बळ झाले होते. अशा वेळीं आपसांतील द्वेषाचा सूड उगविण्याकरितां ते परकीय लोकांचें साहाय्य घेऊं लागले. यामुळें झालें काय कीं मुसलमान लोकांचा या देशांत चांगला पाय शिरला व पहिल्यानें येथें ते ज्या मित्रभावानें आले, तो मित्रभाव येथील राजांचा कमकुवतपणा त्यांच्या दृष्टीस पडतांच नाहींसा होऊन त्यांस येथें आपलें राज्य स्थापन करण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली ! ह्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेस नेपाळदेशही एकवेळ बळी पडला होता.

इ. स. १३२२ त अयोध्येचा सूर्यवंशी राजा हरिसिंहदेव, याजवर दिल्लीच्या बादशाहानें स्वारी केली त्यावेळीं तो आपल्या सैन्यासहवर्तमान मिथिला देशाच्या राजधानीकडे पळून गेला. इ. स. १३२४ त दिल्लीच्या तघलख बादशहानें हरिसिंहदेव राजा ज्या सिमराओ गडाचा आश्रय करून राहिला होता, त्यास वेढा दिला. राजानें बरेच दिवस गड लढविला, परंतु मुसलमानांपुढें त्याच्यानें शेवटीं टिकाव न धरवल्यामुळें तो नेपाळांत जाऊन बसला. त्यावेळीं वर्म वंशाचे राजे नेपाळांत राज्य करीत होते. या राजांचे अंगीं पूर्वींप्रमाणें पराक्रम वसत नाहीं, असें जेव्हां हरिसिंहदेव यानें पाहिलें,

... राजांचा पराभव करून नेपाळचें राज्य काबीज केलें. या ... शी दंतकथा प्रचारांत आहे कीं, हरिसिंहदेवाच्या राज्यावर यवनांनीं स्वारी केली, त्यावेळीं भवानीनें हरिसिंहदेवास यवनांनीं भ्रष्ट केलेलें आपलें राज्य सोडून नेपाळांत जाऊन राहण्याची आज्ञा दिली. हें वर्तमान नेपाळची तत्कालीन राजधानी भातगांव येथील राजानें ऐकतांच त्यानें आपलें राज्य हरिसिंहदेवाच्या स्वाधीन केलें. अशा प्रकारें नेपाळचें राज्य संपादन केल्यावर हरिसिंहदेवानें पहिल्यानें तुळजादेवीचें एक मोठें मंदिर बांधविलें. या मंदिरास मूलचौक असें ह्मणतात. या तुळजादेवीचें माहात्म्य श्रवण करून भोटिया जातीच्या लोकांनीं तिची मूर्ति चोरून नेण्यासाठीं भाटगावावर चाल केली. परंतु ते तेथें जाऊन पाहतात तों सगळ्या गांवास प्रज्वलित अग्नीचा वेढा पडलेला आहे असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें! ही देवीची अद्भुत शक्ति अवलोकन करून ते भोटिये लोक आश्चर्यचकित होत्साते आपल्या गांवीं निघून गेले.

इ०स० १३३७त दिल्लीचा बादशाहा महमद तघलख यानें मलिक खुशरू यास दहालक्ष घोडेस्वार बरोबर घेऊन चीन देशावर स्वारी करण्याचा हुकूम दिला. हें सैन्य नेपाळांतूनच चिनांत गेलें होतें. या वेळीं या सैन्यांतील लोकांच्या अत्याचारामुळें नेपाळी लोकांस पुष्कळ त्रास सहन करावा लागला. मुसलमानी सैन्य मोठ्या कष्टानें त्या पहाडी प्रदेशांतून चीन देशाच्या सरहद्दीवर जाऊन पोहोंचलें; तेथें चिनी सैन्याशीं त्याची गांठ पडून, मोठें घनघोर युद्ध झालें. परंतु तेथील थंड हवा मुसलमानी शिपायांस प्रतिकूल होऊन, त्यांचे फार हाल झाले व त्यामुळें बरेच शिपाई मरण पावले. कांहीं शिपाई लढाईंतून पळाले, ते मात्र कसे तरी जीव मुठींत धरून एकदांचे दिल्लीस येऊन पोहोंचले. परंतु ते पराभव पावून आले आहेत, ही हकीकत जेव्हां बादशहाच्या कानीं गेली, तेव्हां त्यानें त्या सर्वांची कत्तल केली ! !

राजा हरिसिंहदेव यानें २८ वर्षें राज्य केलें. त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र मोतिसिंह यानें १५ वर्षें व त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र शक्तिसिंह यानें २२ वर्षें राज्य केलें. शक्तिसिंहाची व चीनच्या बादशहाची चांगली मैत्री

होती. यानें 'वणिकपुर' नामक गांवानजीक एक शहर [illegible]
राजधानी केली व तेथून चिनी राजसभेस पुष्कळ नजरा[illegible]
चीनच्या बादशहानेंही चिनी संवत् ५३५ या वर्षीं शक्तिसिंहास [illegible] प्रश[illegible]
पत्र पाठविलें. शक्तिसिंह मरण पावल्यावर त्याचा पुत्र श्यामसिंह हा सिंहासनारूढ झाला, यानें १५ वर्षें राज्य केलें. यास पुत्रसंतती नव्हती, त्यामुळें त्यानें आपल्या जांवयास व मुलीस आपलें राज्य दिलें. राजा नान्यदेव यानें जेव्हां नेपाळावर स्वारी केली होती, तेव्हां तेथील मल्लवंशीय राजा तिरहूत प्रांतांत पळून गेला होता. श्यामसिंह राजानें आपली कन्या याच मल्लवंशांत दिली होती, व त्यामुळें श्यामसिंहाच्या पश्चात् नेपाळचें राज्य त्या वंशाकडे गेलें. नेपाळी संवत् ५२८ या वर्षीं नेपाळांत एक मोठा भूकंप झाला व त्यामुळें मत्स्येंद्रनाथाचें मंदिर व इतर बरींच मंदिरें जमीनदोस्त झालीं.

हरिसिंहदेव वंशाचा नष्टांश झाल्यावर नेपाळचें राज्य मल्लराज जयभद्रमल्ल याजकडे गेलें, व तें त्यानें १५ वर्षे चालविलें. त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र नागमल्ल हा सिंहासनारूढ झाला. यानें १५ वर्षें राज्य केलें व पुढें आपला पुत्र जगत्मल्ल यास गादीवर बसविलें. जगत्मल्लानेंही १५ वर्षें राज्य करून, पुढें प्रजापालनाचें काम आपला मुलगा नरेंद्रमल्ल याजकडे सोंपविलें. त्यानें १० वर्षें राज्य केलें. पुढें त्याचा मुलगा उग्रमल्ल हा तक्तनशीन झाला व त्यानें १५ वर्षें राज्य केलें.त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र अशोक हा मोठा पराक्रमी राजा झाला. त्यानें विष्णुमती, बाघमती व रुद्रमती या नद्यांच्या मध्यप्रदेशीं श्वेतकाली व रक्तकाली या देवतांची स्थापना केली व तीं स्थळें हल्लीं उत्तरकाशी व काशीपुर या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. राजा अशोकमल्लानें आपल्या बाहुबलानें नेपाळांतील सर्व ठाकुर सरदारांस पराजित करून, त्यांची राजधानी जें पाटण शहर तें हस्तगत केलें. अशोकमल्लाच्या पश्चात् त्याचा पुत्र जयस्थितिमल्ल हा गादीवर बसला. त्यानें तत्कालीन राजनीतीचें उत्तम प्रकारें संशोधन करून, कित्येक नवे कायदे केले. समाजशासन व जातिनिर्बंध हीं याच्याच कारकीर्दींत अस्तित्वांत आलीं. ही जी नेपाळांत त्यानें सुधारणा केली, त्यामुळें तो प्रजेस फार प्रिय झाला होता.

... वाघमती नदीच्या कांठीं, श्रीरामचंद्र व लवांकुश ... स्थापन केल्या. ललितपट्टण येथील कुम्भेश्वराचें मंदिर व ...तरीं ... देवालयें त्यानें बांधविलीं. त्यानें ४३ वर्षें राज्य केल्यावर त्याचा पुत्र जयमल्ल हा सिंहासनारूढ झाला. त्यानें शंकराचार्यांच्या वेदांत मताचा नेपाळांत प्रसार केला, व दक्षिणेंतून दक्षिणी ब्राह्मण आणवून, पशुपतिनाथाच्या पूजेचें काम त्यांजकडे सोंपविलें. याच वेळेपासून भरतखंडांतील हिंदुधर्मावलंबी ब्राह्मणांचें लक्ष यथार्थ सनातनधर्मीय मतांकडे वळत चाललें व सर्वत्र पौराणिक देवतांची उपासना सुरू झाली. याच राजाच्या कारकीर्दींत धर्मराज मीननाथाच्या मंदिराची स्थापना झाली. या मंदिरांत समंतभद्र बोधिसत्व, पद्मपाणी बोधिसत्व, अन्यान्य बोधिसत्व व दुसऱ्या अनेक बौद्ध देवतांच्या मूर्ति संस्थापन केलेल्या आहेत. नेपाळी संवत् ५०३ या वर्षी या मंदिरांच्या संरक्षणार्थ एक किल्ला बांधण्यांत आला. राजा जयमल्ल हा मोठा पराक्रमी होता. जयमल्लाचें दुसरें नांव यक्षमल्ल असें होतें. त्यास तीन पुत्र व एक कन्या अशीं अपत्यें होतीं; त्यांपैकीं वडील पुत्रास भाटगांवचें, दुसरा पुत्र रणमल्ल यास बनेपाचें तिसरा पुत्र रत्नमल्ल यास काटमांडूंचें व कन्येस पाटणचें अशीं राज्यें जयमल्लानें दिलीं होतीं, परंतु हीं भावंडें आपसांत भांडूं लागल्यामुळें तीं अगदीं बलहीन झालीं. होतीं पुढें औरस संततीच्या अभावीं बनेपा व पाटण हीं राज्यें अनुक्रमें भाटगांव व काटमांडू येथील राज्यांस ओढण्यांत आलीं गुरखे लोकांच्या हातीं नेपाळची राजसत्ता गेली, त्या कालापूर्वीचा जो विश्वासनीय इतिहास सांपडतो, तो या भाटगांव आणि काटमांडू येथील राजघराण्यांचा इतिहास होय, नेपाळी संवत् ५९२ यावर्षीं भाटगांव येथील राजा मृत्यु पावला व त्याचा पुत्र रायमल्ल हा तेथील सिंहासनावर बसला. यावेळीं भाटगांवचें राज्य पूर्वेस दूधकोशी नदीपर्यंत पसरलें होतें. रायमल्लाच्या पश्चात् त्याचा पुत्र प्राणमल्ल व प्राणमल्लाचा पुत्र विश्वमल्ल यांनीं राज्य केलें. विश्वमल्लानें पुष्कळ मंदिरें व मठ स्थापन केले. विश्वमल्लाच्या पश्चात् त्याचा पुत्र त्रैलोक्यमल्ल व त्रैलोक्यमल्लाचा पुत्र जगज्ज्योतिर्मल्ल यांनीं राज्य केलें. जगज्ज्योतिर्मल्लानें भाटगांव येथील आदिभैरवाचा रथयात्रो-

त्सव सुरू केला. त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र नरेंद्र... मल्ल यांनीं भाटगांवचें राज्य केलें. जगत्प्रकाशमल्लानें ने... वर्षी नेपाळांत अनेक किर्तिस्तंभ स्थापन केले.याच वर्षी ... दारसिंहभारो व वासिंहभारो या दोन सद्गृहस्थांनी भीमसेनाचें एक मंदिर बांधिलें. नेपाळी संवत् ७८२ यावर्षी विमलास्नेहमंडप व ७८७ यावर्षी गरुडध्वज या नांवाचे दोन कीर्तिस्तंभ जगत्प्रकाशमल्ल यानें स्थापन केले. त्याचा मुलगा राजा जितामित्र यानें ने० सं. ८०२ यावर्षी एक धर्मशाळा व नारायणमंदिर व ने० सं. ८०३ यावर्षी दत्तात्रयाचें मंदिर अशा इमारती बांधविल्या. त्याचा पुत्र राजा भूपतींद्रमल्ल यानें एक मोठा राजवाडा व देवदेवींचीं अनेक मंदिरें बांधविलीं. यानें ने. सं. ८३८ यावर्षी भैरवदेवाच्या मंदिरास सोन्याचें छत लाविलें राजा भूपतींद्रमल्ल मृत्यु पावल्यावर त्याचा पुत्र रणजितमल्ल यानें अनेक पराक्रम करून आपली कीर्ति वाढविली. ने. सं. ८५७ यावर्षी रणजितमल्लानें अन्नपूर्णा देवीच्या मंदिरास एक फार मोठी घंटा अर्पण केली. याच्याच कारकीर्दींत भाटगांव ललितपट्टण व कांतिपुर येथील राजघराण्यांत वैमनस्य उत्पन्न झालें. गुरखा राजा नरभूपाल यानें नेपाळी राजांचें दुर्बलत्व पाहून त्यांजवर चढाई केली. परंतु तो त्रिशूलगंगा उतरून नेपाळांत जातांच तेथें त्याची व नवकोट शैवराज या नेपाळी योद्ध्याची गांठ पडून मोठें तुमुल युद्ध झालें व गुरखा राजा नरभूपाल यास पराजित होऊन मागें फिरावें लागलें. रणजितमल्ल गादीवर असतां नरभूपालाचा पुत्र राजा पृथ्वीनारायण हा नेपाळ देशांत गेला होता, त्यावेळीं त्याची नम्रता व इतर प्रशंसनीय आचारविचार पाहून रणजितमल्ल फार खूष झाला व त्यानें त्याची व आपल्या मुलाची मैत्री करून दिली. पुढें दुर्दैवानें हा रणजितमल्लाचा पुत्र अकालीं मरण पावला व अशाप्रकारें सूर्यवंशीय नेपाळी राजांचा नष्टांश झाला.

राजा यक्षमल्ल यानें आपला दुसरा पुत्र रणमल्ल यास वणिकपूर (बनेपा) व दुसऱ्या सात गांवांचें स्वामित्व दिलें होतें. हें राज्य पूर्वेस दुधकोशीपर्यंत, पश्चिमेस संगानामक गांवांपर्यंत, उत्तरेस संगाचौकपर्यंत व

... ...क ...ाका प्रदेशापर्यंत पसरलें होते. या राजघराण्यांतील ... ...य ... स्था ६२२ यावर्षी पशुपतिनाथास एक बहुमूल्य कवच ...त्तरों ...क ...ु... ...दवालयें त्अलंकार अर्पण केले व कांतिपूर येथील राजास एक ...ब...ल्यवान् शाल ...नजास केली. कांतिपूर येथील राजवाड्यांत ही शाल अद्याप राखून ठेविलेली आढळते.

राजा यक्षमल्लाचा तिसरा मुलगा राजा रत्न उर्फ रतनमल्ल यास काटमांडू येथील राज्य देण्यांत आलें होतें. पूर्वेस वाघमती, पश्चिमेस नागगंगा, उत्तरेस गोसाईस्थान, व दक्षिणेस पाटण राज्याची उत्तर सीमा, येणेंप्रमाणें या राज्याच्या चतुःसीमा होत्या. राजा यक्षमल्लाच्या मरणोत्तर रत्नमल्ल यानें तुळजादेवीची बीजमंत्रानें आराधना केली व त्यामुळें ती देवी त्यास सदा प्रसन्न असे असें सांगतात. तथापि आपल्या इतर बंधूंशीं तो मोकळ्या मनानें वागता असे. एके दिवशीं राजा रत्नमल्ल यास नीलतारा देवीनें स्वप्नांत असें सांगितलें कीं, तूं जर कान्तिपुर येथें जाशील तर तेथील ठाकुर लोकांचे धर्मगुरु तुला निश्चयपूर्वक आपला राजा करितील. दुसरे दिवशीं सकाळीं देवीस प्रणाम करून,राजा रत्नमल्ल कान्तिपुर येथें गेला व तेथील धर्मगुरूंची त्यानें भेट घेतली. त्यांनींही कान्तिपुरचें राज्य त्याला देण्याचें अभिवचन दिलें, इतकेंच नव्हे तर, हें अभिवचन पुरें करण्यासाठीं तेथील मुख्य १२ ठाकुर सरदारांस जेवणाच्या निमित्तानें आपल्या घरीं आणून, त्यांस विषप्रयोग करून,त्यांनीं ठार मारिलें. पुढें रत्नमल्ल हा कान्तिपूर येथील सिंहासनावर बसला व प्रथमतः त्यानें या स्वजनद्रोही धर्मगुरूंस ठार मारिलें ! ने० सं० ६११ या वर्षी राजा रत्नमल्लानें नवकोट येथील ठाकुर लोकांस पराजित करून, त्यांस आपलें मांडलिक केलें. पुढें नवकोट येथील अनेक फलपुष्पें व इतर वस्तु यांहीं पशुपतिनाथाची त्यानें पूजा केली. याच्या कारकीर्दीत कुलु नामक भोटिया जातीनें चालू राजसत्तेविरुद्ध बंड केलें व तें मोडून टाकण्याचें राजा रत्नमल्ल याचे अंगीं सामर्थ्य नव्हतें. अशा स्थितींत देवधर्मा नामक गांवांतील चार तिरहुती ब्राह्मणांनीं पाल्पा येथील सेन राजाचें सैन्य आणून राजा रत्नमल्ल यास साहाय्य केलें व भोटिया लोकांचा पराभव करून त्यांस

हांकून लाविलें. राजा रत्नमल्लानें त्या ब्राह्मणांस कांही
बक्षीस देऊन त्यांचे उपकार फेडिले. त्यानें ललितपट्टण
राजांच्या ताब्यांत असलेली शेरवागटी पर्वतावरील ... नामक प्र-
शांतील तांब्याची खाण आपल्या ताब्यांत घेतली व जुनें '[1]सुकिया' नामक
नाणें बंद करून त्या ऐवजीं तांब्याचा पैसा चालू केला.

रत्नमल्लाचा काळ झाल्यावर त्याचा पुत्र अमरमल्ल हा काटमांडू येथील सिंहासनावर बसला. याच्या राज्यकालीं वणिकपूर येथील कुंभार लोकांनीं पशुपतिनाथाच्या मंदिरांत 'अनन्त नारायणाची' मूर्ति स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु तसें करण्यास त्यांस राजाज्ञा न मिळाल्या कारणानें त्यांनीं एका रात्रींत वाछला देवीच्या मंदिराशेजारीं एक नवें मंदिर बांधिलें, व त्यांत नारायणाची मूर्ति स्थापन केली. राजा अमरमल्ल यानें अभयराज नामक एका गृहस्थास आपल्या जमाबंदीखात्यावरील मुख्य प्रधान नेमिलें होतें. या अभयराजानें स्वतःच्या द्रव्यानें नेपाळांत पुष्कळ इमारती बांधविल्या. राजा अमरमल्ल फार पराक्रमी होता. त्यानें ४७ वर्षे राज्य केलें; त्यानंतर त्याचा पुत्र सूर्यमल्ल हा राजा झाला. त्यानें पहिल्यानें भाटगांव येथील राजाकडून चाङ्ग नारायण व शंखपुर हे दोन गांव जिंकून घेतले. पुढें शंखपुर येथील वज्रयोगिनी देवीची त्यानें सात वर्षे उपासना केली. सूर्यमल्लाच्या पश्चात् त्याचा पुत्र नरेंद्रमल्ल हा काटमांडूच्या सिंहासनावर बसला. यानें राजवाड्याच्या पार्श्वभागीं महीन्द्रेश्वरी व पशुपतिनाथ यांचीं मंदिरें बांधविलीं व मोगलांची राजधानी दिल्ली येथें जाऊन, तेथील बादशाहास हंस व इतर कितीएक सुंदर पक्षी त्यानें नजर केले. पुढें बादशहा आपल्यावर प्रसन्न आहे असें पाहून, आपल्या नांवाचें नाणें पाडण्याची त्यानें परवानगी मागितली व बादशहानें त्यास रुप्याचें नाणें पाडण्याची परवानगी दिली. नरेंद्रमल्लास महीन्द्रमल्ल असेंही ह्मणत असत. दिल्लीहून नेपाळांत आल्यावर महीन्द्रमल्लानें मोहोर नामक रुप्याचें नाणें आपल्या राज्यांत चालू केलें. नेपाळांतील अगदीं पहिलें रुप्याचें नाणें हेंच होय. यावेळीं

१ सुकिया ऊर्फ सुकी हें नेपाळांतील प्राचीन नाणें; त्याची चालू किंमत दोन आणे आहे.

... णों सुरू होतीं, त्यांजवर बैल, सिंह, हत्ती ... चित्रें कोरलेलीं असत. या राजाच्या कारकीर्दींत कान्तिपुर ... देवालयें फार वाढली. ने. सं. ६६९ या वर्षीं माघ महिन्यांत त्यानें कान्तिपुर येथें तुलजाभवानीचें एक प्रचंड देवालय बांधविलें. राजा महीन्द्रमल्ल यास सदाशिवमल्ल व शिवसिंहमल्ल असे दोन पुत्र होते. त्यांची आई ठाकुर वंशांतील होती.

बापाच्या मृत्यूनंतर सदाशिवमल्लानें नेपाळचीं राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं, परंतु तो अत्यंत स्त्रीलपंट व स्वेच्छाचारी असा होता. यात्रोत्सवप्रसंगीं जी सुंदर स्त्री दृष्टीस पडेल, तिला पकडून तिच्याशीं तो रममाण होत असे. अशा प्रकारें त्यानें शेंकडो स्त्रियांच्या पातिव्रत्याचा भंग केला. राजाचे चोचले पुरवितां पुरवितां नेपाळचा खजीना अगदीं रिकामा होऊन गेला; व त्यामुळें प्रजेच्या मनांत राजाविषयीं तिरस्कार उत्पन्न झाला. एके दिवशीं राजा 'मनोहरा' नामक स्त्रीच्या घरीं जात असतां वाटेंत लोकांनीं त्यास खूप मार दिला व त्यामुळें भिऊन जाऊन तो भाटगांव येथें पळून गेला ! परंतु भक्तपुर येथील राजास त्याचे गुणानुवाद ठाऊक असल्यामुळें त्यानें आपल्या राज्यांत पाय ठेवण्याची त्यास मनाई केली व पुढें लवकरच सदाशिवमल्ल नेपाळचें राज्य सोडून चालता झाला. अशाप्रकारें नेपाळांतील सूर्यवंशीय औरस राजकुलाची परिसमाप्ति झाली.

सदाशिवमल्ल गेल्यावर त्याचा सावत्र भाऊ शिवसिंह यास प्रजेनें नेपाळच्या सिंहासनावर बसविलें. शिवसिंह हा फार चतुर होता. त्यानें महाराष्ट्रांतील कित्येक ब्राह्मण नेपाळांत आणवून त्यांस आपले गुरु केलें. याच्या कारकीर्दींत कांतिपूर येथील एक तंत्रज्ञ गृहस्थ तिबेटची राजाधनी ल्हासा येथें गेला होता. शिवसिंहास लक्ष्मीनृसिंहमल्ल व हरिहरसिंहमल्ल असे दोन पुत्र होते. त्यांपैकीं धाकटा मुलगा हरिहरसिंहमल्ल हा मोठा तेजस्वी होता व बाप हयात असतांच ललितपट्टणचें राज्य चालविण्याची आपली इच्छा त्यानें प्रदर्शित केली. त्याची आई गंगाराणी हिनें कांतिपुर व मोठें नीलकंठतीर्थ यांच्या मधील प्रदेशांत एक मोठें उपवन तयार करविलें, तें

'राणीवन' या नांवानें अद्याप प्रसिद्ध आहे. या उप... कांहीं पडका भाग इंग्रजी रेसिडेंटाच्या राहण्याच्या... दृष्टीस पडतो. जंगबहादूर यांनीं शिकारीसाठीं या ... हो... आणून सोडिले होते.

शिवसिंह हा एके दिवशीं शिकारीस गेला असतां हरिहरसिंहानें आपला वडील भाऊ लक्ष्मीश्वरसिंह याशीं तंटा करून, त्यास दरबारांतून हांकून लाविलें! पुढें नेपाळी संवत्७२४ या वर्षीं राजा शिवसिंह यानें स्वयंभूनाथमंदिराचा जीर्णोद्धार केला. शिवसिंह व राणी गंगा, हीं परलोकवासी झाल्यावर त्यांचा ज्येष्ठ पुत्र लक्ष्मीश्वरसिंह हा गादीवर बसला. याच्या कारकीर्दींत भीममल्ल नामक राजकुलांतील एका पुरुषानें भोट देशांत जाऊन, तिकडील व्यापाराचा ओघ नेपाळाकडे फिरविला व त्यामुळें भोट देशांतील सोनें चांदी वगैरे जिन्नस नेपाळांत येऊं लागले. या भिममल्लाच्या प्रयत्नानें लक्ष्मीश्वरसिंह व भोट देशाचा राजा यांचा असा तह झाला होता कीं, भोट देशांतील जो व्यापारी नेपाळांतून तिबेटांत जाऊन तेथें मरण पावेल त्याची सर्व संपत्ति नेपाळसरकारास मिळावी. याच वेळीं, 'कुटी' नामक एक प्रदेश भीममल्लाच्या साहाय्यानें नेपाळांत सामील करण्यांत आला.लक्ष्मीनृसिंहमल्लास नेपाळचा सार्वभौम राजा करावा, अशी भीममल्लाची फार इच्छा होती व त्याप्रमाणें त्यानें तिबेटांत जाऊन, लक्ष्मीश्वरसिंहाच्या उन्नतीसाठीं पुष्कळ प्रयत्न केला. तथापि कोणी दुष्ट मनुष्यानें कांतिपूरचें राज्य आपल्या हातीं यावें अशी भीममल्लाची इच्छा असल्याची खोटी गोष्ट लक्ष्मीश्वरसिंहास सांगून, त्याचें मन कलुषित केलें व भीममल्लाचें डोकें उडविण्याचा त्यानें तात्काळ हुकूम सोडिला! यावेळीं दक्षिण हिंदुस्थानांतील नित्यानंद नामक एक ब्रह्मचारी नेपाळांत गेला होता; परंतु तेथील एकाही देवमूर्तीस त्यानें नमस्कार केला नाहीं! ही गोष्ट राजाच्या कानावर जातांच, त्यास मोठा राग आला व सर्व देवमूर्तीस नमस्कार करण्याचा नित्यानंदास त्यानें हुकूम केला. नित्यानंदानें आज्ञेप्रमाणें मूर्तीपुढें आपलें मस्तक वांकवितांच चंद्रेश्वरी, धर्मशिला व कामदेव या तीन मूर्ति एकदम मोडून

...चा शिरच्छेद करण्यांत आल्यावर, त्याच्या स्त्रीनें ... त्यामुळें दिवसेंदिवस तो बुद्धिभ्रष्ट होत चालला. पुढें ... अगदींच असमर्थ झाला, त्यावेळीं त्याचा मुलगा प्रतापमल्ल हा ने०सं०७५९ यावर्षी कांतिपुर येथील सिंहासनावर बसला. पुढें ने०सं०७७७यावर्षी लक्ष्मीनृसिंहमल्ल मरण पावला. त्यानें 'इंद्रपुर' नामक एक शहर वसविलें व जगन्नाथाचें मंदिर बांधिलें. त्याचप्रमाणें ने० सं० ७७४या वर्षी माघ शुक्ल पंचमीच्या दिवशीं त्यानें एक कालिकास्तोत्र रचून तें पाषाणांवर खोदविलें व निरनिराळ्या मंदिरांत त्या पाषाणाची स्थापना केली. हें स्तोत्र निरनिराळ्या पंधरा भाषांतील मूळाक्षरांनीं खोदविलेलें आहे! लक्ष्मीनृसिंहमल्ल हा मोठा विद्वान् होता; अनेक शास्त्रें त्यास मुखोद्गत होतीं व पंधरा सोळा भाषांचें त्यास उत्तम ज्ञान होतें.

ने. सं. ७६० यावर्षी श्यामार्पलामा नामक एका भोटदेशीय गृहस्थानें नेपाळांत येऊन स्वयंभूनाथाच्या मूर्तीवर मुलामा चढविला व त्या मंदिराच्या दक्षिणेकडील शेजावर राजा लक्ष्मीनृसिंह यांचें नांव खोदविलें. राजा प्रतापमल्ल यानें आपल्या नाण्यावर कवींद्र प्रतापमल्ल असें नांव धारण केलें होतें. त्यानें पहिल्यानें दोन तिरहुती राजकन्यांशीं आपला विवाह केला होता; परंतु पुढें तारुण्याच्या भरांत आल्यावर नेपाळी पद्धतीप्रमाणें तीन हजार स्त्रियांशीं त्यानें लग्नें केलीं. एका वेळीं एका तरुणीनें त्याची कामेच्छा तृप्त केली नाहीं ह्मणून रागावून त्यानें तिला ठार मारिलें. परंतु पुढें या कृत्याचा त्यास फार पश्चात्ताप झाला व त्या पातकाच्या क्षालनासाठीं त्यानें आपलें व आपल्या कुटुंबांतील माणसांचें तुलादान केलें.

या राजाचे कारकीर्दींत लंबकर्ण नामक महाराष्ट्र ब्राह्मण व नरसिंह ठाकुर नामक तिरहुती ब्राह्मण असे दोन ब्राह्मण नेपाळांत गेले होते. त्यांस राजानें आपले गुरु केले. प्रतापमल्ल यास पार्थिवेंद्रमल्ल, नृपेंद्रमल्ल, महिपेंद्रमल्ल, व चक्रवर्तींद्रमल्ल असे चार पुत्र होते; व त्या चौघांनींही बापाच्या इच्छेप्रमाणें त्याच्या हयातींत एकेक वर्ष राज्य केलें. तिसरा पुत्र महिपतींद्रमल्ल हा राज्यारूढ असतां राजा प्रतामल्ल यानें त्याच्या साह्यार्थ, ने. सन. ७८८

यावर्षी अक्षोभ्यबुद्धमंदिरासमोर इंद्रवज्राची स्थापन
चक्रवर्तीन्द्रसिंह हा एक वर्ष राज्य करून मरण पाव
जें नाणें हल्लीं नेपाळांत सांपडतें, त्याच्यावर वाण, कमल
चामर यांचीं चिन्हें आहेत. या पुत्राच्या मृत्यूनें प्रतापमल्लाची राणी फार
शोकाकुल झाली. तिला पुत्रशोकाचा विसर पडावा या हेतूनें राजानें एक मोठी पुष्करणी तयार करविली. ती हल्लीं 'राणीपोखरा तलाव' या नांवानें प्रसिद्ध आहे. ने. सं. ८०९ या वर्षी राजा प्रतापमल्ल परलोकवासी झाला; व त्याचा पुत्र महीन्द्रमल्ल हा भूपालेंद्र नांव धारण करून कांतिपुर येथील सिंहासनावर बसला. पुढें ने. सं. ८१४ या वर्षी तो मरण पावला, व त्याचा चौदा वर्षांचा मुलगा भास्करमल्ल हा गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दीच्या आठव्या वर्षी आश्वीन मासीं दसऱ्याच्या उत्सवाचे वेळीं पाटण व भाटगांव येथील लोकांचें मोठें भांडण झालें. त्याच वर्षी नेपाळांत महामारीचा रोग उद्भवला व त्यानें ने. सं.८२२या वर्षी राजा भास्करमल्ल मरण पावला. या राजास संतति नव्हती;तो मरण पावल्यावर त्याच्या स्त्रियांनीं राजकुटुंबांतील जगज्जयमल्ल नामक एका पुरुषास गादीचा वारस ठरविलें व नंतर त्या सर्व स्त्रिया आपल्या पतीबरोबर सती गेल्या.

राजा जगज्जयमल्ल यास पांच पुत्र होते. त्यांपैकीं राजेंद्रप्रकाश व जयप्रकाश हे बापास नेपाळची गादी मिळण्यापूर्वीच जन्मले होते. राज्यप्रकाश, नरेंद्रप्रकाश व चंद्रप्रकाश हे मागाहून जन्मले. तथापि जगज्जयमल्ल हयांत असतांच, वडील पुत्र राजेंद्र व धाकटा चंद्रप्रकाश हे मरण पावले होते. या दोन पुत्रांच्या मृत्यूनें राजास आतोनात दुःख झालें. त्यावेळीं त्याची समजूत घालण्याचा लष्करी लोकांनीं फार प्रयत्न केला व राजकुमार राज्यप्रकाश यास गादीवर बसविण्याची राजास सल्ला दिली. याच वेळीं गुरखे लोकांचा राजा पृथ्वीनारायण यानें नवकोटपर्यंत आपलें राज्य वाढविलें. ही हकीकत राजा जगज्जयमल्ल यास समजली व त्या प्रांतांतील देवस्थानांस नेपाळ सरकारांतून अर्पण करण्यांत आलेली संपत्ति आपल्या शत्रूच्या हातीं गेल्याबद्दल त्यास फार वाईट वाटलें. राजा जगज्जयमल्ल, ने. सं.

...धरल्यावर, त्याचा पुत्र जयप्रकाशमल्ल हा काटमांडू ... नेत्रे बसला. पुढें लवकरच तो पाटण येथें गेला असतां ... याच्या आदरसत्कारानें तो फार खूष झाला व विष्णु-मल्लास पुत्रसंतति नसल्यामुळें आपलें राज्य जयप्रकाशमल्लास देण्याचा त्यानें निश्चय केला. जयप्रकाशमल्ल पाटण येथें असतां, कांतिपुर येथील कांहीं अधिकाऱ्यांनीं त्याचा भाऊ नरेंद्रप्रकाश यास पांच गांवांचें आधिपत्य दिलें. ही गोष्ट जयप्रकाश यास कळतांच, त्यास त्या अधिकाऱ्यांचा मोठा राग आला. त्यानें त्यांस कामावरूनं दूर करून कैदेंत टाकिलें व नरेंद्रप्रकाश याजकडून त्याचे पांच गांव काढून घेतले. पुढें, बिचारा नरेंद्रप्रकाश भाटगांव येथें जाऊन राहिला व तेथें लवकरच मरण पावला.

कैदेंत ठेविलेले अधिकारी लोक तेथून लवकरच पळाले व त्यांनीं राणी दयावती हिचा आठ महिन्यांचा मुलगा ज्योतिप्रकाश यास काटमांडू येथील गादीवर बसविलें. अधिकाऱ्यांच्या भयानें जयप्रकाशमल्ल हा ललितपाटणकडे पळून गेला. परंतु तेथील प्रधानांनीं त्यास आश्रय न दिल्यामुळें तो राणी दयावती हिचा आश्रय करण्यासाठीं गोदावरी येथें गेला. पुनः तेथून निघून, पहिल्यानें गोकर्णेश्वर व नंतर गुह्येश्वरी या मंदिरांचा त्यानें आश्रय केला. तेथें गुह्येश्वरी देवीच्या एका भक्तानें त्यास देवीचें एक खड्ग देऊन, शत्रूंशीं सामना करण्यास प्रोत्साहन दिल्यावरून, कांन्तिपुराहून जें लष्कर त्याचा शोध करित वरील मंदिराकडे येत होतें, त्याचा वाटेंत त्यानें पराभव केला; कांतिपुर येथें जाऊन तेथील बालराजा ज्योतिप्रकाश याचे दोन तुकडे केले व त्याची माता राणी दयावती हीस कैदेंत टाकिलें ! याप्रमाणें आपल्या अंतस्थ शत्रूंचा यथास्थित समाचार घेतल्यावर, राजा जयप्रकाश हा नवकोट नगरावर चालून गेला व राजा पृथ्वीनारायण याचा पराभव करून त्यास आपल्या देशांत त्यानें हांकून लाविलें. यापुढें पुनः आठ वर्षांनीं पृथ्वीनारायणानें नवकोटवर चढाई करून, तिरहूत प्रांतांतील ३२ ब्राह्मणांची जमीन हरण केली. ब्राह्मणांनीं ही हकिकत नेपाळच्या राजास कळविली, परंतु तो या वेळीं निर्बल झाला होता. तथापि, पृथ्वीनारायणास

नवकोटचें राज्य मिळवून देण्याच्या कामीं त्यास
राम थापा नामक एक मनुष्य होता, त्यास त्यानें नेप
णिलें व वरील कृत्याबद्दल खुलासा करावयास सां
आपण निर्दोष असल्याबद्दल पुष्कळ प्रमाणें देऊन राजाची खात्री करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो निष्फळ होऊन, काशीराम हा गौरीघांटावर एके दिवशीं संध्या करीत बसला असतां राजाच्या मारेकऱ्यांनीं त्याचा खून केला!

ज्या गुह्येश्वरी देवीच्या कृपाप्रसादानें जयप्रकाशास पुनः नेपाळचें राज्य प्राप्त झालें होतें, त्या देवीच्या देवळासमोर एक घांट व दुसऱ्या कित्येक इमारती त्यानें बांधविल्या व देवीच्या नित्यखर्चाकडे कांहीं जमिनीचें उत्पन्न कायमचें लावून दिलें. त्याचप्रमाणें पशुपतिनाथ मंदिराजवळीलएका देवीची कोटि लिंगांनीं पूजा करण्याचा क्रम त्यानें चालू केला, तो अद्याप चालू असून, कोटि पार्थिवपूजा या नांवानें प्रसिद्ध आहे.

यापुढें पृथ्वीनारायणानें मोठें लष्कर घेऊन, खुद्द कीर्तिपुर नगरावर चढाई केली. उभय पक्षांचें मोठें युद्ध झालें; या युद्धांत नेपाळी सरदार शक्तिवल्लभ याचें १२००० सैन्य मारलें गेलें! दोन्ही फौजांची फार खराबी झाली; तथापि शेवटीं जयप्रकाशानें पृथ्वीनारायणास आपल्या राज्याबाहेर हांकून लाविलें. पुढें तिरहुत प्रांताच्या सीमेवरील 'ठारी' लोक, तिरहुती ब्राह्मणांचा द्वेष करीत असत, ते पृथ्वीनारायण यां जाऊन मिळाले व त्यांनीं नेपाळचा कांहीं भाग त्याच्या स्वाधीन केला.

या वेळीं भाटगांव येथें रणजितमल्ल नामक राजा राज्य करीत होता, त्यानेंही गुरखे लोकांचा पराभव करण्याच्या हेतूनें आपल्या लष्करास बराच त्रास दिला. ने. सं. ८८७ यावर्षी आषाढमासीं भाटगांव येथें २४तासांत भूकंपाचे २१ धक्के बसले. पुढें आठ महिन्यांनीं ने. सं. ८८८ या वर्षी पृथ्वीनारायण यानें कांतिपुरावर पुनः चाल केली. त्या दिवशीं इंद्रयात्रेचा उत्सव चालू होता व सर्व नेपाळी लोक व शिपाई दारू पिऊन झिंगत पडले होते! यामुळें पुरे दोन तासही लढाई झाली नाहीं. नेपाळचा राजा देवीच्या आराधनेंत गुंतला होता अशा वेळीं पृथ्वीनारायण यानें कांतिपुरचें

...हासि...

...ले व लवकरच ललितपुरही आपल्या राज्यास

... देवसलमल्ल यानें तें राज्य आपल्या कन्येस दिलें होतें. पुढें लवकरच ते ... येथील राज्यास जोडण्यांत आलें. राजा शिवसिंह याचा धाकटा मुलगा हरिहरसिंहमल्ल हा या प्रांताचा अधिकारी होता; तो मरण पावल्यावर त्याचा पुत्र सिद्धनरसिंह हा राजा झाला. हा मोठा ज्ञानी होता अशी कीर्ति नेपाळांत अद्याप गाजत आहे. ने. सं. ७४० या वर्षी त्यानें आपला उपाध्याय विश्वनाथ याच्या अनुमतीनें तुलजादेवीची पुनः प्रतिष्ठा केली. ने. सं. ७५७ या वर्षी फाल्गुन मासीं पुनर्वसू नक्षत्रावर कोट्याहुति यज्ञ करून, राधाकृष्ण मंदिराची त्यानें प्रतिष्ठा केली. या राजाची बौद्धधर्मावर विशेष श्रद्धा होती. त्यानें बौद्ध लोकांचे जुने विहार मोडून नवे बांधिले व याशिवाय ज्येष्ठवर्ण तङ्गल, धर्माकृति, मयूरवर्ण, विष्ण्याक्ष, ओंकाली रुद्रवर्ण इत्यादि नवे विहार स्थापन केले. ने. सं. ७६९ या वर्षी सिद्धनरसिंह यानें भंडार येथील पुष्करणीच्या तीरीं एक भूगोलमंडप बांधविला या मंडपाच्या दुसऱ्या मजल्यावर नक्षत्रें व स्वर्गीय देवतांच्या मूर्ति ठेविल्या आहेत. याच वर्षी, पौष मासीं या राजानें हालुखा येथील जानकीनाथ चक्रवर्ती नामक ब्राह्मणास अठरा पुराणें दान केलीं. पुढें ने. सं. ७७२ त सिद्धनरसिंह राजा तीर्थयात्रेस निघून गेला. पुढें ने. सं.७७४या वर्षी नेपाळांत मोठा भूकंप झाला व त्यामुळें पुष्कळ मंदिरें व इमारती जमिनदोस्त झाल्या. सिद्धनरसिंहानें आपलें शेष आयुष्य अनेक मंदिरांची स्थापना करणें,भूमिदान व इतर सत्कर्में यांत खर्च केलें. पुढें ने. सं. ७७७ या वर्षी त्यानें सिंहासनाचा त्याग करून संन्यासदीक्षा धारण केली. ज्याच्या नामस्मरणानें सर्व पातकें नष्ट होतात, असा या राजासारखा पुण्यात्मा राजा नेपाळांत दुसरा झाला नाहीं, असें नेपाळी लोक म्हणतात.

राजा सिद्धनरसिंह समाधिस्थ झाल्यावर त्याचा पुत्र श्रीनिवासमल्ल हा ने. सं. ७७७ ज्येष्ठ शुद्ध १२ या दिवशीं सिंहासनावर बसला. पुढें

ने. सं ७७८ या वर्षी भाटगांव व ललितपुर ये
राजाशीं लढाई केली; त्यावेळीं श्रीनिवासमल्ल व प्रतापमल्ल या
पुराण व हरिवंश या ग्रंथांची शपथ घेऊन, एकमे
त्यामुळें ललितपुराहून कांतिपुराकडे जाणारा जो मार्ग अ त ुला करण्यांत आला. ने. सं. ७८० या वर्षी भाटगांवचा राजा जगत्प्रकाशमल्ल यानें चांगु येथील छावणीस आग लावून, आठ मनुष्यांस जाळून मारिलें व २१ आसामींस कैद करून नेलें. यामुळें राजा श्रीनिवास व प्रतापमल्ल हे एक होऊन त्यांनीं बन्देग्राम व चंपानगर या छावण्या आपल्या ताब्यांत घेतल्या व पुढें चोरपुरी हें ठिकाण काबीज केलें. नंतर भाटगांव येथील राजानें त्यांस हत्ती व कांहीं द्रव्य देऊन त्यांशीं तह केला. भाटगांव येथून निघाल्यावर, श्रीनिवास व प्रतापमल्ल यांनीं ' नकदेश ' नामक गांव लुटला व पुढें ते आपापल्या राजधानींस निघून गेले.

ने. सं. ७८३ व ७९८ यांच्या दरम्यान श्रीनिवासानें पुष्कळ नवीं मंदिरें बांधविलीं व जुन्या मंदिरांचा पुनरुद्धार केला. ने. सं. ८०१ यावर्षी त्यानें भीमसेनाचें एक मोठें मंदिर बांधविलें. श्रीनिवासाच्या पश्चात् त्याचा पुत्र योगनरेंद्रसिंह हा सिंहासनावर बसला. त्यानें ' मणिमंडप ' नामक एक मोठा राजवाडा बांधविला. त्याचा पुत्र लहान असतांच मरण पावल्यामुळें, योगनरेंद्रसिंहास फार दुःख झालें व त्यामुळें विरक्त होऊन त्यानें आपल्या राज्याचा परित्याग केला. त्यावेळीं पाटण येथील लोकांच्या आग्रहावरून कांतिपुरचा राजा महिपतींद्र हा पाटणचा राजा झाला. पुढें तो मरण पावल्यावर जययोगप्रकाश नामक पुरुष सिंहासनावर बसला. त्याच्या पश्चात्, योगनरेंद्राची कन्या रुद्रमती हिचा पुत्र विष्णुमल्ल हा ने. सं. ८४३ यावर्षी पाटणच्या गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दीत अनावृष्टी होऊन भयंकर दुष्काळ पडला. या राजाचा बहुतेक वेळ पुरश्चरणें व व्रतोद्यापनें यांत गेला. हा निपुत्रिक मरण पावल्यामुळें, लोकांनीं राज्यप्रकाशमल्ल यास गादीवर बसविलें; तो शांत स्वभावाचा होता; यामुळें त्याच्या प्रधानांनीं कपटानें त्याचे दोन्ही डोळे फोडून टाकिले ! पुढें या दुःखानें तो विचारा लवकरच

...हासि

... येथील प्रधानांनीं, भाटगांवचा राजा रणजित् ... पाटणच्या सिंहासनावर बसविलें. परंतु या गोष्टीस ... दिवसल...च त्यांनीं त्यास पदच्युत करून विश्वजित् यास राज्य दिलें ...जितानें चार वर्षें राज्य केल्यावर प्रधान लोकांनीं त्याचाही वध करविला! व नवकोट येथें जाऊन, पृथ्वीनारायणाच्या अनुमतीनें त्याचा धाकटा भाऊ दलमर्दनशाह यास आणून पाटणच्या गादीवर बसविलें. पुढें एका प्रसंगीं पृथ्वीनारायण व दलमर्दनशाह यांच्यांत विरोध उत्पन्न होऊन मोठें युद्ध झालें. दलमर्दनशहाचें हें कृत्य त्याच्या प्रधानमंडळास न आवडल्यामुळें त्यांनीं त्यास पदच्युत केलें व विश्वजिताचा वंशज तेजनरसिंह यास आपला राजा केलें. त्यानें तीन वर्षें राज्य केल्यावर पृथ्वीनारायण हा नेपाळांत आला व त्यानें पाटणवर स्वारी केली. त्यावेळीं तेजनरसिंह हा भाटगांव येथें पळून गेला. पाटण येथील राजसत्ता तेथील प्रधान लोकांच्या हातीं आहे, असें दृष्टोत्पत्तीस येतांच, पृथ्वीनारायणानें त्या सर्वांस कपटानें ठार मारिलें. इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या मध्यकालीं लॉर्ड क्लाईव्ह यानें, बंगाल्यांत इंग्रजी राज्याची संस्थापना केली, त्यावेळीं नेपाळांतील लहान लहान संस्थानिक आपसांत लढाया करकरून अगदीं जेरीस आले होते. भाटगांव, पाटण व काटमांडू येथील राज्यांचा वर जो इतिहास दिला आहे, त्यापुढील इतिहासावरून असें समजतें कीं, तेजनरसिंह हा पाटण येथील गादीवर असतां व जयप्रकाश हा काटमांडू येथें राज्य करीत असतां, भाटगांव येथील राजा रणजितमल्ल यानें एका क्षुल्लक कारणावरून आपल्या फौजेसह वरील राज्यांवर चाल केली होती. पाटण, भाटगांव व काटमांडू या तिन्ही राज्यांचें स्वामित्व आपल्याकडे असावें अशी रणजितमल्लाची फार इच्छा होती व ती आपल्या एकट्याच्या हातून पूर्ण होणें अशक्य आहे, असें जेव्हां त्यास कळून आलें, तेव्हां मागचा पुढचा विचार न करितां पृथ्वीनारायण यास त्यानें आपल्या साहाय्यार्थ बोलाविलें. पृथ्वीनारायण यासही नेपाळांत आपला प्रवेश करून घेणें इष्टच असल्यामुळें रणजितमल्लाचें आमंत्रण त्यानें मोठ्या आनंदानें स्वीकारिलें. त्यानें

या पूर्वी अनेकवार नेपाळावर स्वाऱ्या केल्या
स्वारीच्या शेवटीं माघीं अपेश घेऊन त्यास मागें फिरावें
सबंध नेपाळ आपल्या घशांत टाकण्याची त्याची
झाली नव्हती. अशा स्थितींत यावेळीं ती लालसा तृप्त क ध्यावी असे त्यास वाटलें. शिवाय पाटण येथील लोकांनीं त्याचा भाऊ दलमर्दन यास आपण होऊन तेथील गादी दिली असतां मागाहून त्यांनीं त्यास पदच्युत केलें, या गोष्टीबद्दलही पृथ्वीनारायणास त्यांचा सूड घ्यावयाचा होता; अर्थात् त्यानें रणजितमल्लास साहाय्य करण्याचें त्यास एकदम अभिवचन दिलें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं; परंतु ही गोष्ट घडल्यावर पृथ्वीनारायणाच्या हेतूबद्दल रणजितमल्लास शंका आल्यावरून त्यानें दोन्ही राजांशीं तह केला व त्यांचें व आपलें सैन्य बरोबर घेऊन पृथ्वीनारायणास सामना न देतां तेथून हळूच मागें पाय काढण्याचा विचार केला.

वरील तिन्ही राजे एकत्र झालेले पाहून पृथ्वीनारायण त्यांशीं लढण्याच्या भरीस न पडतां नेपाळांतील पहाडी सरदारांस आपल्या पक्षाकडे वळविण्याचा त्यानें प्रयत्न आरंभिला. तथापि त्यांच्याशीं सहा वेळ युद्ध केल्यावर हा त्याचा प्रयत्न शेवटास गेला. पुढें त्यानें चौकोट येथें एक किल्ला उभारिला व आपली फौज बरीच वाढविली. त्यावेळीं महेंद्रसिंहराय नामक एका राजपुरुषानें त्याच्याशीं एकसारखी पंधरा दिवस लढाई करून त्याचा पराभव केला व त्यामुळें गुरखे लोक मागें हटत चालले, परंतु शेवटच्या दिवशीं महेंद्रसिंहराय हा त्यांच्याशीं लढत असतां समरांगणीं पतन पावला व गुरखे विजयी झाले. आपला पुढारी पडला असें पाहतांच सगळे चौकोटी लोक पळून गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पृथ्वीनारायण समरभूमीवर प्राप्त झाला व महेंद्रसिंहरायाचें शव त्याच्या दृष्टीस पडतांच त्यानें त्याच्या शौर्याची फार स्तुति केली. पुढें महेंद्रसिंहरायाच्या कुटुंबांतील मनुष्यांस पृथ्वीनारायणानें आपल्यापाशीं आणून ठेविलें व बरेच दिवस त्यांस मोठ्या प्रेमानें वागविलें; इतकेंच नव्हे, तर त्यांच्या चरितार्थासाठीं पांच गांवांची

... ...न दिली. पुढें पृथ्वीनारायण आपल्या नवकोट शहरीं ...र्शीं ... पाट

... हा ... पहिलें युद्ध इ. स. १७६५ या वर्षी झालें. त्यानंतर आणखी का... दिवसांनीं पृथ्वीनारायण यानें त्या शहरावर दोनवेळ स्वारी केली. तिसऱ्या स्वारीच्या वेळीं तो यशस्वी झाला व त्यावेळीं कीर्तिपुर येथें त्यानें जो भयंकर अत्याचार केला त्याचें वर्णन या ग्रंथांत पूर्वीं दिलेंच आहे. कीर्तिपूर हातीं येतांच, पाटणही वशांत टाकण्याच्या इराद्यानें पृथ्वीनारायणानें आपला मोर्चा तिकडे फिरविला; परंतु इंग्रज योद्धा कप्तान किन्लोक हा आपल्या सैन्यासह नेपाळी तराईच्या नजीक येऊन पोहोंचला, ही हकीकत त्यास समजतांच तो नवकोटकडे निघून गेला; व पाटणचा राजा तेजनरसिंह यास आणखी एक वर्ष राज्य करण्यास सवड मिळाली.

कीर्तिपुर येथील लोकांचीं नाकें कापण्याची शिक्षा पृथ्वीनारायणानें अमलांत आणिली, त्यावेळीं नेवारी लोकांच्या राजानें ती गोष्ट इंग्रजसरकारास कळविली. मग वरील इंग्रज योद्धा कप्तान किन्लोक हा इ० स० १७६७ या वर्षाच्या आरंभींच नेपाळांतील पर्वतांच्या पायथ्याशीं येऊन दाखल झाला; परंतु तेथील हवा त्याच्या लष्करांतील शिपायांस न मानवल्यामुळें त्यास लवकरच मागें फिरावें लागलें. इंग्रजी फौज निघून गेल्यावर एक वर्ष गुरखे लोक अगदीं स्वस्थ बसले होते. पुढें इ. स. १७६८ सालीं इंद्रयात्रेच्या वेळीं पृथ्वीनारायणानें काटमांडू शहरांत ससैन्य प्रवेश केला व शहरांतील सर्व श्रीमंत लोक त्यास सामील झालेले पाहून काटमांडूचा राजा व तेजनरसिंह हे युद्धाच्या भरीस न पडतां, भाटगांवाकडे निघून गेले.

भाटगांवचा राजपुत्र वीरनृसिंह याचा वध करून तें राज्य आपल्या हातीं घेण्याच्या हेतूनें त्याच्या बापाच्या एका दासीपुत्रानें, पृथ्वीनारायण याशीं संधान लाविलें व पृथ्वीनारायण जेव्हां भाटगांवावर चालून आला तेव्हां त्यानें त्याशीं कांहीं वेळ लटकी लढाई करून, आपला दारुगोळा त्याच्या स्वाधीन केला. नंतर गुरखे लोक भाटगांव शहरांत घुसले व राजवाड्यासमोर त्यांचें आणि काटमांडूचा राजा जयप्रकाश यांचें मोठें युद्ध होऊन,

त्यांत जयप्रकाश याच्या पायास गोळी लागल्यानु [illegible] व भाटगांवचें राज्य गुरखे लोकांनीं घेतलें. नंतर [illegible] दरबारांत गेला, त्यावेळीं तेथें जयप्रकाश, रणजितां [illegible] सिंह तिन्ही नेपाळी राजे हजर होते; त्यांच्या व पृथ्वीनारायणा [illegible] मित्रत्वाच्या गोष्टी झाल्या. राजा रणजितमल्ल यानें भाटगांवचें राज्य पूर्ववत् चालवावें, अशी आपली इच्छा पृथ्वीनारायणानें त्यास प्रदर्शित केली. परंतु आपल्या मित्रांच्या विश्वासघातानें आपण अगदीं कंटाळलों असून, यापुढें काशी येथें जाऊन राहण्याचा आपला विचार आहे, असें रणजितसिंहानें सांगितल्यावरून, पृथ्वीनारायणानें तसें करण्याची त्यास परवानगी दिली. ज.तेवेळीं रणजितमल्लानें आपल्या दासिपुत्रांच्या कपटकृत्याची व आपला पुत्र वीरनृसिंह याच्या वधाची सविस्तर हकीकत पृथ्वीनारायण यास निवेदन केली; ती ऐकतांच पृथ्वीनारायण यानें त्या दासिपुत्रास सपरिवार बोलावून आणविलें व त्या सर्वांचीं नाकें कापून, त्यांची सगळी दौलत जप्त केली! विश्वासघातकी लोकांचे शेवटीं असेच हाल झालेले दृष्टीस पडतात; ही आनंदाची गोष्ट ह्मटली पाहिजे. असो. नंतर राज्यप्रकाश यानें पृथ्वीनारायण यास अशी विनंति केली कीं, ‘ माझ्या पायास गोळी लागल्यामुळें मी आतां फार वेळ वांचेन असें मला वाटत नाहीं;याकरितां मला पशुपतिनाथाच्या घांटावर पोंचविण्यांत आलें असतां, तेथें देवासमोर मी सुखानें प्राण सोडीन’ ! ही विनंति पृथ्वीनारायणानें तात्काळ मान्य केली. पुढें ललितपुरचा राजा तेजनरसिंह याच्या जेव्हां लक्षांत आलें कीं,आपला मित्र रणजितमल्ल याच्या नादीं लागल्यामुळेंच आपणास ही अवस्था प्राप्त झाली, तेव्हां त्याचे हातपाय अगदीं गळाले व ‘ आपला हेतु काय आहे ’ असें जेव्हां पृथ्वीनारायणानें त्यास विचारिलें, तेव्हां तो अगदीं स्तब्ध राहिला. यामुळें संशय उत्पन्न होऊन, पृथ्वीनारायणानें त्यास कैद करून लक्ष्मीपुर येथें नेऊन ठेविलें; व तो शेवटीं तेथेंच मरण पावला. अशा प्रकारें नेपाळांतील मल्ल राजवंशाची परिसमाप्ति होऊन तें राज्य गुरखे लोकांच्या हातीं आलें.

नेपाळच्या सिंहासनावर अधिष्ठित झाल्यावर, पृथ्वीनारायण यानें किरात

… न त्यांचे प्रदेश आपल्या राज्यास जोडिले व … दिली. … बाहेरील अनेक राज्यें व प्रदेश जिंकून … नेपाळचें राज्य वाढविलें. उत्तरेस किरोण व कुही; पूर्वेस विज… सिक्किम संस्थानच्या सीमेवरील मेची नदी; दक्षिणेस मकवनपुर व तराई व पश्चिमेस सप्तगंडकी, या ठिकाणांमधील सर्व भूभाग पृथ्वीनारायणाच्या ताब्यांत होता. त्यानें कांतिपुर येथें एक मोठी धर्मशाळा बांधिली. नेपाळांतील 'पूतवर' नामक नीच जातीच्या लोकांस राजास भेटण्याची त्यानें सदर परवानगी दिली.* नेपाळचें राज्य सात वर्षे केल्यावर पृथ्वीनारायण हा गंडकी नदीच्या कांठीं मोहनतीर्थ येथें ने. सं. ८९५ या वर्षी मरण पावला. त्यास दोन पुत्र होते; त्यांपैकीं ज्येष्ठ; पुत्र सिंहप्रतापशाह हा नेपाळच्या सिंहासनावर बसला व कनिष्ठ पुत्र शाहबहादूर हा बेतिया येथील राजा झाला. पुढें ने. सं. ८९८ या वर्षी सिंहप्रतापशाह हा आपल्या मंत्रीजनांच्या कपटजालांत सांपडून प्राणास मुकला व त्याचा पुत्र रणबहादूर हा गादीवर बसला. त्यानें आपल्या बापाच्या मृत्युचा सूड घेण्यासाठीं, सर्व मंत्र्यांस इंद्राणीच्या मंदिरासमोर आणवून त्यांची कत्तल उडविली! पुढें मुख्य मंत्री वंशराजपांडा याशीं त्याचें वैमनस्य आल्यावरून त्याचाही त्यानें वध करविला. नंतर रणबहादुराचा चुलता शाहबहादुर हा नेपाळांत आला व राजाचा प्रतिनिधि ह्मणून राज्य करूं लागला. परंतु पुढें राणीचें व त्याचें कांहीं कारणावरून वैमनस्य आल्यामुळें तो नेपाळ सोडून चालता झाला व राणी राजेंद्रलक्ष्मी हिनें सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. ही राणी फार चतुर होती, तिच्या

---

* कीर्तिपुरच्या पहिल्या लढाईंत पृथ्वीनारायण हा जयप्रकाशमल्ल याजकडून पराजित होऊन, एका डोलींत बसून जात असतां, एका नेपाळी शिपायानें त्यास ठार मारण्याकरितां आपली तलवार उपसली. त्यावेळीं दुसऱ्या एका शिपायानें त्याचा हात धरून, 'राजाचा वध करूं नये' असें त्यास सांगितलें. पुढें एका कसायानें राजास आपल्या खांद्यावर वाहून, नवकोटास पोंचविलें. त्यावेळीं 'शाबास पूत' असें ह्मणून पृथ्वीनारायणानें त्याचे कृतज्ञतापूर्वक आभार मानिले. त्या दिवसापासून या जातीस 'पूतवर' असें नांव पडलें व राजाच्या शरीरासही स्पर्श करण्याची त्यांस मोकळीक मिळाली.

बुद्धिबलानें पापला व कोकसी या ठिकाणांम... जोडला गेला. राणी राजेंद्रलक्ष्मी मरण पावल्या... नेपाळांत आला व राज्य करूं लागला. त्याच्या ... बाविशी, लमजुंग, टनहौ हीं मांडलिक राज्यें, पश्चिमेकडे ...कांठावरील श्रीनगर व कोकसी या ठिकाणापर्यंत सर्व भूभाग, पूर्वेकडील किरातराज्य व शुम्भेश्वर, इतका प्रदेश नेपाळच्या राज्यास जोडण्यांत आला.

इ. स. १७९१ या वर्षी गुरखे लोकांनीं नेपाळ, तिबेट व हिंदुस्थान या देशांतील आपल्या व्यापाराच्या संरक्षणासाठीं, इंग्रजांशीं सख्य केलें. यावेळीं चीनचा बादशाह व नेपाळचा राजा यांची दिगगारचा या ठिकाणीं भयंकर लढाई चालू होती. तें ठिकाण चिनी धर्मगुरूच्या ताब्यांत होतें. या लढाईत चिनी प्रधान भूमथाम यानें खत्रिया, रसउआ, गोसाईस्थानानजीक देवराली या ठिकाणीं नेपाळी सैन्याचा कित्येक वेळां पराभव केला व त्यामुळें तें सैन्य धुनचू व खबोराकडे पळून गेलें. या लढाईत नेपाळचा मुख्य प्रधान दामोदर पांडा यानें मोठें शौर्य दाखविलें. इ. स. १७९२ या वर्षी नेपाळी लोकांनीं चीनच्या विरुद्ध आपणांस साहाय्य करण्याविषयीं इंग्रजी गव्हर्नर जनरल लॉर्ड कॉर्नवालीस यास विनंति केली. परंतु चीनशीं युद्ध करण्याचें पहिल्यानें त्यानें नाकारिलें. तथापि पुढें बरीच भवतिनभवति झाल्यावर, इ. स. १७९३ या वर्षी इंग्रजांनीं मेजर कर्कप्याट्रिक यास काटमांडू येथें पाठविलें. परंतु तो तेथें जाऊन पोहोंचण्याच्यापूर्वींच नेपाळी लोक व चीनचा बादशाह यांचा तह होऊन चुकला होता.

नेपाळचा तरुण राजा रणबहादूर यानें इ. स. १७९५ या वर्षी नेपाळचा राज्यकारभार पुनः आपल्या हातीं घेतला व त्यामुळें त्याचा चुलता शाहबहादुर यास वाईट वाटलें. रणबहादुरानें पुढें त्यास जन्मकैदेची शिक्षा दिली! महाराज रणबहादुर यानें इ. स. १८०० पर्यंत वाईट रीतीनें नेपाळचें राज्य चालविलें. पुढें, त्याच्या अत्याचरास कंटाळून, प्रजा व मंत्री यांनीं त्यास पदच्युत करून, काशीस पाठविलें. या राजानें एका विधवा ब्राह्मण स्त्रीशीं विवाह केला होता व क्षत्रियानें ब्राह्मणीशीं विवाह करणें धर्मबाह्य असल्यामुळें

...हासि...

..., आपल्या कृतकर्मांचें प्रायश्चित्त भोगण्यास ...न त्यां...

...र्ष युद्ध...र्वी ...त वर्षी नेपाळी व इंग्रज यांचा एक तह झाला व त्या ...अन्वयें, नेपा... नेपाळ राज्यकारभारावर नजर ठेवण्यासाठीं क्याप्टन डब्ल्यू. डी. नॉक्स, यांस आपला रेसिडेंट ह्मणून इंग्रजांनी नेपाळांत पाठविलें. परंतु नेपाळी लोकांनीं पहिल्यानें त्यास आपल्या सीमेच्या आंत येऊं दिलें नाहीं. पुढें १८०२ सालच्या एप्रील महिन्यांत तो नेपाळांत शिरला व तेथें एक वर्ष राहून, १८०३ सालीं परत आला. १८०४ सालीं लॉर्ड वेलस्लीसाहेबानें नेपाळाशीं झालेला तहनामा रद्द केला व पुनः १८१० सालीं, नवा तह करण्याची वाटाघाट सुरू झाली.

महाराज रणबहादुर हा काशी येथें चार वर्षें संन्यासी वेषांत राहून पुनः नेपाळांत आला व आपणास पदच्युत करणाऱ्या लोकांस त्यानें ठार मारिलें. पुढें त्यानें कांहीं नवे कायदे करून ते अमलांत आणिले. नंतर ‘ कांगडे ’ नामक संस्थानावर चाल करून,तेथील राजा संसारचंद्र याचा त्यानें पराभव केला व तें संस्थान खालसा करून नेपाळास जोडिलें. रणबहादुराचा काळ झाल्यावर, त्याच्या ब्राह्मण स्त्रीपासून त्यास झालेला पुत्र निर्वाणयोधविक्रमशाह हा तक्तनशीन झाला. त्यानें ‘ भीमसेनथापा ’ यास आपल्या मुख्य प्रधानाची जागा दिली. इ. स. १८०८ या वर्षी नेपाळांत मोठा भूकंप झाला व त्यामुळें शेंकडो लोक मरण पावले व अनेक मंदिरें जमीनदोस्त झालीं. योधविक्रमशाहाचा बाप रणबहादुर यानें सोन्याचें नाणें नेपाळांत पहिल्यानें चालू केलें. पुढें योधविक्रमशाह यानें ‘ढाक’ (ढबूपैसा) नामक तांब्याचें नाणें पाडिलें व तें आपल्या नांवानें चालू केलें. त्याचप्रमाणें ‘ भमवहिलखेल ’ या ठिकाणीं दारुगोळ्याचा एक कारखाना त्यानें सुरू केला.

इ०स०१८१०या वर्षी इंग्रज व नेपाळी यांचा तह झाला होता, तथापि नेपाळाशीं चालू असलेला इंग्रजांचा व्यापार दिवसेंदिवस कमी होत चालला होता. इ०स० १७४७ पासून १८१४ पर्यंत नेपाळी लोक इंग्रजी राज्यांत शिरून बराच उपद्रव करीत होते; या सबबीवर इंग्रजांनी नेपाळाशीं युद्ध

करण्याची आपली इच्छा प्रसिद्ध केली. या
गिलेस्पी हा मारला गेला व जनरल मॅरली व बु
जनरल आक्टरलोनी यानें मात्र बराच पराक्रम गाज
मक्कानपुर शहर हस्तगत केलें, त्यावेळीं नेपाळच्या राजानें तह करु
त्यांचा घेतलेला मुलूख सोडून दिला व त्याबद्दल इंग्रजांनीं त्यास तराईचा कांहीं भाग दिला. (इ०स० १८१६).

वरील तहाचीं कलमें अमलांत आणण्यासाठीं इंग्रजी रेसिडेंट गार्डनर हा काटमांडू येथें जाऊन राहिला. त्यावेळीं नेपाळचा राजा अल्पवयी असून, सगळी राजसत्ता भीमसेन थापा याच्या हातीं होती. यानंतर कांहीं वर्षांनीं नेपाळांत देवीचा भयंकर रोग उद्भवल्यामुळें सगळे लोक भिऊन गेले. या रोगानें तेथें असा प्रळय केला कीं, भर रस्त्यांतून कुत्रे व गिधाडें मनुष्याचें मांस खाण्यांत दंग झालेलीं दृष्टीस पडत होतीं. शेवटीं नेपाळचा राजाही याच रोगास बळी पडला व त्याचा तीन वर्षांचा मुलगा राजेंद्रविक्रमशाहबहादुर हा सिंहासनावर बसला. त्यावेळीं त्याची आई राणी ललित त्रिपुरासुंदरी देवी हिनें सगळा राज्यकारभार आपल्या हातीं घेतला; अर्थात् भीमसेन थापा यास तिच्या आज्ञेप्रमाणें राज्य चालविणें भाग पडलें. इ०स० १८१७ या वर्षीं इंग्रज वनस्पती शास्त्रज्ञ डॉ० वालेस हा नेपाळांतील वनस्पतींची माहिती मिळविण्यासाठीं नेपाळांत गेला होता. इ०स० १८२९ या वर्षीं राजेंद्रविक्रम-शाह यास एक पुत्र झाला. यावेळीं प्रधान भीमसेन थापा याच्या शौर्य व चातुर्यामुळें नेपाळचें राज्य अगदीं सुयंत्रपणें चाललें होतें. पुढें भीमसेनानें पशुपतिनाथमंदिरांत चांदीचा मुलामा चढविला व कांहीं धर्मशाळा बांधविल्या, हें कृत्य राजास न आवडल्यामुळें त्यानें त्याचा धिःकार केला व इ.स.१८३३ या वर्षीं राणीच्या इच्छेवरून त्यास कैद करण्यांत आलें! इ०स० १८३४ सालीं नेपाळांत मोठा भूकंप होऊन सरकारी दारुखान्यांस आग लागली व त्यामुळें पुष्कळ लोक मरण पावले. इंग्रजी रेसिडेन्सीची इमारत मोडून पडली! इ०स०१८३५ सालीं नेपाळच्या राजानें आपला सेनापति मातवरसिंह यास कलकत्ता येथें पाठविलें. इ०स० १८३८ या वर्षीं महाराणीनें रणरंग

...हासिक...

...ों; यामुळें भीमसेन थापा व मातवरसिंह हे ... न ...र्दिन त्यांह यास राजानें कांहीं कामासाठीं पंजाबचा ... थांजकडे पाठविलें व १८३९ सालीं भीमसेन थापा ...स कैदेत ... नेपाळ तेथें त्यानें—त्या थोर पुरुषानें—आत्महत्या करून आपली कायमची सुटका करून घेतली!! या महावीरानें नेपाळचें राज्य पंचवीस वर्षें फार उत्तम प्रकारें चालविलें व त्याबद्दल मरणोत्तर त्यास बक्षीस जर काय मिळालें ह्मणाल तर काटमांडूच्या रस्त्यांतून त्याचें प्रेत ओढीत नेऊन विष्णुमतीच्या कांठीं तें जाळून टाकण्यांत आलें! आतां या राजे लोकांची कृतज्ञता किती ह्मणून वर्णन करावी!!

भीमसेनाच्या मृत्यूनंतर नेपाळच्या राज्यकारभारांत एकच अंदाधुंदी माजून राहिली व इंग्रजांशीं लढाई होण्याचा रंग दिसूं लागला; परंतु व्यवहारचतुर हजसन साहेब याच्या खटपटीमुळें तो प्रसंग टळला. याच वर्षीं मोठ्या राणीनें रणरंग पांड्याचा पक्ष घेऊन त्यास मुख्य प्रधानाचीं वस्त्रें दिलीं परतु धाकट्या राणीनें भीमसेन थापा याचा मित्र मातवरसिंह यास पंजाबांतून आणवून त्यास मुख्य प्रधान नेमण्याची मसलत योजिली. मातवरसिंहानें राजघराण्यांतील इतर लोक व लष्कर यांच्या साहाय्यानें रणरंग पांडे यास ठार मारिलें व त्याच्या वंशाचा नायनाट करून टाकिला. नेपाळांतील सुप्रसिद्ध योद्धा जंगबहादुर हा यावेळीं नेपाळी फौजेंत एक सामान्य प्रतीचा सैनिक होता. तो एका नेपाळी धर्मगुरूचा पुत्र व मातवरसिंहाचा संबंधी होता. तरुण जंगबहादुराचें शौर्य व बुद्धिबल अवलोकन करून, मातवरसिंह यास त्याचा मोठा धाक उत्पन्न झाला. इंग्रजी रेसिडेंट सर हेन्री लॉरेन्स यानेंही जंगबहादुराची फार तारीफ केली होती. जंगबहादुरानें वरिष्ठ राणीशीं संगनमत करून व तिचा पक्ष घेऊन इ. स. १८४५ या वर्षीं मातवरसिंह यास ठार मारिलें व सर्व राजसत्ता आपल्या हातीं घेतली, तथापि गगनसिंह हा मुख्य प्रधानाचें काम पहात असे. इ. स. १८४६ या वर्षीं सर हेनरी लॉरेन्स हा नेपाळ सोडून गेला व त्याचे जागीं मि० कालविन याची नेमणूक झाली. मातवरसिंह मरण पावल्यावर नेपाळचा राजा व राणी हीं जंगबहादुर याच्या हातांतील

वाहुलीं होऊन बसलीं. पुढें मुख्य प्रधान गग... यांचा राणी व जंगबहादूर यांच्याशीं कोणत्या... विवाद झाला. वाढतां वाढतां हा वादविवाद इतक्या... ता. १५ व १६ सप्टेंबर १८४६ या दिवशीं काटमांडू ...यंकर घडून आले व बिचारा नेपाळचा राजा स्वप्राणरक्षणार्थ इंग्रज रेसिडेंट कालविनसाहेब याच्या आश्रयास जाऊन राहिला ! इकडे जंगबहादुर यानें आपल्या लष्कराकडून बड्या बड्या नेपाळी सरदारांचे खून करविले व ज्या-वेळीं राजा रेसिडेन्सींत पळून जाण्यासाठीं निघाला, त्यावेळीं राजवाड्याच्या चारी बाजूस रक्ताचे पूर वाहात असलेले त्याचे दृष्टीस पडले !

पुढें जंगबहादुर हा आपल्या नातेवाइकांच्या व स्वतःच्या बलावर नेपाळांत केवळ अद्वितीय पुरुष झाला. जे जे सरदार किंवा गृहस्थ त्यास प्रतिकूल होते, त्या सर्वांस आपल्या विजयी खड्गाघातानें त्यानें यमपुरीची वाट दाखविली. जंगबहादुराचें क्रौर्य पाहून भयभीत झालेला नेपाळचा राजाही काशी येथें पळून गेला. आपल्या पुत्रास राज्य मिळावें ह्मणून ज्या राणीनें जंगबहादुरास साहाय्य केलें होतें, तीसही त्यानें काशी येथें पाठवून दिलें. इ. स. १८४७ सालीं नेपाळच्या राजानें आपलें राज्य परत मिळविण्यासाठीं दोन वेळ प्रयत्न केला, परंतु शेवटीं पराजित होऊन त्यास मागें फिरावें लागलें. पुढें हा राजा कांहीं दिवस नेपाळाबाहेर राहिल्यावर वेडा झाला व जंगबहादूर यानें सर्व प्रजेच्या अनुमतानें महाराज सुरेंद्रविक्रमशाह यास नेपाळच्या सिंहासनावर बसविलें. पुढें सुरेंद्रविक्रमशाह समशेरजंग मरण पावल्यावर त्याचा पुत्र वीरविक्रमशाहबहादुर समशेरजंग हा गादीवर बसला. त्यानें जंगबहादुर याच्या कन्येशीं आपला विवाह केला व तिच्या पोटीं ता. ८ आगष्ट सन १८७५ या वर्षी त्यास एक पुत्र झाला. यापुढील नेपाळचा इतिहास ह्मटला ह्मणजे नेपाळच्या मुख्य प्रधानांचा इतिहास होय; कारण कीं तेथील सर्व राजसत्ता त्यांच्याच हातीं आहे. महाराजास कोणत्याही प्रकारचा अधिकार नाहीं. महाराज जंगबहादूर यांच्या वेळेपासून सर्वच मनु बदलला व त्यामुळें नेपाळच्या इतिहासांत मोठी क्रांति घडून आली. अर्थात् नेपा-

…वावे व त्याचप्रमाणें इंग्रजसरकारच्या अपराधी
…ं; या… …न हिंदुस्थानांत पाठवावें,' अशा अर्थाचें एक …ल. परंतु या कलमाची अंमलबजावणी व्हावी तशी …त नस… …जी राज्यांतले पुष्कळ अपराधी लोक नेपाळांत पळून जाऊन आपल… …ाव करितात, असें तिकडे जाऊन आलेले लोक सांगतात.

इ. स. १८७३ सालीं नेपाळ व तिबेट यांच्यांत पुनः कटकट जुंपली होती, परंतु ती लागलीच मिटली. या वर्षीं इंग्रज सरकारानें जंगबहादुर यास जी. सी. एस्. आय्. ही बहुमानसूचक पदवी अर्पण केली. त्याचप्रमाणें चिनीसरकारानेंही त्यास 'थौंग—लिनपिम—माको–कांग–वांग—स्थान ही पदवी दिली. इ. स. १८७४ सालीं जंगबहादुर हा विलायतेस जाण्यासाठीं मुंबई येथें सपरिवार आला होता, परंतु तेथें तो आजारी पडल्यामुळें, पुनः नेपाळांत निघून गेला. जंगबहादुर मरण पावल्यावर महाराज. वीर समशेरजंग रणबहादुर के. सी. एस्. आय्. हा नेपाळचा मुख्य प्रधान झाला. हा इ. स. १८९९ सालीं लॉर्ड कर्झन यास भेटण्यासाठीं कलकत्ता येथें आला होता.

कोणत्याही परकीय राष्ट्रांतील लोकांस नेपाळसरकार आपल्या राज्यांत येऊं देत नाहीं, यामुळें नेपाळच्या इतिहासांतील पुष्कळ गोष्टी अज्ञात राहिल्या आहेत. नेपाळी लोक कुरूप परंतु मोठे शूर असून, त्यांच्यांतील पुष्कळ गुरखे लोक इंग्रजी लष्करांत शिपायी आहेत व इ. स. १९०४ सालच्या तिबेटी मोहिमेंत त्यांनीं व नेपाळ सरकारानें इंग्रजांस उत्तम प्रकारें साहाय्य केलें, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. हल्लीं पुष्कळ नेपाळी विद्यार्थी जपानांत जाऊन तेथें अनेक कलांचें ज्ञान संपादन करीत आहेत.

नेपाळांतील धर्म.

नेपाळांत हिंदु व बौद्ध या दोन्ही धर्मांचे लोक असून, त्यांस अनुक्रमें शिवमार्गी व बुद्धमार्गी या नांवांनीं तिकडे ओळखतात. ह्या दोन्ही धर्मांची तेथें इतकी

---

१ या पदवीचा अर्थः— 'शूर सेनापति, सर्वकार्यकुशल व बडा मुत्सद्दी.' असा आहे.

...शिष्ट.

भेसळ झालेली आहे कीं, हिंदु लोक बौद्धांचे
विचार पाळितात. नेवारी लोकांपैकीं अर्धे हिंदु व वंश...
लोकांत हिंदूंच्या कमी अधिक ...र्गामुळें तीन जात...
तील उच्च वर्णांतील लोक धर्म... ...आचरणामुळें जसे पति... तसे बा...
धर्मीय लोकही होतात. कसाई, गवयी, कोळसेविके, चांभा..., मासे खाणारे भंगी, व परीट, या जातींच्या लोकांस बौद्ध लोक फार नीच मानितात. बौद्धांच्या तीन जातींपैकीं एका जातीस बांडा ही संज्ञा असून, हिंदूंत जसे ब्राह्मण श्रेष्ठ, तसे हे बांडे बौद्धांत श्रेष्ठ आहेत. याशिवाय 'जापू' नामक एक जात असून, तींतील लोकांस शूद्रांशींही संबंध ठेवितां येतो. नेपाळांतील बहुतेक दासदासी या जातीच्या असतात. हे जापू लोक हिंदु व बौद्ध या दोन्ही धर्मांप्रमाणें वागतात, इतकेंच नव्हे, तर हिंदु देवतांच्या कांहीं मूर्तींस त्या बौद्ध मूर्ति आहेत असें समजून व बौद्धांच्या कांहीं मूर्तींस त्या हिंदु देवतांच्या मूर्ति आहेत असें समजून त्यांची उपासना करितात !

हिंदुधर्मांतील मुख्य चार वर्णांत ज्याप्रमाणें अनेक जाती आहेत, त्याप्रमाणें बौद्धांतही आहेत. या बहुतेक जाती निरनिराळ्या धंद्यांवरून अस्तित्वांत आलेल्या आहेत. बौद्धलोकांत 'बांडा,' जात फार श्रेष्ठ असून, नेवारी भाषेंतील बांढा (संस्कृत पंडित) या शब्दाचा बांडा हा अपभ्रंश आहे. या जातीच्या लोकांच्या वसतिस्थानास विहार असें ह्मणतात. हे लोक स्वभावानें शांत व सदाचारी असतात, तथापि पूर्वकालीन बुद्ध भिक्षुकांचे सगळेच नियम ते पाळीत नाहींत. या लोकांचा निर्वाह धार्मिक लोकांकडून मिळणाऱ्या पैशावर चालतो. नेपाळांत बौद्ध धर्मीय लोकांची बरीच मोठी संख्या असतां, तेथील न्यायमंदिरांत त्या लोकांच्या धर्मशास्त्राचा बिलकूल विचार न होतां, सगळा न्याय हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें करण्यांत येतो.

नेपाळी बौद्ध लोक, तिबेटांतील लामास आपला प्रमुख धर्मगुरु मानितात; तथापि तिबेटी लोक नेपाळांतील बौद्धांपेक्षां, नेपाळी हिंदूंस अधिक चाहतात; इतकेंच नव्हे, तर हिंदुदेवतांच्या कित्येक उत्सवांतही ते लोक सामील होतात. नेपाळी बौद्धांसंबंधानें ते इतका तिरस्कार दाखवितात कीं, त्यांची ते

[illegible] नीं; किंवा त्यांच्या एकाही उत्सवांत सामील होत [illegible] आपलीं प्रेतें जाळितात. त्यांच्यांतील प्रत्येक [illegible] असतें. हीं सगळीं स्मशानें बहुधा नदीतीरीं असतात. [illegible] वैतबहि[illegible] तेथें[illegible] मनुष्याचें प्रेत बौद्धलोक रस्त्यांत आणून टाकितात. व मुडदेफरास [illegible] तें उचलून रानांत नेऊन टाकितात!!

वरील सर्व मजकूर छापून निघाल्यावर, नेपाळच्या प्रस्तुत महाराजांस नुकतेंच गेल्या आठवड्यांत पुत्ररत्न झालें, व त्यामुळें नेपाळांत एकसारखे उत्सव चालू आहेत, अशी बातमी आली ती येथें नमूद करून युवराजास उदंड आयुष्य चिंतून तूर्त लेखणी खालीं ठेवितों.

समाप्त.

यक्षमल्लाची वंशा

यक्षमल्ल.

(इ. स. १४६० च्या सुमारास.)

(भाटगांव)

- रायराम
- सुवर्ण (भुवन)
- प्राण
- विश्व
- त्रैलोक्य (इ. स. १५५२)
- जगज्जोति (१६२८-१६३३)
- नरेंद्र
- ...तप्रकाश(१६४२-१६६७)
- ...ताामित्र (१६६३)
- भूपतीन्द्र(१६८५-१७१०)
- रणजितमल्ल(१७२२-५४)

(काटमांडू)

- रत्न
- अमर
- सूर्य
- नरेंद्र
- महीन्द्र
- सदाशिव (इ. स. १५७६)
- शिवसिंह (१६००)

(काटमांडू)

- प्रताप
- जयचंद्र महेंद्र
- जयनृपेंद्र
- भूपालेंद्र
- भास्कर
- जगज्जयमहिपतींद्र (१७२२-२८)
- जयप्रकाश(१७३६-५३)
- ज्योतिप्रकाश(१७४९)

(पाटण)

- लक्ष्मीनारायणसिंह, सिद्धिरणसिंह (१६३१-५४)
- श्रीनिवास (१६६५-७८)
- योगनरेंद्र(१६८६-१७०१)
- लोकप्रकाश (१७०५)
- महींद्रसिंह (१७०९-१५)
- योगींद्रप्रकाश(१७२२)
- विष्णु
- विश्वजित
- तलमर्दनशाह
- तेजनरसिंह

अकस्मात

होत

दिन

दवे

हा ने

ति